REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला रविवार ता० ४ माहे मार्च सन १८७७ इ० अंक ९

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

### कारकून पाहिजे.

आमचे छापखान्याकारितां एक कारकून पाहिजे आहे त्याचें मोडी अक्षर चांगलें असावें. व त्यास जाब जबाबी कामाची आणि जमाखर्च लिहिण्याची चांगली माहिती असावी. पगार प्रथमतः आठ रुपये पासून दहा रुपये पावेतों मिळेल. ज्या कोणाची ही जागा पतकरण्याची खुशी असेल त्यानें जवळ असल्यास समक्ष येऊन भेटावें, व दूर असल्यास खालीं सही करणाराकडे पत्रानें हकीकत कळवावी. तारीख १ माहे मार्च सन १८७७ इसवी.

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात

BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई ब्यांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार ? व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती राबेयन एथील ब्यांकेचे आफिसास असो बी ? सतां मिळेल.

तारीख १४ माहे सप्तंबर १८७६ इसवी.

सेक्रेटरी एच Harry H. Hyi

र जनरल

खऊ एड

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि.— महाराज अलिकडे मजुरी कामास चंद्रबल चांगलें आहे तरीही कित्येक दांडगे अवयवांनीं साबूत असून त्यांस भीक मागण्यास लज्जा वाटत नाहीं, ते भीक मागणें हा एक धंदाच समजतात. असो, जे आंधळे, पांगळे, नित्राण, वृद्ध यांनीं भिक्षा मागणें व त्यांस यथाकालीं देणें हा योग्य धर्म होय परंतु तसा प्रकार बिरळाच. आणि आह्मी हिंदू लोक विच्यार न करितां कित्येक घमंडानंदास भिक्षा घालतों. ह्मणोन त्यांचे भरताड माजत चाललें आहे इतकेंच नव्हे तर सदर्हू दांडगे उत्तरोत्तर शिष्याश्रप व जबरी सारखे कृतीचा अवलंब करून लोकांस बराच त्रास देतात याबद्दल सध्या थोडेसें लिहितों—गरीब अनाथास धर्म करावा परंतु पात्रापात्र विच्यार करण्याविषयीं शास्त्रसुद्धां हाकामारतें तरी डोळेझांक करणें हें रास्त नव्हे.

बहुतेक सर्वत्र शहरीं कोणाचे घरीं कांहीं लग्नादि कार्य हव्यकव्य झालें कीं तेथें आगांतुकांचा थवा येऊन बसलाच. मालकास कां दहा वीसजण आगांतुक घेण्याची शक्ति नसली तर मग ते त्रितीयसवनानें आरडा ओरडा करून घालून पाडून अभद्र भाषणांचा वर्षाव करतात. आंत भोजनास च्यार गृहस्थ वगैरे जमलेल्यांसही त्या आरड्याचा त्रास व वाईट वाटतें. शेवटी मालक आगांतुकाचे तोंडजोडीनें मोकळा होतो. अशांस आगांतुकी करणाऱ्यांची इतकी सक्ति कां असावी बरें? आणि या आगांतुकांतून कित्येक पैसेवाले व दुर्व्यसनीही असतात. हें धादांत गोचर असतांही ही वहिवाट होऊन बसली व या आगांतुकाचे या धिटाईबद्दल कोणी फिर्यादीस धजत नाहींत. व आमचे सरकार अर्जीशिवाय हूं चू करील कीं काय? पोलिसाचे सिपाई वगैरेस राजमार्गांत आगांतुकाचा धिंगाणा नजरेस पडला तरी त्यांणीं काय करावें. असो. या आगांतुकांत जे ढोंगी, दांडगे, व्यसनी त्यांचा बंदोबस्त होईल असा कांहीं सज्जांनीं बंदोबस्त योजावा तर बरें होईल. कारण गटारयंत्रांत खोट्या बातम्या कंड्या उठविणारे मुखडे यांतच असतात. भितरी श्रमाशिवाय सुग्रास आकंठपर्यंत भोजन मिळतें मग त्यांस बाता खबरुण्याशिवाय दुसरा धंदा कांहींच नाहीं बरें! हा ब्राह्मणाचा कित्ता दुसरे कित्येक जातीचे लोकही घेऊं लागले आहेत.

यांसहूप्रमाणें सायंकाळीं निदान प्रहर सायटका रात्रपर्यंतही कित्येक महार, शांतूगीरे कार्य करणाऱ्या मालकाचे बहुतकक हेल काढून अनेक तऱ्हेनें नाहीं. ात व विचकट बोलानें पराकामंडळी याणें, शिव्या सुद्धां देऊन निदा चार आरते, अखेरीस घरवाल्याची शोभा वाईट शब्दांना करून बायकांची कांहीं तरी नावें घेऊन मोठ मोठ्यानीं ओरडून किंकाळया फोडतात. एक दोन वेळां कोणास आणून कांहीं अन्न घातलें तर दुसरे पुकारा मांडतात. येवंच रात्रीं दहा वाजे पावेतों त्यांचा धिंगाणा चालतो याचे धिंगाण्यानें शेजारी पाजारीही कंटाळतात इतकेंच नव्हे तर त्या रस्त्यानें जाणारे लोक पुष्कळच त्रास पावतात. आतां हे लोक अन्योक्तिनें किती हलके शब्द बोलतात ते जरी सर्व या लहानशा पत्रीं माझ्यानें लिहवत नाहींत तरी इतका पुरावा सांगतों कीं पाहिजे तर त्याही ज्या घरीं कार्य प्रयोजन होतें तथें सदर्हू मासला तपासून घ्यावा आणि आज पावेतों हजारों लोकांच्या प्रत्यक्ष नजरेस व अनुभवास आलेंच असावें. अशास हा त्रास नसावा यांतूनही सदृढ वयस्क लोक असून मजुरी वगैरे करीत असतांही भिक्षेसाठीं लोकांन इतका त्रास देणें हें बेहतर नव्हे व या लोकांची रात्रपर्यंत दाटी त्या घरवाल्याचे घरासमीप होण्यानें कोणाचें नुकसान होण्यासही कारण आहे.

दिवे लागल्या नंतरभिक्षेचे मिषानें अनेक ढोंगी मचविण्यास अनेक कारणें आहेत व तेणेंकरून भामटेगिरी वगैरे गुन्हे घडण्याचा संभव नाहीं काय? भिकाऱ्याबद्दल लिहिण्यास वाईट वाटलें तरी, काय करूं त्यांचा धिंगाणा फार चालू व धर्मकृत्यास सदर्हू जुलमासारखा संबंध लागतो व ते लोक व त्यांचे अनुयाई आळशी व वाईट बनतात सबब मोठ्या नम्रतेनें विनंती करणें प्राप्त झालें याबद्दलचें यश कोण घेईल तें घेवो. लोभ चालावा हे विनंती. तारीख १ मार्च सन १८७७

एक शोधक.

### मारबल् पेपर करण्याची युक्ती.

वि. वि. मारबल् पेपरचा उपयोग आबालवृद्धांस माहीत आहेच. मुंबई इलाख्यांत स्वदेशी मारबल् पेपर पुरविण्याचें गनांत आणून खपाविषयीं अनुमान केलें असतां माझे मतें शें दोनशें मनुष्यांचा चरितार्थ चालेल. मारबल् पेपर हातानें होतात. यंत्रानें होत नाहींत, व बिलायतेंत मजुरी व जिनसांपैकीं मुख्य जिन्नस जवस येथीलपेक्षां महाग आहेत. याकरितां येथें तयार केलेले मारबल पेपर बिलायतेपक्षां स्वस्त दरान विकतां येतील. स्वदेशांतही छोटेखानी ही हुन्नर मुंबईसारख्या शहरांत कोणी चालू केल्यास प्रतिवर्षी हजारों बुकें मुंबई वगैरे ठिकाणीं बांधलीं जातात त्याच्या बाजवा अल्प खर्चानें सुशोभित होतील व करणारासही चांगला फायदा होईल.

या कामाकरितां अंगमेहनत व खर्च अल्प लागून काम फार होतें. चार मनुष्यें दहा तासांत २०० पासून ३०० दस्तें कागदास मारबल करूं शकतील. कारण पांच अंक मोजी तों एक कागद तयार होतो.

या कामीं लागणारे पदार्थ पाहिजे त्या गावीं मिळण्यासारखे आहेत. मात्र थोडासा हात बसेपावेतों व लागणाऱ्या पदार्थांत काय काय गुण अवश्य आहेत हें कळून येई पावेतों दोन तीन वेळ कागद नासतील व रंग व मेहेनत फुकट जाईल; परंतु धैर्य खचूं नये. या सोबत मी तयार केलेल्या कागदांचे मासले पाठविले आहेत. हे माझ्या चौथ्या प्रयत्नाचें फळ होय. कोणत्याही कामीं जसजसा अभ्यास व अनुभव दृढ होतो तसतसें चांगलें, सफाईदार व जलद काम होत जातें व खर्चही कमी लागू लागतो. या देशांत मारबल पेपरचा जितका खप आहे तेवढे मारबल पेपर व येथें बांधलीं जात असलेल्या सर्व बुकाचे बाजवास मारबलचे योगानें शोभा आणण्याचें सर्व काम स्वदेशबांधवांकडून व्हावें अशा आशेनें पुढील इत्थंभूत कृति आपल्या वाचकांस सादर करतों.

मारबल् पात्राची कृति—लांकडी चौकोनी पेटी, विलायती कागदाचे पानापेक्षां चार चार बोटें अधिक लांबीरुंदीची व तीन इंच उंचीची तयार करावी. आंत पाणी घातलें असतां तें बाहेर पाझरूं नये याकरितां तिचे सांध्यांतील बारीक छिद्रें लुकणानें बंद करावीं. या पेटीस झांकण बिजागरीनें जोडण्याचें कारण नाहीं. फक्त पेटीचे बेताचा एक लांकडाचा तक्ता आंत कचरा पडूं नये ह्मणून झांकण्याकरितां असला ह्मणजे बस आहे. मारबल् करणें ह्मणजे कागदावर सुशोभित चित्रविचित्र रंग चढविण्याचें काम या पेटींत होतें.

२. जवसाची कांजी.—एक शेर जवस व सुमारें आठ शेर पाणी एका पातेल्यांत घालून तें चुलीवर ठेवून कढवावें, ह्मणजे कांहीं वेळानें त्याची मधासारखी दाट व चिकट कांजी बनते. ती चुलीवरून खालीं उतरून एका अगदी विरळ कपड्यांतून वरील पेटींत गाळावी व थंड होण्याकरितां झांकण घालून ठेवावी. या कांजीचा सुमारें दीड इंचाचा थर त्या पेटींत झाला पाहिजे. ही इतकी कांजी सुमारें तीनशें कागदांचे पानांस मारबल् करण्यास पुरेल.

३. वर सांगितलेल्या कांजीचे सपाटीवर तरंगणारे सर्व प्रकारचे रंग उपयोगी आहेत, ते हिंगूळ किंवा कुंकूं यांचा लाल, नीळ याचा निळा; पेवडी, रेवाचिनी, किंवा हरताळ यांचा पिवळा; अंगला अथवा पिवळा व निळा हे रंग मिश्र केले असतां हिरवा; काजळ किंवा जनावराचे हाडाचा कोळसा याचा काळा; व सफेतीचा पांढरा. वर लिहिलेले सर्व रंग एकमेकांशीं अनेक प्रमाणानीं एकत्र केले असतां केशरी, जांभळा, भगवा आणि गुलाबी, पारवा, पिस्ताई आदीकरून सर्व प्रकारचे रंग पाहिजे असल्यास तयार होतील. हे रंग निरनिराळे बियर दारूंत एका कठीण व सफाईदार दगडाचे शिळेवर दगडाचे घोटणीनें एकेक तास पावेतों चांगले घोटून तयार करावे. रंग घोटण्याकरितां बियर (beer) दारू घालणें ती रंग घोटून लोण्यासारखे जाड होतील, अशा

वेतानें घालावी. प्रत्येक रंगाकरितां कांचेचे दोन दोन पेले असावे. एकांत घोटलेले रंग ठेवण्याकरितां व दुसऱ्यांत खालीं सांगितलेल्या मिश्रणानें हवेतेवढे पातळ करण्याकरितां. रंग घोटणें झाल्यावर खालीं सांगितलेलें मिश्रण व घोटलेल्या रंगापैकीं हवे तेवढे रंग निरनिराळ्या पेल्यांत घालून श्रीखंडाइतके जाड करावे.

४. घोटलेल रंग हवे तेवढे पातळ करण्याकरितां मिश्रण—एक भाग कापुराची पूड व दोन भाग ब्रांडी दारू एकत्र करून दोन तीन तास पावेतों ठेवावी, ह्मणजे ब्रांडींत कापूर विरघळून जाईल. नंतर या मिश्रणाचा एक भाग व पाणी पांच भाग आणि बकऱ्याचें अथवा कोणत्याही जनावराचे पोटांतील पित्ताचे थैलींतील पित्त हीं तीन एकत्र करावीं. घोटून तयार केलेले रंग वर सांगितल्याप्रमाणें पातळ हवे तेवढे करण्यास या मिश्रणाचा उपयोग करावा.

५. कागद—सफेत रंगाचे विलायती पातळ कागद अथवा फुलिस्कयाप कागद या कामास उपयोगी आहेत. ह्या साधे सफेत कागदावर रंग चढविले जातात; परंतु रंग फार खर्च होतात याकरितां व विलायती मारबल् पेपरप्रमाणें हिरव्या, निळ्या, लाल वगैरे रंगाच्या सळ्या मारबल्चे आंतून दिसाव्या याकरितां ज्या रंगाचे कागदाचे अंग करणें असेल तो रंग एका पेल्यांत पातळ व एका पेल्यांत जाड करून केसाचे मोठ्या कुंच्यानें पातळ रंग कागदावर एकसारखा सारवावा व कागद ओला आहे तोंच रुळानें व लहानशा कलमानें तिरकस समांतर पटे ओढावे ह्मणजे पहिले पातळ रंगात मागून दिलेला जाड रंग थोडाथोडा किनाऱ्यानें मिसळून इंद्र धनुष्यासारखे रंगाचे कागद दिसूं लागतील. याप्रमाणे तऱ्हतऱ्हेच्या रंगाचे कागद तयार करून पूर्वीच सुकवून ठेविलेले असावे, अशा कागदावर मारबल् केले असतां रंग थोड पुरून अधिक सुशोभित दिसतील.

६. मारबल् करण्याची कृति—वर सांगितल्याप्रमाणें तयार केलेल्या कांजीचे पेटीवरील झांकण काढून पातळ केलेले रंग निरनिराळ्या केसाचे कुंचानें पेटींतील कांजीचे सपाटीवर थोडथोडे शिंतडावे व एका काटकीनें ते हलवावे ह्मणजे कांजीवर टांकलेले रंग कांजीवरच तरंगत जाऊन हलविले असतां एकमेकाशीं न मिसळतां निरनिराळे; परंतु एकाजवळ एक याप्रमाणें होतात. आपणास हवा त्या नमुन्याचा गालिचा कांजीचे सपाटीवर झाल्यावर त्यावर कागदाचें पान टाकावें. ह्मणजे टाकल्याबरोबर कांजीवर तरंगणारा गालिचा एकदम कागदावर चिकटतो. मात्र कागद सारखा पाण्यावर पडेल अशी खबरदारी ठेवावी. कागद टाकल्याबरोबर लागलाच काढावा व दांडीवर सावलींत वाळत घालावा. ओल्या कागदावर धुरळा उडून बेरंग न होई अशी स्वच्छ व निवाऱ्याची जागा कागद वाळविण्याकरितां असावी. कागद वाळले ह्मणजे ते सफईदार दिसावे याकरितां त्यावर कोंबडीचे अंड्यांतील सफेत व पिवळ्या बलखाचें सफईदार केसांचे मऊ कुंच्यानें पातळ रोगण द्यावें ह्मणजे कागद मऊ, रंग तेजस्वी व काम सफईदार दिसेल. मारबल् करितांना प्रत्येक कागदाकरितां पुनः पुनः रंग कांजीचे सपाटीवर टाकून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें हवे तसे हलविले पाहिजेत. हें काम फार जलद होतें. पांच अंक मोजी पावेतों नवीन रंग टाकून, हलवून व वर कागद टाकून वाळविण्याकरिता दांडीवर पडतो. कांजी संपल्यावर अथवा फार वेळ रंग टाकल्यानें खराब झाल्यावर ती टाकून व पेटी धुऊन काम चालवावें. बुकाचे बाजवास मारबल् करणें असल्यास बूक दोन तक्त्यामध्यें घट्ट स्क्रूनें दाबून त्याच्या तिन्ही बाजवा अनुक्रमें कांजीवरील रंगावर थोड्या बुडवाव्या ह्मणजे झालें.

विशेष सुचना—कांजी घट्ट झाली तर रंग चांगले पसरणार नाहींत व रंग पातळ झाले असतां कांजींत मिसळतील. याजकरितां कांजी घट्ट किंवा पातळ पाहिजे तशी करणें ती पाण्यानें किंवा उष्णतेनें करावी. तसेच रंग पित्ताचे मिश्रणानें घट्ट किंवा पातळ करांव, हे विनंती.

हरि परशराम बर्वे.

## पुणेवक्तृत्वोत्तेजक मंडळी.

**सन १८७७।७८ इसवी सालचा भाषण समारंभ.**

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा चालू सालचा भाषण समारंभ गुरुवार ता० ३ माहे मे सन १८७७ पासून सुरू होईल. समारंभाकरितां विषय व बक्षिसें वगैरे खालीं लिहिल्याप्रमाणें असत.

विषय.

१ पहिला—लार्ड लिटन साहेब हिंदुस्थानचे व्हाइसराय व गवरनर जनरल यांनीं ता० १ जानेवारी सन १८७७ रोजीं दिल्लीस बादशाही समारंभ झाला त्यासमयीं दरबारांत एतद्देशीय राजे, अमीर उमराव, व प्रजा यांस अनुलक्षून भाषण केलें त्याचें राजनिष्टा प्रदर्शक उत्तर वक्त्यानीं द्यावें, हें उत्तर देताना दरबारामध्यें आपण आहोंत असें समजून राजेरजवाडे व प्रजा यांच्या तर्फे महाराणी (एम्प्रेस) व लार्ड लिटन साहेब यांनीं या नवीन किताबाचा समारंभ करण्यामध्यें इतकें अगत्य दाखवून सर्वांचा सत्कार केला त्याजबद्दल त्यांचे आभार मानून ज्या ऐतिहासिक व राजकीय गोष्टींविषयीं सरकारचे अभिप्राय कळविण्यांत आले त्या संबंधानें राजेरजवाडे व प्रजा यांचा अर्ज काय आहे तो नम्रपणानें व्हाइसराय साहेब यांस विदित करणें हा सर्व प्रयोग मनांत आणून वक्त्यानीं भाषण करावें.

२ दुसरा— दुष्काळाचे संबंधानें सरकाराचे व प्रजेचें कर्तव्यकर्म— मुंबई व मद्रास इलाख्यांत जो भयंकर दुष्काळ पडला आहे त्याचा विचार करण्याकरितां मुंबईस गव्हरनर सा. यांणीं मोठमोठाले सरकारी अंमलदार व शेट सावकार यांची सभा भरविली आहे त्या ठिकाणीं आपण आहोंत असें समजून सरकारांनीं दुष्काळ पीडित लोकांचे प्राण रक्षणापुर्तीच कायती तजवीज करावी किंवा त्यांचें सर्व प्रकारचें दुःख निवारण करण्याकरितां तजवीज केली पाहिजे आणि अशा प्रसंगीं संकटांत पडलेल्या लोकांनीं संकट निवारणार्थ आपण होऊन तजवीज कोणती करावी, व आपल्या संकटाचा सरकारावर कितीबोजा घालावा या व या संबंधाच्या इतर गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन जमलेल्या समाजास दया उत्पन्न होऊन उत्तेजन येईल असें भाषण करावें.

३ तिसरा—

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोळें॥ आणूनि निराळें द्यावें हातीं॥धृ॥ इंद्रियांचा जय साधुनिया मन॥ निर्विषय कारण असे तेथें ॥१॥ उपास पारणीं अक्षरांचो आटी॥सत्कर्मी शेवटीं असे फळ ॥२॥

अभंग २.

बोले तैसा चाले॥त्याचीं वंदीन पाउलें॥धृ॥ अंगें झाडीन अंगण॥त्याचें दास्यत्व करीन॥ त्याचा होईन किंकर॥ उभाठाकेन जोडुनी कर॥२॥ तुका ह्मणे देव॥ त्याचे चरणीं माझा भाव॥३॥

सदर विषयांत वेगळाले दोन अभंग आहेत त्यांपैकीं ज्या अभंगावर परीक्षक भाषण करण्यास सांगतील त्या अभंगावर वक्त्यास भाषण करावें लागेल.

या तिन्ही विषयांवर भाषक करणारांनीं कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष व परोक्ष रीतीनें अनुलक्षून बोलूं नये.

बक्षिसें व गुण.

वरील तीन विषयांतून इच्छेस येईल तो [एकच] विषय घ्यावा. पहिल्या विषयास रुपये, ५०चें एक. दुसऱ्या विषयास रु० ४०चें एक, व तिसऱ्या विषयास रु. ३० चें एक, अशीं एकंदर तीन बक्षिसें ठेविलीं आहेत. बक्षिसें मिळण्यास १००गुणांतून निदान ५० गुण आले पाहिजेत.

उमेदवारांच्या समजुतीसाठीं सूचना

प्रत्येक भाषणास अर्धा तास दिला जाईल परंतु अवश्य वाटल्यास ती वेळ कमी अथवा ज्यास्त करण्याचा अधिकार परीक्षकांस आहे. भाषणांत विषयाची जुळणी, त्याचें प्रतिपादन व तो श्रोत्यांच्या मनांत उतरून देण्याची शैली या गुणांकडे विशेष लक्ष दिलें जाईल. उमेदवारांचें वय १८ वर्षांपेक्षां कमी नसावें. अर्ज ता. २० एप्रिल सन १८७७ चे आंत खालीं सह्या करणारांच्या नावें "पुणें सार्वजनिक सभेची कचेरी नगरकरांचा वाडा विश्रामबागेचे वाड्या शेजारीं" ह्या पत्त्यावर पाठवावे. त्यांत प्रत्येक उमेदवारानें आपलें नाव, बापाचें नाव, आडनाव, धंदा, पत्ता व गावाचें नाव आणि त्यानें घेतलेला विषय अशीं स्पष्ट लिहावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. उमेदवारांनीं भाषण समारंभाचे आगोदर एक दिवस चिटणिसास येऊन भेटावें व जे न भेटतील ते भाषण करण्यास येत नाहींत असें समजून व्यवस्था ठेविली जाईल. गेले होते ते

विशेष सूचना— सदरीं लिहिलें आहे. आ समारंभाचे वेळेस जीं भाषणें होतील तीं नांव जागचे जागीं सांगत उतरून त्याचा छापण्याकरितां यत्न केला असतां त्यास छापण्यास येण्यासाठीं त्याचें लिहिणें पसंत ठरल्यास २५ रुपयेपर्यंत बक्षिस देण्यात येईल. ज्या उमेदवारांची लिहून घेण्याची मर्जी असेल त्याचे रणीं आपले अर्ज वर लिहिल्या प्रमाणें आपलीं सही करणारांकडे पाठवावे. पुणें तारीख २० फेब्रुवारी सन १८७७ इसवी.

मंडळीचे आज्ञेवरून
शिवराम हरी साठे
विष्णु विनायक शारंगपाणी
पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचे
चिटणीस.

---

# वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन वद्य ५ शके १७९८

## हिंदुस्थान सरकार.

हिंदुस्थानांत राज्यसत्ता चालविण्याचा अधिकार गव्हरनर जनरल अथवा व्हाइसराय यांकडे आहे. त्यांची नेमणूक विलायत सरकाराकडून होते. व ते हिंदुस्थानाकरितां जे स्टेट सेक्रेटरी त्यांच्या हुकुमानें कारभार चालवितात. विक्टोरिया चापटर आक्ट २४ व २५ यावरून व यांच्या दुरुस्तीसाठीं झालेले विक्टोरिया चापटर १७ आक्ट २८ आणि विक्टोरिया चापटर ९८ आक्ट ३२ आणि ३३ यांच्या आधारें गव्हरनर जनरल इन्कौंसल यांस हिंदुस्थानांत चक्रवर्तिनी साहेबाच्या राज्यांतील सर्व प्रांतांतील सर्व लोकांकरितां कायदे करण्याचा अधिकार आहे. मग ते लोक नेटिव असोत, ब्रिटिश असोत, परदेशचे असोत अथवा आणखी कोणी असोत. हे कायदे हिंदुस्थानांतील सख्य संकेतानें रहाणारे सर्व राजे रजवाडे व संस्थानिक यांच्या अमलांत रहाणारी चक्रवर्तिनी साहेबाची प्रजा यांसही लागू आहेत.

हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर नजर ठेवण्याचें काम विक्टोरिया चापटर ९७ आक्ट २१ व २२ यांवरून स्टेट सेक्रटरी यांकडे सोपविलें आहे. व त्यांच्या सहायास १५ मेंबरांचें एक कौंसल दिलें आहे. पहिल्यानें या कौंसलाची स्थापना झाली ते व्हां ईस्ट इंडिया कंपनीचे कोर्ट आफ डायरेक्टर यांनीं आपल्या मधून ७ मेंबर निवडून द्यावे व ८ मेंबर सरकारानें नेमावे अशी व्यवस्था होती. अलीकडे नशा जागा कौंसलांत जागा रिकाम्या होतात त्यावर नेमणूक करण्याचा अधिकार स्टेट सेक्रेटरीच भरित असतात त्यांनीं त्यांत असा नेम ठेविला आहे कीं ज्याकिटाशिवाय कौंसलांत मेंबर नेमावयाचा त्याचे हिंदुस्थानांत १० वर्षे नोकरी केलेली असावी किंवा १० वर्षे तो हिंदुस्थानांत राहिला तरी असावा. आणि नेमणुकीचे दिवशीं त्यास हिदुस्थान सोडून दहा वर्षांहून अधिक वर्षे झालेलीं नसावींत. आणि अशा शर्तींचा मनुष्य नसेल आणि त्यास कौंसलात मेंबर नेमावयाचें ठरेल तर त्या वेळीं वर सांगितले प्रकारचे इतर ९ मेंबर तरी त्या कौंसलांत अवश्य असले पाहिजेत.

यांपैकीं कोणी मेंबर पार्लमेंटांत बसणार नाहीं, किंवा अभिप्राय देणार नाहीं. मेंबर व स्टेट सेक्रेटरी यांचे पगार हिंदुस्थानाचे उत्पन्नांतून प्रत्येकी सालीना १२००० रुपये प्रमाणें मिळावें असा ठराव आहे.

हिंदुस्थान सरकार हें गवरनर जनरल व त्यांचें कौंसल मिळून आहे. कौंसलांत ६ साधारण मेंबर व एक विशेष मेंबर असे ७ असतात. हिंदुस्थानचे सेनाधिपति हे विशेष मेंबर होत. साधारण मेम्बर हे फारेन आफेयर्स [ परराष्ट्र संबंधी कामें. ] फिन्यान्सेस ( राज्याचा वसूल ) इंटीरियर मिलिटरी अडमिनिस्ट्रेशन [आंतील भागांतील लष्करी व्यवस्था ], आणि पब्लिक वर्क्स ( सार्वजनिक कामें ) या खात्यासंबंधी कामकाज पहातात. परंतु युरोपांतील राज्यकारभारांत या संबंधानें "क्याबिनेट" ह्मणून जशी संस्था आहे तशी इकडे नाहीं. गवरनर जनरलच्या कौन्सलांतील साधारण मेम्बर, इलाख्याचे गवरनर, आणि प्रान्ताचे गवरनर यांच्या नेमणुका चक्रवर्तिनी साहेबांकडून होतात. आणि दुसऱ्या कित्येक प्रांन्ताचे लेफटिनेंट गवरनर यांच्या नेमणुका गव्हरनर जनरल करितात व त्या स्टेट सेक्रेटरीच्या मंजुरातीनें कायम होतात.

हिंदुस्थानच्या राज्याची प्रस्तुत इंग्लंडांत व हिंदुस्थानांत जी घटना आहे ती अशी:—

इंग्लंडांत

हिंदुस्थानाकरितां स्टेट सेक्रेटरी—मार्किस आफ सालिस्बरी.

अंडर सेक्रेटरी —सर लुइस म्यालेट सी बी, व लार्ड जार्ज्य एफ ह्यामिल्टन एम पी.

असिस्टंट अंडर सेक्रेटरी —टी एल सीकोंब इस्क्वायर सी बी.

कौन्सल.

व्हाईस प्रेसिडेन्ट माहे मर्बर्ट मांटगोमरी जी सी एस आ. , ... सी बी.

मेम्बर.

सर फ्रेडरीक करी, बारोनेट
सर अर्स्कीन पेरी.
मेजर जनरल सर डब्ल्यु ई बेकर
सर फ्रेडरीक जे हालीडे
मेजर जनरल सर हनरी राव्लिनसन
सर हेनरी जे एस मेन
सर ज्यार्ज्य क्यांबेल के. सी- एस. आय.
अंढरू क्यासल्स इस्क्वायर
आनरबल सर डब्ल्यु मूर
रास डी म्यांगलस इस्क्वायर
जनरल सर आर जे एच विवियन
सर गारनेट वोल्सली के सी बी

—

स्टेट सेक्रेटरीचे प्रायव्हेट सेक्रेटरी एच सी वालपोल इस्क्वायर.

हिंदुस्थानांत

व्हाइसराय आणि गव्हरनर जनरल हिज एक्सेलेन्सी दि राईट आनरबल एडवर्ड राबर्ट बलवर लिटन

कौन्सल

विशेष मेंबर—जनरल सर फ्रेडरीक पाल्हेन्स

पहिले साधारण मेंबर— मेजर जनरल सर ई बी जानसन

दुसरे मेंबर आर्थर हाबहौस इ.
तिसरे ,, ई बी बेली इ.
चवथे ,, सर जान स्ट्रेची
पांचवे ,, सर ए क्लार्क
सहावे ,, सर ए जे आर्बथनाट

इतर इलाख्याचा गव्हरनर ज्याच्या हद्दींत कौन्सल भरते तोही या कौन्सलाचा विशेष मेंबर होतो.

कायदे करण्याच्या कौन्सलाचे शिवाय मेंबर

आनरबल जे आर बी स्मीथ
एच एच जयपुरचे महाराज
,, ,, विजय नगरचे महाराज
आनरबल टी सी होप.
एच एच बलरामपुरचे महाराज के सी एस आय
आनरबल आर ए डालीयल
,, एच एच सदरलंड
,, ए ईडन
डब्ल्यु स्टोक्स इस्क्वायर सेक्रेटरी

---

**मेजर क्यांडी साहेब यांचा मृत्यू.**

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं, मेजर क्यांडी साहेब, जे महाराष्ट्र भाषेच्या पूर्ण अभिज्ञतेवरून साऱ्या हिंदुस्थानांत प्रसिद्ध, ते गेले सोमवारीं महाबळेश्वरीं मृत्यू पावले. यांच्या मरणानें दक्षिण देशांतील व बाहेर प्रान्तांतीलही त्यांस जाणणारे सर्व लोकांस पराकाष्ठेचें दुःख झाल्यावाचून रहाणार नाहीं. क्यांडी साहेबांनीं हिंदुस्थान देश हा केवळ स्वदेश मानिला होता. व सुमार ५६ वर्षे ते या देशांत होते. व त्यामुळें त्यांची या देशावर व इकडील लोकांवर एवढी प्रीति बसली होती कीं, अत्यंत वृध्धापकाळीं व मरणसमयीं देखील इंग्लंडास जावें हा विच्यार त्यांचे मनांत आला नाहीं. क्यांडी साहेबासारखे सत्यप्रिय, दयाळु, व भले असे थोडेच गृहस्थ आढळतील. ते मुंबई इलाख्यांत विद्याखात्याकडे ट्रान्सलेटर होते. अव इंग्लिश महाराष्ट्र भाषेचा समुद्रासारखा एक प्रचंड कोश त्यांनीं केलेला आहे. तेणेंकरून तर त्यांचें नाव हिंदुस्थानांत केवळ अजरामर झालें आहे. सरकारानें त्यांचा वृध्धापकाळ झाला व पहिला कोश छापून पुष्कळ वर्षें झालीं असें पाहून त्यांच्याकडून तो पुन्हा सुधारून व वाढवून त्याची दुसरी आवृत्ति तयार करविली व ती छापून प्रसिध्धही झाली येणेंकरून आह्मास बहुत संतोष वाटतो. गेल्या जानेवारींत हिंदुस्थान सरकारानें क्यांडी साहेबाला "कंप्यानियन आफ धि स्टार आफ इंडिया" हा मानवान किताब दिला होता पण त्याचा उपभोग पुरे दोन महिनेही त्यांस झाला नाहीं याबद्दल वाईट वाटतें. सारांश क्यांडी साहेब हे एक आमचे देशांतून रत्न गेलें व याबद्दलची हळहळ बहुतकाळमर्याद लोक मुखांतून जाणार नाहीं. आह्मी इच्छितों कीं, पुण्याकडील मंडळी यांच्यासाठीं कांहीं स्मारककृत्य करण्यास आरंभ करील व त्यांस बाहेरूनही बहुत लोक मदत करितील. क्यांडी साहेबांचें मरणसमयीं वय ७२ वर्षांचें होतें. यांना मुलें व पुतणे आहेत व ते वऱ्याच मोठ्या हुद्दयावरून आहेत. एथें थोडे वर्षांमागे मि० आर ई क्यांडी ह्मणून डायरेक्टर आले होते ते मेजर क्यांडी साहेबांचे एक पुतणेच होत.

---

**बडोद्यास दरबार.**

आपल्या राणी साहेब चक्रवर्तिनी झाल्या, त्या आनंदाच्या सूचक जानेवारीच्या पहिल्यातारखेस हिंदुस्थानांत चहोंकडे दरबार झाले व दिल्लीस येक बडादरबार झाला हें सर्वांस माहित आहेच. आतां दिल्लीच्या समारंभास बहुत राजेलोक गेले होते व त्यामुळें त्यातून कित्येकांच्या राजधान्यांत त्या ठरीव दिवशीं विशेष समारंभ झाला नाहीं ह्मणून ते आपआपल्या शहरीं परत आल्यावर तो उत्साह करीत आहेत असें दिसतें. भूपाळच्या बेगम साहेबानीं गेल्या आठवड्यांत आपले राजधानींत मोठा समारंभ करून तेथील व आसपासचे बहुतेक युरोपियन लोकांस आमंत्रणें करून आणून मेजवानी दिली असें प्रसिद्ध झालें आहे. इतक्यांत बडोद्यासही तशा संबंधानें वडा दरबार झाल्याचें वर्तमान आलें यावरून आणखीही कित्येक राज्यांतून असे दरबार अजून होतील कीं काय न जाणो. बडोद्यास गेल्या महिन्याच्या २२वे तारखेस मोतीबागेंत हा दरबार झाला. राजे साहेब व त्यांच्या पदरचे सर्व मानकरी व मुत्सद्दी हजर असून छावणींतून एजंट साहेब व दुसरे युरोपियन गृहस्थ आले होते. दिवाण साहेबांनीं चक्रवर्तिनी साहेबांच्या स्तुतिपर उत्तम संभाषण केलें. नंतर एजंट साहेबांनीं त्यास समर्पक असा जबाब दिला. व हिंदुस्थान सरकाराकडून चांदीचीं पदकें व किताब आले होते ते त्या त्या गृहस्थांस दिले ते असे:—

सर टी माधवराव साहेब दिवाण यांस 'राजा' असा किताब व पदक दिलें.

मे० काजी शाबुदीन, करशेटजी रुस्तुमजी, व पेस्तमजी जहांगीर यांस 'खान बहादूर' असे किताब व पदकें दिलीं.

रा. रा. विनायकराव जनार्दन कीर्तने यांस "राव बहादुर" हा किताब व पदक दिलें

नंतर पान सुपारी अत्तर गुलाब हार तुरे होऊन दरबार बरखास झाला. व मागाहून कित्येक कैदी सोडून दिले.

दुसरे दिवशीं सकाळीं मकरपुऱ्यावर फौजेची मोठी कवाईत केली व रात्रौ युरोपियन लोकांस मेजवानी दिली त्या वेळेस ही राजे साहेब व राणी साहेब यांच्या वतीनें दिवाण साहेबानीं उत्तम भाषण केलें व एजंट साहेबांनीं त्यास अनुरूप असा जबाब दिला.

---

## वऱ्हाड

कर्नल अलार्डाईस साहेब जुडिशियल कमिशनर प्रांतांत फिरावयास गेले होते ते मलकापुराकडून गुरुवारीं येथें आले. आतां या आठवड्यांत कर्नल नेंभार्ड साहेबांकडे ते आपले आफिसाचा च्यार्ज्य सोपवून जाणार असें समजतें. त्यांनीं एक महिन्याची सबसीडियरी रजा घेतली आहे.

---

मेजर हडलस्टन साहेब एक वर्षाचे रजेवर विलायतेस आज जाणार. त्यांनीं आपले कामाचा च्यार्ज्य मे. मेन साहेब असिस्टंट कमिशनर यांस कालरोजीं दिला.

---

मे. बेल साहेब १९ वे तारखेचे सुमारास विलायतेहून एथें येतील असें ह्मणतात.

---

मे. एदलजी साहेब अकोल्याची यांजकडील काम पुढें दुसरा हुकूम होई पर्यंत मेजर मेन साहेब यांजकडे दिलें आहे. व अकोल्याची साहेबांनीं फैसल केलेले मुकदमे मेन साहेबांनीं तपासून पहावे असा हुकूम झाला. अकोल्याची यांना अधिकार १०० रुपयांपर्यंत दावे पहाण्याचा लवकरच येईल.

---

मुनसफ लोकांच्या नेमणुकांच्या संबंधानें इकडून अजून कांहींच लेख रेसिडेंट साहेबाकडे गेला नाहीं. नवीन जुडिशियल कमिशनर आल्यावर ते लिहिणार असें ऐकतों.

---

अकोल्याची मोठाली आफिसें ह्मणजे जुडिशीयल कमिशनर आफिस, डायरेक्टर आफिस, स्यानिटरी कमिशनर आफिस वगैरे उमरावतीस जाणार असें कोणी ह्मणतात. व दुसरे कोणी असेंही ह्मणतात कीं उमरावतीचें कमिशनर आफिसच अकोल्यास येणार, पण या दोहोंतही कांहीं तथ्यांश आहे असें अजून दिसत नाहीं. उमरावती शहर मोठें आहे व कमिशनरचें आफिस तेथें आहे ह्मणून अकोल्याची आफिसें तेथें जावीं अशी कल्पना आहे. व उमरावतीस नवीन आफिसें नेण्याला जागा नाहीं व तेथें एकच मोठे आफिस असून अकोल्यास तीन आहेत सबब उमरावतीचे एकच आफिस अकोल्यास येणें योग्य आहे अशी दुसऱ्या पक्षाची कल्पना आहे.

---

उमरावतीचे मि० म्याकिंटाश साहेब यांस गेल्या १८व्या तारखेच्या आमच्या पत्रांतील मजकूर वाचून फार दुःख वाटलें असें प्र. सि. वरून समजून आह्मांस ही दुःख वाटतें. पण इलाज काय? तरी गावढळ इलाज असा आहे कीं कांट्यानें कांटा काढतात त्याप्रमाणें दुःखानें दुःख विसर्जन करावें. कारण आमच्या छोट्याशा मजकुरानें त्यांस दुःख झालें तर ता० २४ फेब्रुवारीचा उर्दूअखबार व ता० २९ फे.चा अरुणोदय हे त्यांनीं पाहिले असतील व त्यांस मोठेंच दुःख झालें असेल व वरचा उपाय त्यास बरा वाटला असला तर त्यांनीं त्या दुःखाचा परिहारही केला असेल. म्याकिंटाश साहेब यांचा आमचा तिळमात्र द्वेष नाहीं. उलटी त्यांची आह्मी सुधारणा चहातों हा मित्रभाव समजावयाचा. ते आह्मावर फिर्याद करणार अशी वदंता आहे. ती खरी ठरल्यास वावगी नाहीं. कारण त्या योगानें इतर बहुत गोष्टींचा खुलासा होईल व सार्वजनिकहिताचें कांहीं कार्य झाल्यास होईल

---

## वर्तमानसार

उद्योग व कला कौशल्य शिकविण्याची शाळा गुजराथेंत मुंबईचे व्यापारी शेट करशेटजी फरदुनजी यांनीं स्थापन केलेली निद्राग्रस्त झाली होती ती पुन्हा सुरू करण्याविषयीं त्यांनीं ४६००० रुपये सरकारांत देऊन तजवीज केली. आतां या महिन्यांत ती शाळा पुन्हा चालू होणार.

भूपाळच्या बेगम साहेबांनीं या आठवड्यांत राणी साहेब चक्रवर्तिनी झाल्याच्या निमित्तानें आपले राजधानींत हुशंगाबाद, सिहूर, इंदूर, सागर, महू इत्यादि ठिकठिकाणचे युरोपियन गृहस्थांस मेजवानीस बोलाविलें आहे.

इंदूर रेसिडेंसीचें कालेज कलकत्ता युनिव्हर्सिटीकडे दिलें. व त्यांत बी एच्या अभ्यासापर्यंत केलें करविण्याची मोकळीक

---

दुस्काळपीडितांक
**नोटि** चालू करणार.
.मराठी, दर ओळीस पुढील सा
तीच नोटिस दुसरे खेपे फेरफार
इंग्लिश लिपींत दर ओ न कलमें
,, दुसरे खेपेस
परीक्षा हो

---

**जाहिर** करितां उ
रण नाहीं.
**कारकून** व त्यांत जे
आमचे छापखान्याविषया-
कून पाहिजे आहे. त जावें.
गलें असावें. व त्या अधिक येती
ची आणि जखमा येतील त्यांची
ली माहिती हवानें याबी तयार
रुपये पासून दह
ज्या कोणाची ही व हे फार चा
शी असेल त्यानें जव
येऊन भेटावें, व दूयांमध्यें त
सही करणाराकडे पत्रानें

वीदल्याढ्यांत ७७५७७७ मनुष्यें रेलिफ संबंधी कामावर आहेत. मागील पेक्षां २ लक्ष कमी झालीं असें दिसतें.

काबुलास रशियाचा दुसरा आणखी वकील आल्याचें वर्तमान आहे.

खिलातच्या खानाचा व ब्रिटिश सरकारचा स्नेहसंकेत सन १८७३ साला पासून बिघडला होता तो पुन्हा सुरळीत झाला. व खान यांणीं आपले मुलखांत पोलिटिकल एजन्टी पुन्हा ठेवावी अशी ब्रिटिश सरकारास इच्छा दाखविल्यावरून गवरनर जनरल यांणीं विलायत सरकारचे मंजुरातीवर नेमणुका केल्या आहेत ह्मणजे मेजर आर जी सांडम्यान सी एस आय पंजाबचे डिपुटी कमिशनर यांस बेलुचिस्थानकरितां गवरनर जनरलचे एजंट नेमिलें. व त्यांची योग्यता सेकंड क्लास रेसिडेंट इतकी ठरविली आहे. त्याचे हाताखालीं मि० ब्रून, क्या० रेनाल्डस व क्या० उइली यांस अनुक्रमें फर्स्ट, सेकंड व थर्ड असिस्टंट नेमिलें.

मुंबईच मुनसफीचे परीक्षेकरितां या सालीं ७६ उमेदवार आहेत.

दिल्लीस कालेज आहे तें बंद करण्याचा ठराव झाला. हें एप्रिलचे ८वे तारखेपासून बंद होईल. सन १७९२ सालीं हें सुरू झालें आहे ह्मणजे यास ८५ वर्षें झालीं. सन १८२९ सालीं नवाब इतमाद उदवला यांणीं या कालेजास पावणे दोन लक्ष रुपये दिले आहेत. हें इतकें जुनें कालेज बंद होतें याबद्दल आह्मास वाईट वाटतें.

नवानगरच्या जामसाहेबांचे चिरंजीव मिस्त काळुभा हे विलायतेंत जात आहेत.

आनरबल मि. एलिस साहेब यांस विलायतेस स्टेट सेक्रेटरीच्या कौन्सलमध्यें मेंबर नेमिलें व ते लवकरच त्या जागेवर जाणार असें समजतें.

अहमद नगरचे प्रिन्सिपाल सदर अमीन रा. ब. पुरुषोत्तमराव सिद्धेश्वर विनीवाले यांस स्मालकाज कोर्टाचा अधिकार मिळाला.

मद्रास रेलवेकडे धान्य पुरविण्याचे कामाची फार गडगड आहे ह्मणून तेथें एक एकस्ट्रा असिस्टंट ट्राफिक म्यानेजर नेमण्याची तजवीज झाली आहे.

मारामारीची फिर्याद—नागपुर येथील वडे सरदार, व अनररी माजिस्त्रेट श्री. रावसाहेब नानासाहेब अहेरराव राजे व त्यांचे चिरंजीव श्री० अहिल्योजीराव अहेरराव, व श्री० रावसाहेब नानासाहेब चिटणीस या त्रिवर्गांवर त्यांणीं श्री० मयत दर्याबाईसाहेब राणी यांच्या इलाख्याकडील कांहीं कामदारांस मारहाण केल्याबद्दल फौजदारींत फिर्याद झाली असें ऐकतों. वृ. धा.

सर रिचर्ड टेंपल साहेबांनीं अनुमान केलें आहे कीं मद्रास इलाख्यांत एप्रिल महिन्याचे १५ वे तारखेपर्यंत चांगला पाऊस पडला तर पुढें जूनपर्यंत फारशी गडबड होणार नाहीं. आणि तसें न झाल्यास फार कहर उसळेल. व एक वर्ष भरपर्यंत नंतर लोकांची स्थिति कशी होईल ती भयंकर कल्पना करवत नाहीं.

खान आफ खिलात दिल्लीचे दरबारास आले होते त्यांचा सर्व खर्च ते तेथून निघाल्यापासून परत जाऊन दाखल होईपर्यंतचा हिंदुस्थानसरकारानें दिला. व शिवाय भोजणखर्चाकरितां दरोज २०० रुपये दिले.

पंडित नारायणसिंग यांनीं हिमालय वगैरे उत्तरकडील शोध न लागलेल्या प्रदेशांत फिरून निबेट वगैरे प्रदेशाची माहिती मिळविण्याचें काम उत्तम केलें व त्या कामावर असतांच हवेनें त्यांची प्रकृति बिघडली सबब हिंदुस्थान सरकारानें त्यांस एक हजार रु० चा गांव बुंदेलखंडांत द्यावा ह्मणून शिफारस केली आहे.

परवा जो पाऊस पडला त्यायोगानें ईस्ट इंडिया रेलवेवरील धान्याचें इतकें नुकसान झालें कीं, त्याबद्दल ५०,००० रुपये त्या कंपनीनें नुकसानीबद्दल व्यापाऱ्यांस दिले व दुसरेही कित्येक दावे चालू आहेत.

युरोप व अमेरिकेंतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या आरमारांची संख्या सुमारें २०३९ गलबतें असून त्यावरील फौज २,८०,००० मनुष्यें आणि १५,००० तोफा आहेत.

पोर्टूगीज लोकांचे राजाशीं हिंदुस्थान सरकारानें व्यापार संबंधीं नवीन तह केला आहे. त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारानें गोंव्याकडून येणाऱ्या तंबाकूवर कर घेऊं नये व पोर्टुगीच्या राजानें हिंदुस्थानांतून पाठविलेल्या मिठावर कर घेऊं नये असें ठरविलें आहे.

जपानदेशाची राजधानी येडो, येथें अतिशय मोठी आग लागून सुमारें १०,००० घरें जळालीं व १,२०,००० लोक जळून मेल्याचें कळतें.

तारीख १९ फब्रुवारी रोजीं संपणाऱ्या आठवड्यांत मुंबई येथील टांकसाळेंत २,१८,०८,८६७ रुपये किंमतीचे रुपे व १९,०१,५६३ रुपयांचें नाणें होतें.

एका युरोपियन गृहस्थानें मुंबईस चिरूटें तयार करण्याचा नवा कारखाना घातला आहे. ने. ओ.

चालू महिन्याच्या १०व्या तारखेस संपणाऱ्या आठवड्यांत बंगाल्यांत सर्व ठिकाणीं पाऊस पडून तुफान झालें. तेणेंकरून बाहेर पाठविण्याकरितां तयार असलेल्या धन्याची व पिकांची बरीच खराबी झाली. बाकरगंज एथेंही तुफान झालें; परंतु येणेंकरून तेथील पटकीचा उपद्रव कमी झाला. सु. प.

---

इंग्लंड—पार्लमेंट सभा चालू झाल्यावर राणीसाहेबांच्या भाषणानंतर तुर्कस्थानप्रकरणाविषयीं बादाविवाद झाला तेव्हां हौस आफ लार्डसमध्यें लार्ड डर्बी बोलले कीं, पंचसभेचे ठराव पला अमलांत आणले पाहिजेत, असें रशियन बादशहा कदाचित ह्मणेल, ह्मणून त्यांच्या निश्चयावर युरोपाची स्वस्थता अवलंबून आहे. लार्ड बीकन्फील्ड व लार्ड साल्सबरी ह्मणाले, तुर्कसरकारावर कोणत्याही प्रकारें सक्ती होणें बरें नाहीं. लार्ड ग्रानविल ह्मणाले, युरोपांतील सर्व सरकारांनीं मिळून तुर्कसरकारास पंचांच्या सूचनेप्रमाणें करायास लावावें. ड्युक आर्गाइल ह्मणाले, सरकारानें आपला कार्यक्रम बदलला. हौस आफ कामन्समध्यें सर स्टा. नार्थकोट ह्मणाले, काय करणें तें सर्वांनीं मिळून करावें अशी इंग्लंडाची इच्छा आहे; रशिया व आस्त्रिया यांनीं पृथक रीतीनें कांहीं केलें तर सर्वांस मोठा अंदेशा येईल मार्किस हार्टिंगटन बोलले कीं, लार्ड साल्सबरी यांनीं इंग्लंड व रशिया यांचें पूर्ववत् सौजन्य केलें, आणि १८५६च्या तहावरून इंग्रज व दुसरीं सरकारें यांशीं तुर्कसरकारचा संबंध कसा आहे हें त्यांस दाखविलें, यावरून सर्व इंग्लंडानें त्यांचे आभार मानले पाहिजेत. लार्ड नार्थकोट यांस कोणी विचारल्यावरून त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, राणी साहेबांच्या भाषणांत बंगाल्यांतील तुफानाविषयीं कांहीं उल्लेख नव्हता याचें कारण हें कीं, त्या वेळेस लार्ड साल्सबरी एथें नव्हते. कित्येक वर्तमानपत्रें ह्मणतात कीं, या प्रकरणांत इंग्लिश सरकारानें आलीकडे जें केलें तें ठीक केलें, पण रशियन लोकांस स्वतंत्रपणें तुर्कस्थानाविरुद्ध कांहीं करतां येऊं नये ह्मणून सर्व सरकारांनीं सुलतानास पंचाच्या ठरावाप्रमाणें करायास लावलें पाहिजे. हिंदुस्थान सरकारचा जमाखर्च तपासण्याकरितां कमिशन नेमावें असें मि० फासेट यांनीं सुचाविलें पण बहुमतानें त्यांची सूचना रद्द झाली. मि० स्मालेट यांनीं अशी सूचना केली कीं, हिंदुस्थानांतील ज्या लोकोपयोगी कामांवरून कर्ज होणार तीं कामें बंद करावीं, तीही सूचना रद्द झाली. त्यांनीं ह्मटलें, हिंदुस्थानांतील कामदार हिशेबांत लटपट करतात; पण हा आरोप बरोबर नाहीं असें लार्ड हामिल्टन ह्मणाले. ज्ञा. द.

---

✓ खिलातच्या खानास आजपर्यंत दरमहा ५००० रुपये इंग्रज सरकाराकडू मिळत होते ते यापुढें १०००० रु. देण्याचा हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे हें पाहून नवल वाटतें. हिंदुस्थान सरकार काबूलच्या अमिरास आज कित्येक वर्षांपासून दरमहा १००००० रुपये देत असून शिवाय त्यास कित्येक वेळ हजारों हत्यारें ही दिलीं आहेत हें सर्वांस माहित असेलच. अमिरास ही एवढी मोठी देणगी देण्याचें कारण काय हें स्पष्टपणें जरी आजपर्यंत बाहेर आलेलें नाहीं तरी अमिरानें रशियास अलीकडे येऊं देऊं नये याकरितां ही देणगी आहे अशा प्रकारचे लेख आजपर्यंत कित्येक वेळ वाचण्यांत आलेले असल्यामुळें, त्यास एवढी मोठी देणगी पोंचत असतांही तो हिंदुस्थान सरकाराशीं चांगल्या रीतीनें वागत नाहीं हें धडधडीत रीतीनें अनुभवास आलें असतां आमच्या विचारी ह्मणविणाऱ्या हिंदुस्थान सरकारानें आतां खिलातच्या खानाशीं तसल्या खटपटी चालू केल्या आहेत हें पाहून नवल वाटतें. रशियन लोकांचा हिंदुस्थानांत शिरकाव होऊं नये एवढ्या करितांच जर ही सर्व खटपट असली तर आमच्या सरकारानें असल्या अडाणी मार्गांत शिरण्यापेक्षां सरळ मार्गानें पुढें यावें हें चांगलें. रशियाचा पाय हिंदुस्थानांत न पडावा एवढ्याकरतां सरहद्दीवरील लोकांची अशा रीतीनें खुषामत करण्यापेक्षां हिंदुस्थानांतील लोकांस चांगल्या रीतीनें वागविण्याचे उपाय सुरू करा. क्रिमिनल प्रोसिजर सारख्या कित्येक कायद्यांत होती ज्या, रानटी ठराव केलेले आहेत व ज्यांच्या योगानें हिंदुस्थानच्या लोकांस पराकाष्ठेचा ताप होत आहे ते ठराव त्याड्यांत टाकून आपल्या रयतेस शांत करा आणि हिंदुस्थानाकरता सुरू असलेलें विलायतचें इंजनेर कालेज व सिविल सर्विसची परीक्षा हीं झुगारून देऊन तशा प्रकारच्या सर्व गोष्टी हिंदुस्थानांत सुरू करून राज्यकारभारांतील— सिविल व लष्करी— सर्व जागा नेटिवांकरतां खुल्या ठेवा ह्मणजे अर्थात तुह्मी व तुमची हिंदुस्थानची प्रजा यांचें ऐक्य होईल, आणि तें झालें ह्मणजे असल्या निंद्य कर्मांनीं सरहद्दीवरील लोकांची मर्जी संपादण करण्याचें कांहींच कारण नाहींसें होऊन रशियास किंवा रशियाच्या बापासही हिंदुस्थानाकडे पहाण्याचीही छाती होणार नाहीं. आणि हे उत्तम मार्ग एकीकडे टाकून वरील प्रकारच्या निंद्य कर्मांस आमचें सरकार प्रवर्तक होतें हें पाहून आह्मा सारख्या खऱ्या राजभक्त प्रजेस मनापासून जें मोठें दुःख होत आहे तेंही नाहींसें होईल. अ. द.

---

हें पत्र अकोले एथें खंडेराव बाळाजी रुडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.खा. ए.

REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला रविवार ता० ११ माहे मार्च सन १८७७ इ० अंक १०

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

### कारकून पाहिजे.

आमचे छापखान्याकारितां एक कारकून पाहिजे आहे. त्याचें मोडी अक्षर चांगलें असावें, व त्यास जाब जबाबी कामाची आणि जमाखर्च लिहिण्याची चांगली माहिती असावी. पगार प्रथमतः आठ रुपये पासून दहा रुपये पावेतों मिळेल. ज्या कोणाची ही जागा पतकरण्याची खुशी असेल त्यानें जवळ असल्यास समक्ष येऊन भेटावें, व दूर असल्यास खालीं सही करणाराकडे पत्रानें हकीकत कळवावी. तारीख १ माहे मार्च सन १८७७ इसवी.

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात

BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई ब्यांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार आहे. व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगाव एथील ब्यांकेचे आफिसास अर्ज केला असतां मिळेल.

तारीख १४ माहे सप्तंबर
१८७६ इसवी.

Harry H. Hynes.
Agent

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. महाराज, मागें आपल्या एका पत्रांत बाळापुरचे तहशिलदार रा. रा. गोविंदराव यशवंत यांच्या कन्येचें राजुरें एथें मोठ्या कडाक्याचें लग्न होणार आहे असा मजकूर मी वाचिला होता ह्मणून मी मेडसीचा सुखवस्तु रहाणारा व दोन कोसावर लग्न असल्यामुळें मी तें पहाण्यास गेलों होतों यासाठीं त्या संबंधी चार ओळी आपणास लिहून पाठवितो त्या प्रसिद्ध करण्याची कृपा व्हावी.

राजुरें एथील लग्न खरोखरच फार कडाक्याचें झालें. मेघराजानें लग्नांत बहुत गडबड केली परंतु हें घराणें श्रीमान व मनुष्यबळ चांगलें ह्मणून पर्जन्यापासून कांहीं त्रास न होतां सर्व कार्य यथासांग सिद्धीस गेलें. शेकडों रुपयें खर्चून मोठा लग्न मंडप तयार केला होता त्यांत पावसानें चिखल होऊन पाणी झालें तर त्यांनीं शंभर मजूर लावून पाणी, चिखल, व ओली माती काढून टाकली आणि एक तटाची भिंत पाडून तिची कोरडी माती त्या मंडपांत पसरून दिली. लग्नाकरितां सात आठ शें गाड्या व २ हजार मनुष्य आले होते तितक्यांची व्यवस्था उत्तम रीतीनें ठेवली गेली. लोकांनीं अहेर केले त्यांच्या दिढी दुपटीनें यांनीं त्यास उलट अहेर केले. याकरितां मुंबईहून २॥ हजार रुपयांच्या शालजोड्या आणविल्या होत्या असें समजलें. साहेब लोक, पार्शी लोक, ब्राह्मण, परदेशी, गुजर, मारवाडी, मुसलमान वगैरे बहुतेक सर्व जातीचे लोक लग्नास आले होते. व त्यांच्या जातीचे आणि शूद्र यांची तर दोनदोन हजार पात्रें होत असत. व सायंकाळपासून उजाडेपर्यंत पंक्ती चाललेल्या पहाण्यांत आल्या. असा समारंभ वऱ्हाडांत थोड्याच ठिकाणीं होणारा आहे ह्मणून त्याविषयीं मी माहिती लिहिली याजबद्दल माफी असावी. या लग्नास समार १५००० रुपये खर्च लागला असावा असा अजमास आहे. तुमच्या अकोल्याहून मि. डेविससा., मि. ग्रांट सा., मि. दस्तुर बहिमनजी सा., मि. एदलजी सा., व दुसरे कित्येक सभ्य गृहस्थ आले होते त्यांच्या मुखानेंही या गोष्टीची सत्यता सर्वांस समजेल. कळावें ही विनंती.

एक
तुमचें पत्रवाचणारा

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. महाराज तुमचे अकोल्यास रा. रा. लक्ष्मीपती नायुडू बारिष्टर मद्रासेहून आले तेव्हां त्यांचें आगमन केवळ गाजून गेलें होतें. ह्मणजे ते येतांच त्यांनीं अकोल्यास एक व्याख्यान ठोकिलें, दुसरे आठवड्यांत उमरावतीस, तिसरे आठवड्यांत पुन्हा अकोल्यास, पुढें लागलीच पुन्हा उमरावतीस असा व्याख्यानांचा केवळ वर्षाव झाला त्यावरून बारिष्टर कंपकरून वऱ्हाडचें केवळ भाग्य उदेलें असें आह्मा लोकांस वाटूं लागलें होतें व अकोला उमरावतीप्रमाणें आमच्या जिल्ह्यांत बारिष्टर साहेबांची स्वारी येत जाईल. तेव्हां आह्मासही व्याख्यानामृत पिण्याचा हमेशा प्रसंग येत जाईल असें मनांत आणून आह्मी केवळ आ करून बसलों होतों, परंतु महाराज काय आमचें भाग्य हो, कीं तें अमृत आह्मा मर्त्य लोकांचे वाटणीस आलें नाहीं एवढेंच नव्हे पण वर लिहिलेल्या दोन्ही शहरांसही त्याचा लाभ दुरावला. इतक्या लवकर असें कठीण मन त्यांनीं का केलें तें तुह्मी आह्मा दूरच्या लोकांस कळवाल तर बरें होईल.

दुसरी गोष्ट— त्यांनीं एक ला—क्लास काढला आहे असें तुमच्याच पत्रांतून आह्मी वाचिलें होतें, पण त्याचेंही कोठें आतां नांव निघत नाहीं व तो चालतच नाहीं असें अकोल्याहून गेल्या आठवड्यांत माझा एक मित्र आलेला मला भेटला त्याचे सांगण्यावरून समजलें. व मागें तुह्मी ह्मटलें होतें कीं एक दिवस श्रोतेजन कोणीच न आल्यामुळें ला—क्लास भरला नाहीं व बारिस्टर परत गेले. हा क्लास कसा? या तुमच्या प्रश्नाचा आतां खुलासा चांगला समजतो कीं तो क्लास विद्यार्थ्यांच्या इच्छेचा नसून गुरुजीचे मर्जी खातर असावा ह्मणून च त्याची अशी दशा झाली. अरेरे! हें सर्व असेंच असेल तर हा केवळ आरंभशूरपणा दिसतो. आणि या दोन्ही गोष्टी पुढें न चालल्या तर रिकामा दांभीकडौल असेंही यास आमच्या सारखे ह्मणू लागतील. तसें न व्हावें अशी इच्छा आहे. कळावें ही विनंती.

वणी जिल्ह्यांतील
वकील.

### फाल्गुनोत्सव.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. महाराज गेल्या आठवड्यांत फाल्गुनोत्सव ह्मणजे शिमग्याचा सण झाला त्याविषयीं सण महात्मांत एका विद्वान कवीचें काव्य सविस्तर मी वाचिलें त्यांतील निवडक वेंचे आपले वाचणारांस माहितीसाठीं व करमणुकीसाठीं उतरून पाठविले आहेत मर्जीनुरूप छापण्याची कृपा व्हावी. या श्लोकांच्या शेवटच्या ४ श्लोकांत पुरातन ग्रंथांतील होळीचें मूळही सांगितलें आहे. कळावें हे विनंती.

एक
वाचक

### श्लोक

फाल्गुनांत शिमगा सण मोठा
या मधें जरि नसेलहिं पोटा
सर्व लोक करिताति तमाशा
खेळण्यांत धरिती बहु आशा॥१॥
पौर्णिमेस करिती बहु होळ्या
पांच सात नउं फोडुनि पोळ्या
ठोकुनी बहुत मारिति बोंबा
त्या कृतींत नच एकहि ठोंबा॥२॥

पोर थोर अवघेचि समान
फाल्गुनास करिती बहु मान
शंख वाद्य करुनी निजहातें
वर्णिती सकळ तत् विरुदातें॥३॥

पाडीन दांत ह्मणतां बहु रोष येतो
त्यातें स्वयेंचि, हलतां उखडोनि घेतो
सारे स्वयें मिळुनि जें करिताति, गोड
तें वाटतें ह्मणुनि बोंब दिसे न खोड ४
वारांगना त्वरित जात असे स्वमार्गें
तीच्या पुढें अणिक धांवति पाठिमागें
ह्या सज्जना बरि करी मग ती सुदृष्टी
दृष्ट श्रुता न कधिहीं बहु पुष्पवृष्टी ॥५॥
तीच्या शिव्याहि सुमना सम लागताती
शंखध्वनी करुनि फाराचि हासताती
सोडूनि नेसण शिरासचि बांधिताती
निर्लज्ज ते प्रतिपदींहि शिव्याच खाती६
विद्या बहू न करितां श्रम, येत नाहीं
ही फाल्गुनांतिल कशी सुलभा जनाही
केली समग्र मुखपाठ पहा पहा रे
हीच्या पुढें सकळ पंडितसंघ हारे ७
राडीमधें धरुनि टाकिति एकमेका
चेष्टो तशाच करिताति पहा अनेका
पोशाक शुभ्र करुनी तिकडून आला
राडीमधें धरुनि लोटिति सर्व त्याला॥८॥
पाटील देशमुख मुख्यहि कोतवाल
त्याचे धरोनि करितात बहूत हाल
केला जरी नृपतिनेंच बहूत लाड
कोणास कोण पुसतो धरि कोण पाड९

ऐसे हे खेळ नाना
परि जन करिती फाल्गुनाचे, मुखाने
बीभत्सोच्चार पूर्व
ध्वनि करिति बहू खेळताती सुखानें
क्रीडा ग्राम्या बहू ज्या
असति वदवती त्या न आह्मास, कामें
होती ज्या, ते कधीही
फुकट वय, न हें घालवीती रिकामें॥१०॥

### होळीच्या सणाचें मूळ.

दाढा विक्राळ जीच्या
गिरिसम कुचही नासिकारंध्र घोर
बाहू ताळा समान
प्रखरतर नखें अंकुशा तुल्य थोर
नेत्रें बारीक लाल,
प्रसृत मुख जिचें गव्हरातुल्य लांब
जिव्हा, मांड्याहि शुंडा
सम दिसति जिच्या पोटऱ्या स्थूळ खांब११
काळी काळी कभिन्न,
प्रविकट दशना राक्षसी घोर मोठी
होला नामी यमाची
प्रतिकृतिच जणों भीषणा लंबितोष्ठी
कामागारीं समस्ता—
नरनर धरुनी टाकिते दाढ भारी
तत्पीडेतें सुरांनीं
भिउनि विनवुनी प्रार्थिला अंधकारी १२
दुष्टा ती देइ कष्टा
मग पशुपतिनें फाल्गुनी पौर्णिमेला
सायंकाळीं विनष्टा
करुनि सुरवरा हर्ष अत्यंत केला
मागे वर्षास ती कीं
सकळ जन अशा उत्सवातें करोत

बीभत्सोप्त ' शंख
श्वानें मज वर द्या ह्या सणा आदरोत १३
कमागारांत तीच्या
पडुनि सुरनरीं, वेदना शंभुला जै
सांगोनी शंख केला,
तदनुकृति जगीं चालते, चित्त लाजे
बोलायाला परी हे
मुनि कथित असे मासमाहात्म्य त्याच्या
आधारें वर्णितों हा.
म्हणूनिच कतित्या साहिजे वर्णित्याच्या ॥ १४

---

# वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन वद्य १२ शके १७९८

---

## ब्रिटिश सरकार

### राजघराणें

एम्प्रे विक्टोरिया—जन्म २४ मे १८१९.
प्रिन्स कान्सर्ट ,, २६ आगष्ट १८१९
मृत्यू १४ डिसें. १८६१

प्रथम आपत्य— कन्या प्रिन्सेस रायल— जन्म तारीख २१ नोवेंबर १८४०. यांचे ता. २५ जा. १८५८ रोजीं प्रशियाचा क्राऊन प्रिन्स फ्रेडरिक विलियम यांबरोबर लग्न झालें. मुलें ८ आहेत.

द्वितीय—पुत्र प्रिन्स आफ वेल्स. जन्म ता. ९नो. १८४१. यांचे, तारीख १०मार्च १८६३ रोजीं डेन्मार्कची राजकन्या अलेक्झांड्रा जी ता. १ डिसें. १८४४ रोजीं जन्मली तिजबरोबर, लग्न झालें. यांचां आपत्यें ५:—

अलबर्ट विक्टर क्रिस्तियन एडवर्ड
जन्म ता० ८ जा० १८६४
जार्ज्य फ्रेडरिक अरनेस्ट अलबर्ट
जन्म ता० ३ जून १८६५
लुईस विक्टर अलेक्झांडर डागमार
जन्म ता० २० फे० १८६७
विक्टोरिया अलेक्झांड्रा ओलगा मेरी
जन्म ता० ६ जुलै १८६८
माद चारलोटी मेरी विक्टोरिया
जन्म ता० २६ नोवें० १८६९

तृतीय—कन्या प्रिन्सेस अलाईस माडमेरी जन्म ता० २५ एप्रिल १८४३. ता. १जुलै १८६२ रोजीं हिसी डार्मस्टाड च्या प्रिन्स लुईस यांशीं त्यांचें लग्न झालें यांस मुलें ६ आहेत.

चतुर्थ—पुत्र प्रिन्स आल्फ्रेड अरनेस्ट डयूक आफ एडिंबरो—जन्म ता० ६ आगस्ट १८४४. यांचें लग्न ता० २२ जानेवारी १८७४ रोजीं रशियाची ग्रांड डचेस मेरी अलेक्झांड्रोव्ना हिच्या बरोबर झालें. यांस २ मुलें आहेत.

पंचम—कन्या हेलिना आगस्टा विक्टोरिया. जन्म ता० २५ मे १८४६. यांचें ता० ५ जुलै १८६६ रोजीं शेलस्विगहाल्स्टनचा प्रिन्स क्रिश्चन यांजबरोबर लग्न झालें. यांस मुलें ५ आहेत.

षष्ठम—कन्या प्रिन्सेस लुई सी सी अलबर्ट. जन्म ता० १८ मार्च १८४८ यांचें ता० २१ मार्च १८७१ रोजीं मार्किस आफ लोर्न यांजबरोबर लग्न झालें.

सप्तम—पुत्र आरथर डब्ल्यू पेट्रिक अलबर्ट डयूक आफ कनाट. जन्म तारीख १मे सन १८५०,

अष्टम—पुत्र लिओपोल्ड जी डी आलबर्ट. जन्म ता० ७ एप्रिल १८५३ इ.

नवम—कन्या प्रिन्सेस हिस्ट्रिस मेरी विक्टोरिया फिडोर. जन्म ता. १३ए. १८५७

—

राजघराण्यांतील शिवाय मनुष्यें.

डयूक आफ लांवर्ट. जन्म २७मे १८१९.
डचेस आफ केंब्रिज ,, २५ जुलै १७९७
डयूक आफ केंब्रिज ,, २६ मा. १८१९
डचेस आफ मेक्लनवरो ,, १९ जुलै १८२२
डचेस आफ टेक ,, २७ नोवें. १८३३

---

### क्याबिनेट.

[ नेमणूक ता. २१ फेब्रुवारी १८७४ )

प्रिमियर आणि खजिन्याचे पहिले लार्ड राइट आनरबल अर्ल बेकनस्फील्ड पगार दरसाल ५०००० रुपये

लार्ड हाई चान्सेलर बारन केन्स पगार १००००० रुपये

लार्ड प्रेसिडेंट प्रिव्हीकौन्सिल डयूक आफ रिचमंड पगार २०००० रु.

लार्ड प्रिव्हीसील राइट आनरबल अर्ल बेकनस्फील्ड पगार २००००

फारेन सेक्रेटरी आफ स्टेट अर्ल आफ डर्बी पगार ५००००

कालनीचे सेक्रेटरी आफस्टेट अर्ल आफ कार्नार्वन पगार ५००००

होम सेक्रेटरी आफस्टेट राइट आनरबल आर अशटन क्रास एम पी पगार ५०००० रु.

लढाईचे सेक्रेटरी आफ स्टेट राइट आनरबल ग्याथोर्न हार्डी एम पी.प. ५००००

हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ स्टेट मारकिस आफ स्यालिस्बरी पगार ५०००० रु.

चान्सेलर आफ दि एक्सचेकर राइट आनरबल सर स्टाफोर्ड नार्थकोट बारोनेट एम पी पगार ५००००

फर्स्ट लार्ड आफ धि आडमिरलटी राइट आनरबल ज्यार्ज्य वार्ड हंट एम पी पगार ४५००० रु.

पोस्टमास्तर जनरल लार्ड जान जे आर म्यानर्स एम पी पगार २५०००

शिवाय मेंबर

ट्रेड बोर्डाचे प्रेसिडेंट राइट आनरबल सर सी बी अडर्ली एम पी यांचा पगार २०००० रुपये

लोकल गव्हर्मेंट बोर्डाचे प्रेसिडेंट राइट आनरबल जार्ज्य स्लेटर बुथ एम पी पगार २०००० रु.

ऐर्लंडचे चीफ सेक्रेटरी राइट आनरबल सर मिचल विक्सबीच एम पी पगार रु. ४४२५०

इजुकेशन कौन्सील कमिटीचे व्हाइस प्रेसिडेंट राइट आनरबल व्हायकौंट स्यांडन एम पी पगार २०००० रु०

ल्यांकयास्टरच्या डचीचे च्यान्सेलर ले. कर्नेल राइट आनरबल थामस ई टेलर एम पी पगार २०००० रु.

फील्ड मार्शल कम्यांडिंग इन चीफ हिज रायल हाइनेस डयूक आफ केंब्रीज

अटर्नी जनरल सर जान हालकर एम पी पगार ७०००० रु.

सालिसिटर जनरल सर एच एस गिफर्ड पगार ६०००० रु.

अडमिरलटीचे सेक्रेटरी आन. अलगर जान एफ इगरटन एम पी पगार प्रत्ये २००००.

ऐर्लंडचे लार्ड लेफ्टिनेंट डयूक आफ मारलबरो पगार २००००० रु.

स्काटलंडचे लार्ड आडवोकेट राइट आनरबल ई डब्ल्यु वाटसन

### पार्लमेंट सभा.

ग्रेट ब्रिटन देशाचा कायदे करण्याचा मुख्याधिकार पार्लमेंटकडे आहे. पार्लमेंट भरविण्याचा अधिकार फक्त राजाकडे आहे. अपखुशीनें पार्लमेंट सभा राजाच्या मरण प्रसंगाशिवाय कधींही भरत नाहीं. व राजास पार्लमेंट भरविणें अवश्य वाटतें तेव्हां ३५ दिवस पूर्वी प्रिव्ही कौन्सील च्या सल्यानें च्यान्सरी मार्फत सर्व सभासदांस राजाज्ञा जाते.

हल्लीची पार्लमेंट पद्धती दुसरे एडवर्ड राजाचे कारकीर्दीपासून सुरू आहे. तिच्या दोन सभा आहेत. एक हौस आफ लार्डस व दुसरी हौस आफ कामन्स.

पहिली सभा वडे लोकांची आहे. त्यांना ५ प्रकारानें त्या सभेचे मेंबर होण्याचा अधिकार मिळतो. १ वंश परंपरेनें. २ राजाज्ञेनें. ३ इंग्लिश बिशप असल्यानें. ४ कोणा ऐर्लंडच्या वड्या गृहस्थाची हयातीपर्यंत निवडणूक झाल्यानें. ५ कोणा स्काटलंडच्या वड्या गृहस्थास पार्लमेंट भरतें तेथपावेतोंच निवडल्यानें.

या वडे लोकांच्या ह्मणजे हौस आफ लार्डच्या सभेमध्यें ४९३ सभासद आहेत ते असे:—

४ राजवंशांतील वडे लोक.
२ आर्च बिशप.
२८ डयूक.
३२ मार्किस
१६९ अर्ल.
२७ व्हायकौंट.
२४ बिशप
१९५ ब्यारन
१६ स्काटलंडचे वडे लोक.
२० ऐर्लंडचे वडे लोक.

---

५१७

यांत कांहीं नावें अल्पवयी सभासदांचीं आहेत तसेंच कांहीं सभासद नेमणुकेनें व वंशपरंपरेनें असल्यामुळें त्यांचीं नावें दुबार आलीं आहेत ह्मणून संख्या वाढली आहे.

हौस आफ कामन्स सभेमध्यें गाव, शहरें, व प्रांत यांनीं निवडून दिलेले सभासद असतात त्यांची संख्या हल्लीं खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

| | |
|---|---|
| इंग्लंड आणि वेल्स............ | ४८७ |
| स्काटलंड .......................... | ६० |
| ऐर्लंड ............................ | १०५ |
| | ६३२ |

---

## दारिद्र.

या सृष्टींत दारिद्र्य हें सुखानें व्यवहार होण्यास मोठें प्रतिकूल आहे. व आमच्या लोकांची अशी समजूत आहे कीं पूर्वजन्मीं कांहीं घोर पातक करणें त्याचें फल या जन्मीं दरिद्र्याच्या पोटीं जन्मास येणें हें आहे. व ग्रंथांतरीं तरी याची जागोजाग विटंबना केली आहे. त्यांतील कांहीं पद्यें आह्मी एथें सांगतों.

एक कवि ह्मणतो

श्लोक

दग्धं खांडव मर्जुनेन बलिना
दिव्यै र्द्रुमैर्भूषितं ।
दग्धा वायुसुतेन रावणपुरी
लंका पुनः स्वर्णभूः ॥
दग्धः पंचशरः पिनाकपतिना
तेनाप्ययुक्तं कृतं,
दारिद्र्यं जनतापकारक मिदं
केनापि दग्धं नाहि ॥१॥

अर्थ— अर्जून महान् बलवान त्यानें खांडववन जाळिलें तेणेंकरून कल्पद्रुमासारखे भूषायमान वृक्ष नाहींसे झाले. तसेंच मारुतीनें रावणपुरी जी सुवर्णमय लंका ती जाळून टाकिली; त्याचप्रमाणें शंकरानीं मदनास जाळिलें अशीं मोठमोठ्यांनीं मोठमोठीं कामें केलीं पण सर्व लोकांना ताप देणारें जें दारिद्र्य तें कोणीही जाळिलें नाहीं.

यावरून सान्या दुनियेंतून दरिद्र जळून जाऊन नाहींसें व्हावें व सर्व लोक सुखी असावे असा कवीचा मतलब.

दुसऱ्या एकानें दरिद्रास कंटाळून ह्मटलें आहे.

श्लोक

दारिद्र्य शोचामि भवंत मेव
मस्मच्छरीरे सुहृदि त्युषित्वा
विपन्न देहे मयि मंदभाग्ये
ममेति चिंता क गमिष्यासि त्वं॥ २ ॥

अर्थ— हे दरिद्रा, माझ्या शरीराचा आश्रय करून तूं चिरकाल राहिला आहेस पण मला अशी चिंता प्राप्त झाली आहे कीं हा माझा मंदभाग्याचा देह नष्ट झाला ह्मणजे तुला दुसरें सुस्थळ कोठें मिळेल ? ह्मणून मी फार दुःखी आहे.

तसेंच एक कवि ह्मणतो: —

श्लोक

हे दारिद्र्य नमस्तेस्तु
सिध्धोहं त्वत्प्रसादतः
लोकान् पश्याम्यहं सर्वान्
नमां पश्यति कश्चन ॥ ३ ॥

हे दरिद्रा, तुला नमस्कार असो, तुझ्या योगानें मी मोठा सिद्ध पुरुष बनून गेलों. ह्मणजे असें झालें आहे कीं मी सर्व दुनियेला पहातों पण मला कोणी पहात नाहीं.

हा श्लोक फार उत्तम व मोठा मनोवेधक आहे. दरिद्री मनुष्याची लोक फार अवगनणा करितात व तो या दुनियेंत कोणी मनुष्यच नव्हे असें मानितात हें चांगलें दाखविलें आहे.

दरिद्र्य किती कष्टकारक आहे हें एकानें या पुढच्या आर्येंत दाखविलें आहे.

आर्या

दारिद्र्यान्मरणाद्वा
मरणं संरोचते न दारिद्र्यं
अल्प क्लेशं मरणं,

दारिद्य मनंतकं दुःखं ॥ ४ ॥

ईश्वर जर आह्मास दरिद्र किंवा मरण यांतून एक पतकरा असें सांगेल तर आह्मी मरण पसंत करूं. पण दरिद्र नको. कारण मरणाचे क्लेश अल्प आहेत आणि दरिद्रसंबंधी दुःख केवळ अनंत आहे.

आतां या काव्यांतून अतिशयोक्ती जरी आहे तरी ती काढून टाकून केवळ मूळ पाहिलें तर दरिद्र दुःखास कारण आहे असें त्यांवरून व व्यवहारांतील प्रकारावरूनही दिसून येतें. कोणी जन्मतः दरिद्री असणें ही ईश्वराच्या अवकृपेची गोष्ट समजली पाहिजे. तरी तशाही प्रकारच्या मनुष्यानीं झटून विद्याभ्यास केला व प्रयत्न केला तर त्याचें दरिद्र जाऊन त्यास चांगले श्रीमंतीचे दिवस येतात असेंही पुष्कळ पाहण्यांत आलें आहे ह्मणून कोणी दरिद्री जनानीं हताश होऊं नये; त्याचप्रमाणें श्रीमान व सुखी जे लोक आहेत त्यांनींही वरील कवींचे बोल लक्ष्यांत ठेवून आपले संपत्तीचा उधळेपणानें नाश करून परम दुःखकारक जें दरिद्र तें आपणावर ओढवून न घेण्याविषयीं सावध रहावें हें उक्त आहे.

सदरील तिसरे श्लोकावरून ही एक बोध सुचतो कीं, कोणी मनुष्य दरिद्री आहे एवढ्याचवरून त्याची अवगणना करणें फार निंद्य आहे. दारिद्रीपणा हा दुर्गुण नव्हे किंवा कांहीं दुर्व्यसन नव्हे कीं ज्याचा मनुष्यमात्रांनीं तिटकारा करावा. उलटें आपणास अनुकूळ आहे तर आपण यथाशक्ति सहाय देऊन त्यांस संतोषवावें व त्यांचें दुःख हलकें करावें. कारण आपणावर पुढें कसा प्रसंग येईल याचा कांहीं नेम नाहीं. कोणी दरिद्री आहे एवढ्याच सबबेनें त्याला आपण सहसा हसूं नये यावर एक कवि ह्मणतोः—

श्लोक.

आपद्गते हससि किं द्रविणांध मुग्धे
लक्ष्मी स्थिरा न भवतीति किमत्र चित्रं
त्वं किं न पश्यसि घटे जलयंत्रमध्ये,
रिक्ता भरंति भरिता पुनरेव रिक्ता ९

अर्थ— हे संपत्तीनें अंध झालेल्या मूर्खा, विपत्तिग्रस्तास कां हसतोस? लक्ष्मी कांहीं स्थिर नाहीं, मडक्याचें रहाट गाडगें असतें तें तूं कधीं पाहिलें नाहींस काय? त्यांतील भरलेलें मडकें रिकामें व्हावें, व रिकामें असलेलें भरावें असा क्रम हमेशा चाललेला असतो, ह्मणजे तो संपत्तीमान होऊं शकेल व तूं विपत्तिप्रत पावशील, यासाठीं त्याला हसूं नको. हा बोध फार चांगला आहे.

---

### वस्त्रांचा नवीन तऱ्हेचा माग.

कलकत्याकडे बाबु सितानाथ घोस या नावाच्या एका कुशल गृहस्थानीं वस्त्रें विणण्याचा एक कारखाना काढिला आहे. त्याची यांत्रिक कृति अगदी सुलभ असून केवळ नव्या तऱ्हेची आहे. व तीं यंत्रें हातानीं, वाफेनें, किंवा दुसऱ्या कोणत्याही शक्तीनें, चालविण्याजोगीं आहेत. व त्यापासून कामही पुष्कळ होतें. त्यांनीं य आपल्या नव्या परीचा आपणास पुष्कळ वर्षें उपभोग घेतां यावा ह्मणून सन १८५९ चा आक्ट १५ प्रमाणें" अनन्यग्राह्याधिकार मिळविण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास अर्ज केला व त्यांच्या युक्तींत दुसरे कोणाची कांहीं उसनवारी नाहीं असा तपास करून सरकारानें त्यांस त्या यंत्राचा अनन्यभावें उपभोग घेण्याची सनद दिली असें समजण्यांत आलें आहे. आतां त्या यंत्राविषयीं विशेष माहिती लोकांस व्हावी व सदहू बाबू यांनीं तीं यंत्रें सर्वत्र प्रसृत करावींत व त्यांपासून लोकांचा उपयोग, सोय, व नफा व्हावा असें आह्मी इच्छितों.

---

### अन्नसत्रें.

दुष्काळनिमित्तानें शिंदेसरकारानीं दक्षिणेंत अन्नसत्रें घालण्याची योजना केली आहे ती येणेंप्रमाणेः—

| | | |
|---|---|---|
| पुण्यास | १००० | ब्राह्मण |
| पंढरपुरास | ५०० | ,, |
| नगरास | ५०० | ,, |
| नाशकास | ३०० | ,, |
| त्रिंबकेश्वर | २०० | ,, |
| | २५०० | |

याप्रमाणें नित्य अडीचहजार मनुष्यांस अन्नदान मिळणार ही मोठी वर्णनीय गोष्ट आहे. व हिजबद्दल शिंदेसरकारची आह्मी तारीफ करितों. व इच्छा करितों कीं यांच्याप्रमाणें दुसरे राजेलोकांचेठायीं असा धर्माचा अंकुर उद्भवल्यास त्यांची थोरवी व कीर्ति वाढून देशांतील अन्नावाचून मरणारे लोकांस त्यांनीं वाचविलें असें होईल. दुसरी आमची अशी इच्छा आहे कीं या सत्रांतून सर्व जातीच्या अन्नार्थ्यांस अन्न द्यावें ह्मणजे फार चांगलें होईल. शास्त्रही अन्नदान, जीवदान याविषयीं ज्ञाति पाहूं नये असें आहेच, ह्मणून तशा धोरणानें धर्म होईल तर तो देशाच्या संरक्षणास उपयोगी पडून विशेष श्रेयस्कर होईल यांत संशय नाहीं.

---

## वऱ्हाड

कर्नल अलार्डाईस साहेब जुडिशियल कमिशनर ९ वे तारखेस सायंकाळचे गाडींतून येथून गेले ते कांहीं दिवस महाबळेश्वरास राहून नंतर विलायतेस जातील. ते वऱ्हाडांतून कायमचे जाणार ह्मणून एथील लोकांनीं त्यांस विड्याकरितां टौनहालांत बोलाविण्याची खटपट केली होती परंतु त्यांनां ती गोष्ट न रुचल्यामुळें त्यांनीं मान्य केली नाहीं. नंतर ते जाण्याच्या दिवशीं स्टेशनावरच त्यांस लोक पान सुपारी देणार होते पण हाही विच्यार त्यांस पूर्वींच कळून त्यांनीं तो मना केला. मग नुसते भेटण्यास मात्र लोक गेले होते. पण त्यांशीं दोन शद्ब बोलण्यास त्यांस आवडलें नाहीं किंवा फुरसुद झाली नाहीं कोण जाणे. युरोपियन स्त्रिया पुरुषांस आगत स्वागत विच्यारून ते गाडींत बसून चालते झाले. त्याच गाडींतून त्यांस भेटण्यास कर्नल नेभार्ड साहेब कमिशनर उमरावतीहून आले होते. तसेच खालीं लिहिलेले तहशिलदारही त्यांस भेटण्याचे संबंधानें या आठवड्यांत एथें आले होते.

१ रा. रा. गोविंदराज अप्पा
१ रा. रा. त्रिंबकराव यशवंत
१ रा. रा. गोविंदराव यशवंत
१ रा. रा. देवराव जयकृष्ण
१ मे० मुबारक अली
१ मे० याद अली

---

रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांनीं आपली बदली व्हावी असा अर्ज केला आहे व अडगाव कोर्टाचें काम, नवीन मुनसफ होणार त्या योजनेनें दोन कोर्टांस वाटलें जाणार तेव्हां त्यांची बदली होणेंही साहजिक आहे. आह्मांस वाटतें त्यांस वाशिमास नेमतील.

---

मे. दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर यांची ५।६ दिवसांपासून ज्वरानें प्रकृति बिघडली आहे वतें निजून आहेत. ईश्वरकृपेनें त्यांस लवकर आरोग्य व्हावें. त्यांनीं हवा पालटण्यासाठीं महाबळेश्वरास जाण्याकरितां ६५ दिवसांचे रजेचा अर्ज केला आहे. त्याप्रमाणें रजा मिळून थोडा आराम झाला ह्मणजे ते तिकडे जातील.

---

मेजर हडलस्टन साहेब गेले सोमवारीं रजेवर गेले. त्यांनां पानसुपारीचा बेत वेळ थोडा असल्यामुळें स्टेशनावरच झाला. व तो त्यांनीं लोकरंजनार्थ संतोषानें मान्य केला. त्या दिवशीं मे० बाकरअली तहशिलदार यांणीं सर्व युरोपियन लोकांचे गळ्यांत पुष्पांचे हार घातले व सर्व युरोपियन आणि नेटिव लोकांस विडे दिले. नंतर हडलस्टन साहेबांनीं सर्वांस सलाम करून त्यांची रजा घेतली व गाडींत बसून चालते झाले.

---

मे० बेल साहेब जुडिशियल कमिशनर २० वे तारखेस मुंबईस येतील असें ह्मणतात.

---

मि० लायल साहेब विलायतेहून परत येऊन रजपुतान्याचे एजंटीचा च्यार्ज घेण्याकरितां अबू पहाडाकडे गेले.

---

उन्हाळा बराच होऊं लागला आहे. हा फाल्गुनमास असून ज्येष्ठापूर्वीं अधिक महिनाही या वर्षीं आहे तेव्हां मृग लागे पर्यंत कशी कहाली होईल त्याचें आतांच अनुमान होतें.

---

मे० बाकरअली अकोल्याचे तहशिलदार यांस १०० रुपये पर्यंत दिवाणी दावे पाहण्याचा व थर्डक्लास माजिस्त्रेटचा अधिकार मिळाला. बाकरअली यांचा स्वभाव फार चांगला असून ते मनाचे थोर आहेत. थोर कुळाप्रमाणें उत्तम शील असणें मनुष्यास मोठें कीर्तिकारक होय, त्याप्रमाणें पाहतां यांच्या तीन पिढ्या वऱ्हाडांत मोठ्या नामांकित झाल्या आहेत. व सुमार १०० वर्षांपासून यांची वऱ्हाडांत वस्ती आहे. यांचे आज्याचा लाखों रुपयांचा रेशमाचा व्यापार होता. तसेंच उमरावतीच्या तटाचें जें लाखोरुपयांचें काम झाले त्याजवर निजाम सरकाराकडून बाकर अली यांचे आज्याची देखरेख होती व यांचे वडील कर्नल शियर साहेब यांचे शिरस्तेदार होते. तेही वऱ्हाडांत नामांकित होते. यांचे आजे हिंदुस्थानांतून आल्यावर त्यांनीं कित्येक आपले आप्त स्वकीय इकडे आणिले व त्यांचे कित्येक पुरुष इकडे नामांकित पदावरून आहेत हें बहुतांस ठाऊक असेल. असो. आमची इच्छा आहे कीं मे० बाकरअली यांस कायमची तहशिलदारी मिळावी.

---

बाळापुरचे अक्टिंग तहशिलदार रा. रा. गिरराव रामचंद्र यांस १०० रु. पर्यंत दिवाणी दावे पहाण्याचा व सेकंडक्लास माजिस्त्रेटचा अधिकार मिळाला. त्याचप्रमाणें मे. किशोरखान मलकापुरचे तहशि. यांस १०० रुपयांचा दिवाणी व थर्डक्लास माजिस्त्रेटी अधिकार मिळाला.

---

कर्नल नेभार्ड साहेब कमिशनर शुक्रवारीं एथें आले होते ते शनिवारीं डिपुटी कमिशनर आफिसची तपासणी करून बाराचे गाडींतून परत उमरावतीकडे गेले.

---



## विक्रीस तयार,

### स्कन्दपुराणांतर्गत सह्याद्रि खंड.

हा ग्रंथ मराठी टीकेसह प्रसिद्ध करण्याबद्दल चार वर्षांपूर्वीं मुंबईंतील मराठी वर्तमानपत्रांत जाहिराती प्रसिद्ध होत होत्या; इतकेंच नाहीं, पण त्या जाहिराती देणाऱ्यानें दर प्रतीस १० रुपये प्रमाणें अगाऊ पैसाही घेतला आहे. असें असून अद्याप त्यांच्याकडून पुस्तक प्रसिद्ध झालें नाहीं. हल्लीं या ग्रंथाच्या मूळ प्रति डाक्तर जे. जर्सनदा कुन्हा याणीं निर्णयसागर छापखान्यांत छापून काढल्या आहेत. हें काम त्यांनीं काशी, कोचीन, कर्नाटक व इतर ठिकाणच्या चौदा प्रती मिळवून दुसऱ्या शास्त्र्यांच्या मदतीनें ताडून पाठांतर आढळलें तें टीपेंत दाखविलें आहे; आणि रेणुकामाहात्म्य, चंद्रचूडामहात्म्य, नागाह्वयमाहात्म्य, वरुणापुरमाहात्म्य, कामाक्षीमाहात्म्य, व मांगीशमाहात्म्य इतके भाग जोडले आहेत, पुस्तकास कागद उत्तम घातले असून छापणावळ फारच सुरेख आहे; आणि इतकेंहि असून किंमत फार थोडी ह्मणजे ४ रुपये ठेविली आहे.

पुस्तकें मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत खालीं सही करणार यांजकडे मिळतील. बाहेर गांवच्या लोकांस टपालखर्च आठ आणे जास्त पडतील.

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी
म्यानेजर, विविधज्ञान विस्तार



---

## वर्तमानसार

राव बहादूर गोपाळराव हरी देशमुख जाईट जडज नाशकास ता० २८ फे० रोजीं येऊन आपले कामावर रुजू झाले.

कापसाबद्दल कायदा— गेल्या शनवारीं मुंबईची कायदेकौन्सिल सभा भरून कापसाच्या कामांत दगाबाजी होण्याचा प्रतिबंध व्हावा एतदर्थ कायद्याचा मसुदा

ह्या सभेपुढें आला होता त्याचें तिसरें वाचन होऊन तो पास झाला.

मुंबईच्या म्युनिसिपालिटीच्या टौनकौन्सिलच्या चेरमनच्या जाग्यावर मि. जे ए म. म्याक्लीन यांची नेमणूक झाली.

विलायतेंतील सरकारी ग्याझेटमध्यें सर रिचर्ड टेंपल यांची मुंबईचे गवर्नर ह्मणून झालेली नेमणूक प्रसिद्ध झाली.

सोलापुर—हल्लीं इंजिनियर खात्यांत मजूर लोकांस वेळचेवेळेस पगार मिळत नसल्यामुळें फारच हाल होत आहेत.

अयोध्येच्या जवळ फैजाबाद येथें मोठी यात्रा अगर मेळा जमला होता. त्या प्रसंगीं तेथें सुमोरें पांच लक्ष मनुष्य जमलें होते. ता. २५ रोजीं गर्दीनें पन्नास साठ मनुष्यें चिरडून मेलीं असें ह्मणतात.

मद्रासमध्यें जमीन गहाण ठेवणारी व पैसा कर्जाऊ देणारी ह्मणून एक मंडळी स्थापन झाली आहे तिचें भांडवल पांच लक्ष रु० आहे. अडीच शें रु० चा एक भाग याप्रमाणें दोन हजार भाग केले आहेत असें समजतें.

धुळें एथील ट्रेनिंगकालेज तारीख १० फेब्रुवारीपासून बंद झालें.

धारवाड जिल्ह्यांत रेल्वेचा रस्ता सुरू करावा अशाविषयीं विचार करण्याकरितां मद्रासेस ड्यूक आफ बकिंगहाम मद्रासचे गवर्नर व सर रिचर्ड टेंपल यांनीं सभा भरविली होती त्यावेळेस बहुतेक मुंबईचे व मद्रासचे ( रिप्रेझेंटेटिव ) इंजिनिअर्स आले होते. रस्ता तावडतोब सुरू करावा व दुष्काळ पीडित लोकांपैकीं जे लोक तिकडेस मजूरी करण्यास जाण्यालायक आहेत त्यांस तिकडेस पाठवावे असें ठरल्याचें कळतें.

सर जंग बहादूर नेपाळच्या महाराजांचे मुख्य प्रधान हे तारीख २५, फेब्रुवारीस तेराईत [ पहाड ] एकाएकी मरण पावले. मरणाचें कारण समजलें नाहीं. यांचे जागीं यांचे वडील बंधू रणदीपसिंग के सी एस आय यांस नेमल्याचें समजतें.

टाइम्स आफ इंडियाचें लंडन एथील बातमीदाराच्या पत्रावरून कळतें कीं रशिया व टर्की यांमध्यें युद्ध सुरू झाल्यास सुलतानाचा आपल्या फौजेकरितां पुष्कळ पगार देऊन इंग्रज लश्करी अधिकारी लोक ठेवण्याचा इरादा आहे असें विलायतेंतील कित्येक लष्करी अधिकाऱ्यांस समजल्यावरून पुष्कळ पगार मिळण्याच्या आशेनें त्यांनीं आपल्या जाग्यांचे राजीनामे आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केले व आह्मी सुलतानाची चाकरी करण्यास कबूल आहोंत असें प्रख्यात कर्नल व्हालेंटाईन बेकर यांचे मार्फत तुर्की दरबारास कळविलें.

थोड्याच दिवसांत बंगाल्यांत कांहीं नेटिव लोक शेतकी संबंधीं आणखी एक वर्तमानपत्र काढणार आहेत. यांत निरनिराळ्या देशांतील शेतकीची क्रिया, तिची सुधारणा व या विषयाचे संबंधानें दुसऱ्या कित्येक गोष्टी या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करणार आहेत. असल्या वर्तमानपत्राची आमचे इकडेही फार आवश्यकता आहे.

दुष्काळाचा कडाका दिवसें दिवस वाढत चालला आहे उन्हाळ्यांत काय होईल याचें आज कांहीं अनुमान करवत नाहीं. सरकारानें सुरू केलेल्या कामावरील मजुरीचे दर कमी केल्या कारणानें मजूरदाराचे फार हाल होऊं लागले आहेत. कलकत्ता एथील " इंग्लिशमन" नावाचे वर्तमानपत्रास मद्रासेहून पत्र आलें आहे त्यांत लिहिलें आहे कीं, लोकांस खावयास मिळत नसल्यानें व मजुरीपासून जें कांहीं मिळतें तें पुरत नसल्या कारणानें करनूळ प्रांतांत चोऱ्या वगैरे होऊं लागल्या आहेत. त्याचे बंदोबस्तासाठीं सरकारानें १५०० पोलिस शिपाई अधिक ठेविले आहेत. आतां असा खर्च करणें त्यापेक्षां मजूरीचा दर कमी न करणें हें सरकारास फार योग्य परंतु सरकार या गोष्टीकडेस योग्य लक्ष देत नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. याच पत्रांत दुसरें असें लिहिलें आहे कीं, पूर्वीच्या मजूरीचे दरांत बायका व त्यांच्या लहान मुलांचीही पोटें भरत परंतु दर कमी झाल्यापासून ज्या मजूरदारणीस, मजूरी न करण्यासारखीं लहान मुलें आहेत त्यांची फार हलाकी होऊं लागली आहे. याचा परिणाम काय होईल हें सांगणें नको. डेकन हेरल्ड पत्रास सोलापुराहून पत्र आलें आहे त्यावरून समजतें कीं, सोलापुराकडेस रेलवेवर धान्य ज्या ज्या ठिकाणीं आहे तेथें अतिशय चोऱ्या होऊं लागल्या आहेत व त्यांचे बंदोबस्तासाठीं रेलवे कंपनीस पुष्कळ लोक ठेवावे लागले आहेत. आतां दुष्काळामुळें चोऱ्या होणें हें स्वाभाविक आहे. परंतु मजूरी कमी केल्यास चोऱ्या अधिक होऊं लागतील या विषयीं सरकारानें लवकरच विचार करावा. नें. ओ.

## सृष्टिजन्य ईश्वरज्ञान.

पदार्थविज्ञानशास्त्राच्या अनेक शाखा आहेत त्यांचा अभ्यास व मनन केलें असतां मनुष्यमात्रास मुख्यत्वेंकरून तीन फायदे होतात. एक तर परमेश्वराची शक्ति, ज्ञान व दया दृष्टोत्पत्तीस येऊन त्याविषयीं पूज्यबुद्धि मनांत उत्पन्न होते. दुसरें, जसें शरीर पोषणार्थ अन्न पाहिजे तसेंच मनास विचार हें एक अन्न आहे. तर ईश्वरी नियमाचा विचार केला असतां मनास आल्हाद होतो. तिसरा उपयोग हा कीं, त्या नियमापासून आपण ऐहिक सुख कसें प्राप्त करून घ्यावें ह्याकडे अनेक लोकांचीं मनें लागून देश समृद्ध होतो.

आतां रसायन शास्त्राविषयीं थोडासा विचार करूं. आह्मांस जें कांहीं ठाऊक आहे, ज्याचा आह्मांस कोणत्याही ज्ञानेंद्रियानें किंवा मनानें बोध होतो त्याचा चैतन्य किंवा जड यांतून एकामध्यें अंतर्भाव झालाच पाहिजे. चैतन्याचा आणि रसायन शास्त्राचा संबंध नाहीं. जड ह्मणजे ज्ञानरहित वस्तूंची भिन्नाभिन्नता, त्यांचा उपयोग इत्यादिकांचा विचार रसायनशास्त्रांत होतो. जसे ईश्वराचे नियम आह्मांस समजतात व त्याप्रमाणें चालण्याविषयीं आह्मांतून कित्येक प्रयत्न करितात, तसेच जड वस्तूंनाहीं ईश्वरानें नियम लावून दिले आहेत. भेद इतकाच कीं, अशा वस्तूंस त्या नियमांविषयीं कांहीं एक ज्ञान नसतांही या नियमाच्या बाहेर त्या कधींही चालत नाहींत. ज्ञानरहित वस्तूंचे मुख्य दोन वर्ग होतात. एक निर्भारशक्ति ह्मणजे तेज, उष्णता, विद्युत् इत्यादि कीं, ज्यांस वजन नाहीं व दुसरा तांबें, लोखंड इत्यादि सभार वस्तू. चैतन्य, निर्भारशक्ति व सभार परमाणु या तिहींचें नानाप्रकारें एकीकरण व पृथक्करण करून ईश्वरानें हें विश्व बनाविलें आहे असें जेव्हां आपणास समजतें तेव्हां किती आनंद होतो बरें! आह्मांस संयोग वियोगावरून तरी सर्व वस्तु बनविण्याचें सामर्थ्य आहे काय? निर्भारशक्ति मिळून एक. पण प्रकाश, उष्णता, विद्युत्, लोहाकर्षणशक्ति, गुरुत्वाकर्षणशक्ति वगैरे तिचीं रूपांतरें आहेत. आह्मांस कृतीनें उष्णता व लोहचुंबकशक्ति यांपासून वीज, व विजेपासून व घर्षणापासून उष्णता करतां येते. एकाचें रूप दुसऱ्यास स्थित्यंतरानें येतें.

परंतु ही शक्ति काय आहे हें बरोबर कोणास माहित नाहीं. तिच्या परिणामावरून आपणास तिच्या अस्तित्वाविषयीं व गुणाविषयीं बोध होतो. आपल्या भुगोलाच्या सभोंवतीं पृष्ठ भागापासून सुमोरें २४ कोसपर्यंत वातावरण आहे. तसाच वायूसारखा दुसरा ईथर ह्मणून पदार्थ सर्व विश्वभर पसरला आहे असें कित्येक धूमकेतूंच्या आक्रमणामध्यें थोडासा प्रतिबंध होतो त्यांवरून व दुसऱ्या कारणांवरून ज्योतिषी लोक ह्मणतात. ह्या पदार्थाला वजन असेल तर फारच थोडें व तो वायूपेक्षां असंख्यपट पातळ आहे असेंही त्यांचें अनुमान आहे. याविषयीं मनांत चांगली कल्पना येण्याकरितां तो पदार्थ तळ्यांतल्या पाण्यासारखा आहे असें मानूं. पाण्यांत लहानसा दगड टाकला असतां जशा लहान लहरी उत्पन्न होऊन त्या मोठ्या होऊन कडेस आपटतात तसाच कांहींसा प्रकार ईथर समुद्रांत घडून प्रकाश, उष्णता, वगैरे एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं जाते. त्या लाटांच्या गमनावांचून दुसरा उष्णता ह्मणून पदार्थच नाहीं. हवा नसती तर जसा आह्मांस कोणताही स्वर ऐकूं आला नसता तसेंच ईथरचा समुद्र नसता तर आह्मांस उष्णता, प्रकाश, वगैरेंचा भास झाला नसता. या लाटांच्या क्रमणामध्यें निरनिराळे प्रकार असल्यामुळें वीज, प्रकाश, उष्णता, वगैरे निरनिराळीं रूपें दृष्टोत्पत्तीस येतात. वस्तुतः शक्ति एकच आहे असें तत्वज्ञान्यांचें मत आहे. आतां या प्रत्येक रूपांतराचा विचार थोडा थोडा पुढें करूं. सु. प.

## चिनी लोक.

चिनी लोकांविषयीं जर विस्तारानें सांगूं लागलें तर त्यांच्या गोष्टींचा एक मोठा ग्रंथच होईल; तर ह्या लहानशा पत्रांत आह्मी त्यांच्या दोन चार चालीविषयीं मात्र थोडें सांगतों.

त्यांचें एक मुख्य लक्षण असें आहे कीं, पुरुष आपल्या डोकीवरचे केंस कधीं कापीत नाहींत, तर ते लांब वाढूं देतात आणि त्यांची वेणी घालितात; व तिला आपल्या पाठीवर लोंबूं देतात. दुसऱ्या देशच्या लोकांस यांत कांहीं शोभा दिसत नाहीं. पण ते चिनी लोकांच्या वेणीला त्यांचीं शेपटें ह्मणतात. आणखी चिनी लोकांच्या धर्माचा असा एक नेम आहे कीं, जर कोणाची वेणी कापली जाती, तर त्याला देशांतर करावयास लावावें किंवा जर तो दुसऱ्या देशास गेला, आणि वेणी कापून आपल्या देशास परत आला तर त्याच्या लोकांनीं त्याला ओळखूं नये व आपल्या घरांत घेऊं नये. थोड्या वर्षांपासून चीन देशच्या मोठमोठ्या शहरांत कांहीं तरुण मनुष्यांनीं दुसऱ्या देशच्या लोकांच्या सहवासानें आपल्या कित्येक चाली बदलल्या आहेत. त्यांपैकीं एक ह्मणजे त्यांनीं आपली वेणी काढून टाकली आहे. ह्मणून त्यांच्या नातलगांस व दुसऱ्यांस फार वाईट वाटतें आणि आपल्या धर्मामध्यें फेरफार होण्याची त्यांस धास्ती वाटूं लागली आहे.

बायकांमध्येंहि एक चमत्कारिक लक्षण आहे. तें असें कीं, ज्या बायका उंचपदवीच्या आहेत, त्यांचे पाय फार लहान आणि थोटे दिसतात; आणि हें कशावरून ह्मणाल, तर त्या लोकांस लहान पाय फार आवडतात. जरी एकादि बायको दिसण्यांत कुरूप असली तरी चिंता नाहीं, तिचे पाय मात्र लहान असावेत, ह्मणजे तिला सन्मान मिळतो. याकरितां मुली लहान वयाच्या असतांना त्यांचीं आईबापें त्यांचे पाय आवळून बांधितात आणि रात्रंदिवस तसेच बांधलेले ठेवितात. व त्या चालूं लागल्या ह्मणजे लांकडाचे लहान लहान जोडे त्यांच्या पायांत घालून, ते हमेशा पायांतच राहूं देतात; मुलीना तेणेंकरून, दुःख आणि इजा होती, तरी ते मनावर घेत नाहींत. कारण, त्यांस वाटतें आह्मी केवळ त्यांचे हित पहात आहों. मुलगी वाढत जाती पण ते तिचे जोडे वाढवीत नाहींत, ह्मणून ती प्रौढ होती तेव्हां तिचे पाय बाळकांच्या पायांप्रमाणें लहानच राहतात, अशा बायांस फार चालतां येत नाहीं, ह्मणून त्या आपल्या पायांनीं लोकांस दर्शवितात कीं, आह्मी मातबर आहोंत. आमच्यानें मेहनत व मजूरी करवत नाहीं, यास्तव आह्मी उगीच बसून राहतों. जर त्यांस बाहेर फिरावयास जायाचें असलें तर त्या पालखींत बसून जातात. बिचाऱ्या बाया, त्यांची स्थिति खरोखर दुःखाची आहे का नाहीं?

चिनी लोकांचे अनेक देव आहेत. व त्यांच्या मूर्ति मातीच्या, दगडाच्या, लाकडाच्या व धातूच्या आहेत. आणि सर्वांच्या घरांत स्वयपाकाच्या खोलींत कागदाचा देव असतो. त्याच्यापुढें हमेशा उदकाड्या जाळीत असतात. व दिवसांतून दोन तीन वेळा त्याचें भजन करीत असतात. त्यांच्यांत कोणी रोगी पडला तर त्यांनां वाटतें कीं आळसानें आह्मी भजन केलें नाहीं ह्मणून आह्मांस ही शिक्षा झाली आहे. मग धास्तीनें ते भजन करूं लागतात. व वर्षांतून एक दिवस याचा मोठा उत्साह होतो. नंतर पहिल्या कागदावरील देवाचें विसर्जन करून नव्याची स्थापना ते करितात. बा. मे.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 6,1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला रविवार ता० १८ माहे मार्च सन १८७७ इ० अंक ११

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

### कारकून पाहिजे.

आमचे छापखान्याकारितां एक कारकून पाहिजे आहे. त्याचें मोडी अक्षर चांगलें असावें, व त्यास जाब जबाबी कामाची आणि जमाखर्च लिहिण्याची चांगली माहिती असावी. पगार प्रथमत: आठ रुपये पसून दहा रुपये पावेतों मिळेल. ज्या कोणाची ही जागा पतकरण्याची खुशी असेल त्यानें जवळ असल्यास समक्ष येऊन भेटावें, व दूर असल्यास खालीं सही करणाराकडे पत्रानें हकीकत कळवावी. तारीख १ माहे मार्च सन १८७७ इसवी.

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात

BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई ब्यांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार आहे. व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगाव एथील ब्यांकेचे आफिसास अर्ज केला असतां मिळेल.

तारीख १४ माहे सप्तंबर
१८७६ इसवी.

Harry H. Hynes.
Agent

## नोटिसा.

राजमान्य राजश्री सितारामजी व वामनराबजी दलाल निसवत रेलव स्टेशन अकोलें यांस पन्नालाल मारवाडी दुकान वळेंदे हर्ली मुक्काम अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुमचेकडे आमची २६ मण जवारी भरलेलीं पोतीं १२ आहेत. त्या जवारीची किंमत दरखंडीस ६० रुपये प्रमाणें २६ मणाचे ७८. रुपये व बारा पोत्यांची किंमत ६ रुपये मिळून८४ चवऱ्यायशी रुपये साडेचार महिने झाले तुह्मा कडून येणें आहेत हे आह्मी तुह्मा उभयतांस कित्येक वेळा मागितले, व तुह्मी देतों देतों ह्मणता पण देत नाहीं करितां ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून ४ दिवसांचे आंत शेट कुंजीलाल रामलाल आमचे अडेत यांचे अकोले दुकानावर रुपये देऊन आमची पावती घ्यावी. याप्रमाणें न केल्यास रीतीप्रमाणें दिवाणी कोर्टांत फिर्याद करून सदर्हू रकम व्याजासुध्धां भरून घेऊं. तसाच कोर्टाचा व या नोटिशीचाही खर्च तुह्मास द्यावा लागेल करितां होईल तोंवर आपसांत तोड करावी हें तुमचे हक्कांत बरें. इतक्यावर मर्जी तुमची. कळावें. तारीख १० माहे मार्च सन १८७७ इसवी

( सही ) पन्नालाल मारवाडी
दस्तुर खुद.

### नोटिस

शिवराम वल्लद पिरथमजी पाटील मुकद्दम मौजे पाटखेडें तर्फ ह्मैसपुर तालुके अकोलें यांस जयराम वल्लद राघोजी पाटील मुकद्दम मौजे मजकूर तालुके व जिल्हे मजकुर याजकडून नोटिस देण्यात येतें कीं आमची जवारी ११॥ मण असून त्याचें व्याज दरसाल दिढीनें देऊं ह्मणून तुमचा करार आहे त्याप्रमाणें हिशेब करून ह्मणजे दोन वर्षांची दिढी सदर्हू जवारीवर चढविल्यानें २४॥। पावणें पंचवीस मण जवारी तुह्माकडे निघते ही आह्मी तुह्मास दोन च्यार वेळा मागितली व तुह्मी या हंगामावर देतों त्या हंगामावर देतों असे ह्मणून चाळिवता पण देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्या पासून १२ दिवसांत सदर्हू जवारी आह्मांस मोजून द्यावी व तुह्मी ऋणमुक्त व्हावें याप्रमाणें तुह्मी न केल्यास तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून वसूल करण्यांत येईल व येणेंकरून कोर्टाचा खर्च ही तुह्मास द्यावा लागेल आणि या नोटिशीचा खर्च तुह्माजवळून घेतला जाईल करितां होईल तोंवर आपसांत तंटा मिटवून निकाल करावा. हें तुमचे हक्कांत बरें आहे इतक्यावर मर्जी तुमची कळावें तारीख १३ माहे मार्च सन १८७७ इसवी.

( सही ) जयराम वल्लद राघोजी
पाटील निशाणी खुद
हातची असे.

ताजा कलम — या गोष्टीला साक्षीदार आहेत ते येणेंप्रमाणें:—

१ कृष्णाजी भटकर
१ बापुन्या पाटील
१ दतु राहुत

### नोटिस.

रा. रा. विक्रमजी वल्लद शिवाजी काबरे वस्ती मौजे दोनद तालुके टाकळी जिल्हे अकोलें यांशीं रावजी वल्लद श्रावण काकड मुकद्दम मौजे शेलू प्रगणे व तालुके मूर्तीजापुर जिल्हे उमरावती याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुमचे रुपये ३०० अक्षरी तीनशें आमचेकडे होते त्यांत तुह्मी आमचे झाडाचे अंबे ६२००० बासष्टहजार दोन तीन वर्षां मिळून नेले. त्याचा निदान दर १५ रुपये हजार प्रमाणें आकार रुपये ९३० अक्षरी नऊशें तीस रुपये झाला. या रुपयांत तुह्मी आपले ३०० तीनशें रुपये वजा करून घेऊन बाकी ६३० सहाशें तीस रुपये बचत राहिली ही सर्व रकम व्याजा सुद्धां द्यावी व तुह्मा जवळ असलेला ३०० तीनशाचा दस्तैवज ही नोटिस पावल्या पासून ४ दिवसांचे आंत आमचे येथें पावता करावा. या मुदतींत सदर्हू रुपये, दस्तैवज व तुमचे तीनशें रुपयांचे व्याजासाठीं -तुह्माजवळ गहाण ठेविलेलीं १९ अंब्याचीं झाडें आमचे ताब्यांत न दिलीं तर तो माल मोकळा होण्या विषयीं सरकारांत फिर्याद करून कोर्ट खर्च व या नोटिशीच्या खर्चासुद्धां सदर्हू रकम भरून घेऊं कारण यांत मोठीशी कांहीं एक भानगड नाहीं. तुमचे रुपये ३०० आह्मी घेतले होते त्याचे व्याजासाठीं १९ अंब्याचे झाडांचा बार रुपये देईपर्यंत तुह्मी खावा असा करार होता व या प्रमाणें दस्तैवजही रजिष्टर झालेला आहे. याशिवाय आमचे दुसऱ्या तीन झाडांचा बार दोन तीन वर्षांत तुह्मी नेला त्याचा पैसा बिलकूल दिला नाहीं व तीं तीन झाडें तुमचे ताब्येत दिलेलीं नाहींत व त्याचा माल ९३० रुपयांचा तुह्मी नेला आहे. करितां पुन्हा एकवार तुह्मास समजूत देतों कीं, होईल तोंवर आपसांत हा निकाल करावा इतक्या उपर मर्जी तुमची कळावे तारीख ८ मार्च १८७७ इसवी.

( सही ) रावजी वल्लद श्रावणजी
पाटील दस्तुर विठोबा वल्लद
लक्ष्मण पाटील पातुर नंदापुर
दस्तुर खुद.

### नोटिस

मुरलीधर छोटमल साहू दुकान वाणी तालुके बाळापुर यास कमळाजी वल्लद ह्मसाजी माळी वस्ती मव्हसुर तर्फ पिंपळखुंट तालुके बळपुर याजकडून नोटिशीचा जाब देण्यांत येतो कीं, तुमचे देण्या घेण्याशी मशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं. तुमचे रुपये संभाजीकडे कांहीं आहेत अगर नाहींत हेंही आह्मास माहित नाहीं तो मरण पावल्यावर तुह्मी आह्मास जताविलें होतें कीं आमचे त्याजकडे रुपये आहेत. कदाचित असले तरी त्याची बायको नामे सोनी ही त्याची वारस आहे. व ती जेव्हां गंधर्व करू लागली तेव्हां तुमचे ह्मटल्यावरूनच त्यांनी तुह्मास खबरही दिली त्यावरून तुह्मी येथें आले होते. व सदरहू सोनीनें नवीन केलेला गंधर्वाचा नवरा नामे माहदमाळी वगैरे तुह्मी कसे काय समजले हें आह्मास माहित नाहीं. आमचे गळा पडल्यानें तुमचे रुपये मिळणे नाहीं. विनाकारण आह्मास जाब देणें भाग पाडिलें करितां याचा खर्च आठ दिवसाचे आंत आह्मास आणून द्यावा नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज करून अवूवा जाब तुह्मापासून घेतला जाईल हें खुप समजावें. कळावें तारीख १० माहे मार्च सन १८७७ इसवी.

( सही ) कमळाजी वल्लद सुपाजी
वस्ती मव्हसूर निशाणी
खुद हातची असे.

### नोटिस.

विठोबा वल्लद महादु माळी वस्ती मौजे हिंगणें ( कारेगाव नजीक ) तालुके खामगाव याशी खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्नास सुमार २५ वर्षें झालीं सदर्हू मुदतींत कांहीं वर्षें मी तुह्माजवळ काढिलीं पण तुह्माकडून व्हावें तसें माझें पालन पोषण झालें नाहीं, सदा खटखट चालत राहिली. कित्येक वेळा पंचायती झाल्या आंत शेवटची पंचाईत झाली तेव्हां तुमचे लिहिलें की मला चांगले रीतीनें वागविण्या विषयीं पंचांत झालें, पण तुह्माकडून योग्य रीतीनें माझी सोय झाली नाहीं. नंतर तुह्मी दुसरी बायको केली पण तिचाही सांभाळ तुह्माकडून झाला नाहीं ह्मणजे तिलाही हाकून दिलें. यावरून माझ्या सांभाळाची आशा राहिली नाहीं करितां ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत मला सोडचिठ्ठी देऊन मोकळें करावें नाहींपेक्षां मी रीतीप्रमाणें फिर्याद करून तुमचा लग्नसंबंधी मजवरचा हक्क रद्द करण्याची तजवीज करून दुसरा गंधर्वाचा घरठाव करीन कळावे तारीख १३ माहे मार्च १८७७ इसवी.

( सही ) तुळशी नर्द नवसाजी माळी
रहाणार टेंभुरणें तालुके
खामगाव निशाणी
खुद हातची

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यास:—

वि. वि. आपल्या सुंदर पत्रीं पेस्या अंकीं मेहेरबानीनें खालच्या मजकुरास जागा द्यावी.

रत्न पारखी यास

या पत्राच्या तिसऱ्या अंकीं थंड्सारखें

तुमचें पत्र पाहून मला फार वाईट वाटलें. आजपर्यंत मी तुमचा फार शोध केला, पण पत्ता लागला नाहीं. तुह्मी कोण अहात हें मेहेरबानीनें कळवा. ह्मणजे तुमच्या विरुद्ध माझें मत काय आहे हें खासगी पत्रानें कळवीन.

रा रा श्री राघवेंद्र

## वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र शुद्ध ४ शके १७९८

## दुष्काळग्रस्त लोकांची स्थिति

परमेश्वरानें अवकृपा करून गेल्या पर्जन्य काळांत मुंबई व मद्रास इलाख्यांत बहुत भागांवर वृष्टी केली नाहीं तेणेंकरून बहुत लोकांस विपत्ति प्राप्त झाली, देश सोडून पोट भरेल तिकडे जावें असें झालें तरी पण इंग्रज सरकारच्या औदार्यानें त्यांवर मरणाची पाळी येण्यापर्यंत कहर गुदरेल अशी कल्पना नव्हती, परंतु आतां तशा गोष्टी वाचण्यांत येऊं लागल्या आहेत हें पाहून दुःख वाटतें.

मद्रास इलाख्यांत रस्त्याच्या बाजूनें अन्नावाचून मेलेल्या मनुष्यांचीं प्रेतें गेले महिन्यांत ११४ सापडलीं व या महिन्यांत एका आठवड्यांत १९ सापडलीं असें स्टेटसमन नावाच्या पत्रांत लिहिलें आहे. व असेंच पुढें चालेल तर दुःखिताचा काय परिणाम होईल ? सरकारानें त्या लोकांस सहाय व्हावें एतदर्थ रीलिफ फंडाचीं कामें काढिलीं पण अलिकडे मजूरी देण्याचा दर कमी केला तो इतका कीं, त्यांचीं पोटें भरेनातशीं झालीं त्यामुळें कित्येक लोक कामावर जाऊन अर्धपोटीं राहावें त्यापेक्षां निकामी बसून येईल तें संकट सोसावें अशा साहसास कबूल झाले. व त्याजपासून हे भयंकर परिणाम होऊं लागले आहेत. याकडे सरकारानें अवश्य लक्ष्य द्यावें व अन्नावाचून कोणी न मरतील असें करावें.

ज्या जिल्ह्यांतून दुष्काळ आहे त्या जिल्ह्यांत लोकांस पोट भरावयाची मारामार पडली आहे असें असतां त्यापासून चालू सालचा शेतसारा घेण्याविषयीं सरकारानें सक्ती लाविली आहे ही गोष्ट किती विलक्षण आहे ? शेतें पेरलीं नाहींत, व त्यांत कांहींच उत्पन्न झालें नाहीं तर लोकांनीं त्याजबद्दलचा सारा कसा द्यावा व तो सरकारानें काय ह्मणून घ्यावा ? याजबद्दल लोकांनीं इलाख्याच्या सरकारास व हिंदुस्थान सरकारास अर्जांनीं कळविलें तरी त्यांची दाद लागेना ह्मणून सोलापुरच्या व पुण्याच्या लोकांनीं शेवटीं गेल्या आठवड्यांत मुंबईस जाऊन तीन साडे तीन शें रुपये खर्चून विलायतेस स्टेट सेक्रेटरी यांकडे तारायंत्रांतून अर्ज पाठविला आहे त्याचा त्यांस काय जबाब मिळतो पहावें. त्यांनीं लिहिलें आहे कीं दुष्काळ पीडित प्रदेशांतील लोकांचे फार हाल होताहेत. मजुरीचे दर तिजाई कमी केले. कमींतकमी दर मनुष्यास शेरभर अन्न लागते, मुलास तर एकच पैसा मिळतो तेणेंकरून उपास मारल्यानें किंवा वाईट अन्न खाण्याच्या योगानें हगवण होऊन शेकडो लोक मरत आहेत. याजकरितां पूर्वींचे दर पुन्हा सुरू करावे व शेत सारा सक्तीनें घेताहेत तो मना व्हावा. साधारण आपत्तीच्या वेळींही सान्यांत सूट मिळते आणि भर दुष्काळांत कमाल सारा वसूल घेत आहेत हा काय अनर्थ आहे ?

खरेंच अशी स्थिति त्या प्रांतीं असेल तर त्यांवर हें केवढें संकट कोसळलें ह्मणावें? आह्मी कृपाळु परमेश्वराची प्रार्थना करितों कीं, त्यानें विलायत सरकारास सद्बुद्धी देऊन त्यांकडून ही मजुरीची काट कसर व सारावसुलाचा जुलूम मना करावा व त्यांच्या सर्व दुःखाचें निवारण करावें.

## अन्न व त्याचें पाचन.

सजीव वनस्पतीचे अंतर्भागास जेव्हां कार्बानिक आसिड, पाणी, आणि अमोनिया हीं जाऊन पोंचतात, आणि सूर्याचीं किरणें त्यांस लागू लागतात, तेव्हां त्यांचे परिमाणूंची नव्या प्रकारची कांहीं व्यवस्था होण्यास तावडतोब आरंभ होतो. तो असा:— आक्सिजनाचा कांहीं भाग नाहींसा होतो, आणि बाकीचे पदार्थ कार्बान, हैड्रोजन, आणि नैत्रोजन यांस मिश्र होऊन अधिक श्रेष्ट पदवीचे परिमाणु बनतात. या अदलाबदलीपासून जीं फळें होतात त्यांतील पहिलें फळ 'एकप्रकारची साखर' हें होतें. या साखरेचे प्रत्येक परिमाणूंत कार्बान, हैड्रोजन आणि आक्सिजन यांचे बारा बारा कण असतात. एरवींचे साखरेंतही याचप्रमाणानें हीं द्रव्यें असतात मात्र हैड्रोजन आणि आक्सिजन, यांचा एकेक कण कमी असतो.

सजीव वनस्पतीच्या रसांत ती साखर द्रवून वनस्पतीचे सर्व रंध्रांतून जेव्हां जाते तेव्हां त्या साखरेची आणखी एक स्थिति बदलते, ह्मणजे तिचे परिमाणूंतून आक्सिजन व हैड्रोजन आणखी कमी होऊन ती द्रवावयाची बंद होते, आणि तिचे लहान लहान दाणे होऊन रहातात तेव्हां तिला स्टार्च ( खळ ) ह्मणतात. या स्टार्चचा प्राणीगुणधर्मविद्येच्या कामांत मोठा उपयोग आहे असें जेव्हां प्रथम माहित नव्हतें तेव्हां ती मलमलीचीं वस्त्रें ताठ करण्याचे कामास लावीत असत पण आतां लावित नाहींत. स्टार्चचे प्रत्येक दाण्यांत पुष्कळ परिमाणू एकासीं एक चिकटलेले असतात व ते सूक्ष्मदर्शक कांचेंतून नजरेस पडावे इतके मोठे असतात तथापि एक इंच जाग्यांत हे दाणे एका शेजारी एक असे मांडिले असतां दोन अगर तीन हजार भरतील. वनस्पतीमध्यें स्टार्चाची उत्पत्ती जरूरी पेक्षांही विशेष होते, आणि परमेश्वरानें जनावरांचे भक्षासाठीं जी सामग्री योजली आहे तिचा स्टार्च हा मोठा भाग आहे. आपले स्वतांचे बांधणीसाठीं वनस्पती जो पदार्थ उत्पन्न करितात तो स्टार्चे सारखाच असतो, परंतु तो भरीव दाणे बनून रहाण्याच्या ऐवजीं पोकळ नळ्यासारखा बनून रहातो.

सजीव वनस्पतीस इंद्रियरहित जीं तत्वें जाऊन पोचतात त्यांपासून त्या वनस्पतीचे रसाचे ठायीं साखर व स्टार्च यांशिवाय आणखीही कांहीं मिश्र पदार्थ उत्पन्न होतात. कणीक पाण्यांत मळली व तिचा सर्व स्टार्च धुवून काढिला ह्मणजे एक वातड व चिकचिकीत असा गोळा रहातो त्याला ग्लटन [ चीक ] ह्मणतात. हा ग्लटन सदरीं सांगितलेल्या मिश्र पदार्थांपैकीं एक पदार्थ होय. बहुतेक वनस्पतीचे रसांत ग्लटन सापडतो व तो उष्ण असे पर्यंत पातळ असतो व नंतर गोठून त्याचा अंड्यासारखा पांढरा गोळा होतो ह्मणून याला वनस्पतीचें आलबुमैन ह्मणतात. यावाचसारखें दुसरें एक द्रव्य क्यासिन ( द्विदल धान्यें ज्या टरफलांत असतात तें ) ह्मणून कांहीं कांहीं वनस्पती घेवडा, वाटाणा वगैरेच्या ठायीं असते. ग्लटन, आलबुमैन, आणि क्यासिन हे पदार्थ पुष्कळ अंशीं परस्पराशी एकसारखे असल्यामुळें तीं सर्व वनस्पतीचीं अलबुमिनस द्रव्यें ह्मणून मोजलीं जातात. आणखी असा शोध लागला आहे कीं हे पदार्थ घटनेमध्यें बहुतकरून एका सारखे एक आहेत. व त्या सर्वांत नैट्रोजन, कार्बान, आक्सिजन, आणि हैड्रोजन हे आहेत. जनावरांना खाण्यासाठीं जी वनस्पति योजलेली आहे तिचे घटकावयव साखर, स्टार्च, तेल, आलबुमिनस पदार्थ, लाकडांचे तंतु, आणि सच्छिद्र लाकूड हे आहेत. जमीनींतून जो क्षार व मृत्तिकारूप पदार्थ वनस्पतींत जातो तो वरील द्रव्यांत कांहीं मिश्र होतो व कांहीं पाण्यांत त्याच्या रूपानें मिळतो. पक्व फळामध्यें साखरेचा भाग पुष्कळ असतो. रसभरीत मुळें, कांडें, आणि पानें यांच्या रसांत स्टार्च आणि आलबुमिन पुस्कळ असतात. बटाटे, तांदूळ यांमध्यें स्टार्च व थोडा अंश ग्लटन असतो कणकींत याचें प्रमाण असें आहे कीं ४॥ अंश स्टार्च व १ अंश ग्लटन. वाटाणा, घेवडा यांत स्टार्च आणि क्यासिन असतो व बदाम आणि दुसरे पुष्कळ बियांचे पदार्थ यांत अलबुमैन असतो. यावरून दिसून येईल कीं साखर, स्टार्च; तेल आणि अलबुमिनस द्रव्यें ही जनावरांच्या रक्षणासाठीं भक्षणीय पदार्थ आहेत.

हे भक्षणीय पदार्थ बहुशा अप्रवाही आहेत. स्टार्च व ग्लटन सर्वदा अप्रवाही असतात. अलबुमैन बियांमध्यें ज्या स्थितींत जमतो त्याच स्थितींत असतो. तरी जनावरांचे शरीरामध्यें हे भक्षणीय पदार्थ जाऊन पोचण्यापूर्वीं प्रवाही व्हावे लागतात, नाहीं तर शरीराच्या नाजूक भागांतून ते जाऊ सकणार नाहींत. आतां हे पदार्थ अप्रवाही असतां प्रवाही कसे होतात? हा मोठा प्रश्न आहे. व याचें उत्तर असें आहे कीं, त्यास प्रवाही करण्याकरितां ईश्वरानें एक स्वतंत्र साधन योजिलेलें आहे. त्याचें नाव काय ह्मणाल तर पचनेंद्रिय.

( पुढें चालेल )

## युरोप खंडांतील राजांची माहिती.

युरोपांत जे देश आहेत त्या प्रत्येकाचा राजा हल्लीं कोण आहे, तो कधीं जन्मला, त्याचें हल्लीं वय काय, व तो गादीवर कधीं बसला, त्या विषयीं माहिती.

आस्त्रिया—फ्रान्सिस जोसेफ.- जन्म ता. १८ आगष्ट १८३२, वय ४५, सिंहासनारूढ सन १८४८त

बेडन—डब्ल्यू एल फ्रेडरिक. ता. ९ सप्टेंबर १८२६, वय ५१, गादीवर १८५६ त

बव्हेरिया—दुसरा लुईस. २५ आगष्ट सन १८४५त, वय ३२ गादीवर १८६४

बेलजियम—दुसरा लिओपोल्ड ता. ९ एप्रिल १८३५, वय ४२, गादीवर सन १८६३

डेन्मार्क—नववा क्रिश्चियन ८ एप्रिल सन १८१८ वय ५९ तक्तावर १८६३त.

फ्रान्स—मार्शल म्याकमोहन ता. १३ जुलै १८०८ वय ६९ तक्त १८७५.

ग्रेटब्रिटन —विक्टोरिया चक्रवर्तिनी ता. २४मे १८१९ वय ५८ गादी १८३७

ग्रीस—पहिला जार्ज. ता. २४ डिसेंबर १८४५ वय ३२ गादी १८६३.

होलंड—तिसरा विलियम ता. १९ फे. १८१७ वय ६० गादीवर १८४९.

इटाली—दुसरा विकटर इमान्युएल ता. १४ मार्च १८२० वय ५७ गादी १८६१

पोर्तुगाल—पहिला लुईस ता. ३१ आक्. १८३८ वय ३९ गादी १८६१.

प्रशिया—पहिला विलियम ता. २२ मा. १७९७ वय ८० गादीवर १८६१त.

रोमनचर्च—पोप ९ वा पायस ता. १३ मे १७९२ वय ८५ गादी १८४६.

रशिया—दुसरा अलेकझांडर ता. २९ ए. १८१८ वय ५९ गादी १८५५

साक्सनी—अलबर्ट ता. २३ए. १८२८ वय ४९ गादीवर १८७३

स्पेन—बारावा डान अलफान्सो ता. २८ नो. १८५७ वय १९ गादी १८७५

स्वीडन, नोर्वे—दुसरा अस्कर ता. २१ जा. १८२९ वय ४८ गादी १८७२.

एकत्र संस्थानें (अमेरिका) - यू एस ग्रांट ता. २७ एप्रिल १८२२ वय ५५ गादी १८६९.

वर्टंबर्ग—चार्लस फ्रेडरिक अलेकझांडर मार्च १८[illegible] वय ५४ गादी १८६१

तुर्कस्थान—अबदुल हमीद सन १८४२ त जन्मला. वय ३४ गादीवर १८७६त बसला.

गावरील यादींतील आस्त्रिया, प्रशिया, व रशिया या तीन देशाचे राजे आपणास एंपरर ह्मणजे बादशाह किंवा चक्रवर्ति ह्मणवितात. व नवख्या ग्रेटब्रिटनच्या राणी साहेबांनीं हिंदुस्थानापुरता आपणास बादशाही किताब नुकताच घेतला आहे. फ्रान्स व एकत्र संस्थानें एथील रा-

ज्यें लोकसत्ताक आहेत व तेथील राज्याधिकाऱ्यांस प्रेसिडेंट ह्मणतात. रोमन चर्च हें पोपाचें धर्मराज्य आहे. व बाकी ठिकाणचे राजे आपल्यास किंग ह्मणवितात.

## वऱ्हाड

हैदराबादेहून पत्र आल्यावरून समजतें कीं पुण्याहून खानबहादुर दस्तुर नसरवानजी साहेब हे मोगलाईंतील येकंदर पार्शी लोकांकडून निजाम सरकारास मानपत्र देण्यास गेल्या आठवड्यांत हैदराबदेस गेले होते त्यांनीं फार उत्तम सुशोभित अशा चांदीच्या लाहानशा संदुकांत तें मानपत्र ठेवून हुजूरास नजर केलें. हुजूर ते पाहून संतोष पावले व दस्तुर साहेबाला त्यांनीं खिलात दिलें. त्यांत रत्नजडित मोत्यांची कंठी, जडावाची पोंची वगैरे अलंकार होते त्या शिवाय दुशाले व किनखापाचे भरगच्ची ठाण वगैरे इनायत झालें. आणि नबाब मुकरमुदवला व नबाब खुरशदजा बहादुर हे त्यांचे बिऱ्हाडी मुलाकतीस गेले होते. व नबाब सर सालरजंग साहेब बहादुर व राजे निरंजनप्रसाद बहादुर यांनीं आदरपूर्वक मेवे व मेजवानीचें सामान त्यांकडे पुष्कळ पाठविलें.

ही गोष्ट ऐकून आह्मास फार संतोष होतो. हे दस्तुर साहेब आमच्या मे. दस्तुर बहिमनजी साहेबांचे वडील बंधू आहेत हें आमचे वाचकांस ठाऊक असेलच.

आह्मांस असें कळलें आहे कीं, उत्तम लोकवाशी डाक्टर सिंक्लेर साहेब यांचे वर्गणी बद्दल किती एक ठिकाणाहून पैसा येणें आहे व त्याची व्यवस्था काय करावयाची या विषयीं मतें विचारिलीं आहेत त्याचे जबाब किती एका कडून आले नाहींत तर बर सांगितलेले, जबाब व वर्गणी तारीख १० एप्रिलचे पूर्वी न आल्यास जीं मतें मिळालीं आहेत त्यांतील बहु मताप्रमाणें अकोले येथें जमलेल्या पैशाची व्यवस्था होईल व ज्याची वर्गणी आली नाहीं ते ती देण्यास नाखुश आहेत असें समजलें जाईल.

सिकंदराबादचे मुख्य क्यांटनमेंट माजिस्ट्रेट थोडे दिवसांमागें रजेवर गेले होते त्यांचे काम पहाण्यास मे. शेख हिसामुद्दीन सा. आफिशियेटिंग पोलिटिकल असि. व असि. क्यां. माजि. यांस सरकारानें सांगितलें होतें असें रेसिडेन्सी आर्डर वरून समजतें

या आठवड्यांत पावसानें सोमवार, मंगळवार, व बुधवार तिन्ही दिवस वृष्टी केली. या वृष्टी बरोबर गारा होत्या तसाच काहूर वारा, विजांचा गडगडाट, व चकचकाट वगैरे त्रासकारक देखावा होता. आतां उष्णकाळच्या ऋतूंत या पावसाच्या भलत्या तऱ्हा होणें आश्चर्यकारक वाटतें मुंबई व मद्रास इलाख्यांत पाऊस यावर्षी मुळींच पडला नाहीं व इकडे अशी तऱ्हा चालली आहे यावरून कित्येकास पुढें कसा प्रकार होईल याचा धाक वाटतो.

✓ रा. रा. बाळाजी नारायण कोलटकर जे हल्लीं मंगळवेढ्यास सांगलीकरांकडे मुनसफ आहेत ते गेले मंगळवारीं एथें आले होते व त्यांनीं मंडळीच्या शिफारसीवरून येथें टौनहालांत" स्वदेशीय वस्तु वापरण्याची आवश्यकता " याविषयावर व्याख्यान दिलें. यांचें भाषण खुबीदार, रसाळ, व चित्तवेधक होतें. आतांशा हे सभांचे व भाषणांचे उपक्रम वारंवार होतात व ते लोकांत आवडतात हें सुचिन्ह होय. येथें या गोष्टीच्या विच्यारासाठीं सभा स्थापन झालली आहे हें आमच्या वाचकांस ठाऊक असेलच. त्या सभेलाही या भाषणानें अधिक हालचाल होईल असें आह्मी इच्छितों.

पोलिसपट्टी ह्मणून जो इकडे कर आहे व ज्यास म्युनिसिपल ट्याक्स असें ही ह्मणतात तो इतके दिवस फक्त रयतेवर होता व सरकारी नोकरांवर नव्हता. गुदस्त सालीं त्याबद्दल येथें असा ठराव झाला होता कीं, जे सरकारी नोकर म्युनिसिप्यालिटीच्या हद्दींत रहातात त्यांपासून पोलिसपट्टीचा कर घ्यावा. व या सालीं दुसरा हुकूम असा आला आहे कीं, सर्व सरकारी नोकर मग ते युरोपियन असोत, अगर नेटिव असोत, आणि म्युनिसिप्यालिटीचे हद्दींत राहोत अथवा छावणींत राहोत त्यांपासून सदर्हू कर घेतला पाहिजे. व डिपुटी कमिशनर साहेबांनीं म्युनिसिप्यालिटीस असें कळविलें आहे ह्मणतात कीं, आह्मी सरकारी नोकरांपासून हा कर परभारें पगारावर वसूल करून खजिन्यांत कमिटी खातीं जमा करूं.

मि. म्याकिंटाश साहेब उमरावती हायस्कुलाचे हेडमास्तर दोन दिवसांची रजा घेऊन एथें आले होते व ते सोमवारीं परत गेले. त्यांचा हेतु असा आहे ह्मणतात कीं आपल्या अब्रूविषयीं चांगला खुलासा करून घ्यावा.

आमचे बंधू उर्दू अखबार कर्ते यांनीं मि. म्याकिंटाश साहेबांच्या उद्देशावरून कालचे पत्रांत आमच्या संबधानें फार पोक्त विचार प्रसिद्ध केले आहेत याबद्दल आह्मी त्यांचे आभार मानितों.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं मे. दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर यांची प्रकृति गेल्या आठवड्यापेक्षां या आठवड्यांत बरी आहे. व उमेद आहे कीं पुढील आठवड्यांत ते हिंडू फिरू लागतील.

दुष्काळफंड कमेटीची गेल्याचे मागील गुरुवारीं सभा भरली होती. तीन महिने या सभेचें काम थंडे होतें कारण अकोल्यास पाणी आणण्याचे कामीं कामिटीकडून अंमलदाऱ्याकडे लिहून गेलें होतें त्याचे जबाबाची ऊर्ता होती; परंतु पाण्याविषयीं कांहीं तजवीज होईल असा रंग दिसेना व मुंबई इलाख्यांत विपत्तिग्रस्तांची स्थिति दिवसानुदिवस वाढत आहे सबब धर्मपरायण बुद्धीनें चार गृहस्थांनीं जे पैसे त्या लोकांनिमित्त देण्याचें मनांत आणिलें ते त्यांस लवकर पोंचते व्हावें असें मनांत आणून ही सभा भरविली गेली. व त्या दिवशीं वाटाघाट होऊन तीन च्यार ठराव झाले ते येणेंप्रमाणें.

१ पाण्याचे संबंधानें कांहीं तजवीज होत नाहीं. आतां पैसा दुष्काळाचे प्रांतांत पाठवावा.

२ जे पैसे वसूल झाले नाहींत ते जमा करण्याविषयीं तजवीज करावी. आणि जितका पैसा जमा होईल तितका पाठवून द्यावा.

३ ज्या लोकांनीं पैसे दिले आहेत त्यांचो इच्छा आपले पैसे दुष्काळाच्या प्रांतांत पाठवूं नयेत अशी असेल तर आठ दिवसांत त्यांनीं सेक्रेटरीस कळवावें नाहींपेक्षां त्यांची संमति आहे असें समजून सर्व पैसे त्या प्रांतांत पाठविले जातील.

४ कित्येकांनीं आकडे घातलेले असून पैसे दिले नाहींत ते पैसे वसूल करण्याकरितां आणि ज्यांणीं आकडे घातले नाहींत त्याजकडून मदत मिळविण्याकरितां ५ मनुष्यांची एक कमिटी नेमावी.

वाशिम—तारीख १५ मार्च १८७७ येथील डिपुटी कमिशनर साहेब व एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांच्या स्वाऱ्या मंगरूळ तालुक्यांत आहेत.

पाच च्यार दिवसांपासून येथें पाउस पडत आहे. व कालरोजीं गाराही पडल्या.

डिपुटी कमिशनर आफिसांतील येक दस्तऐवज हरवला आहे व त्याकरितां दोन तीन महिने झाले त्या आफिसांतील व एकस्ट्रा आफिसांतील लोकांचा पगार बंद आहे व त्या कागदाविषयीं हल्लीं कांहीं चौकशी सुरू आहे असें ऐकतों.

सांगलीकर नाटकवाले मोगलाईंतून फिरत फिरत गेल्या आठवड्यांत इकडे आले आहेत.

उमरावती ता. १६ मार्च १८७७

आलिकडे पर्जन्यानें गर्दी करून सोडिली आहे; विजांचा गडगडाटही बराच होतो. गाराही मोठमोठ्या पडतात. या सालांत कांहीं विपरीत चिन्हें दिसत आहेत! काय ईश्वरी इच्छा असेल ती खरी!

येथें रा. रा. बाळकृष्ण नाईक पेंडके या नावाचे श्रीमान गृहस्थ आहेत, त्यांचे येथें त्यांचे मुलाचें लग्न झालें. ता० १३ रोजीं रात्रीं त्या लग्नाची वरात मोठ्या थाटानें मिरवित असतां मध्यंतरीं मोठें " विघ्न " घडून आलें त्याची हकीकत समजली आहे ती अशी:—

लग्नांत बंदुकीचे आवाज व्हावे ह्मणून कांहीं बंदुकांकरितां सरकारांतून परवानगी घेतली होती. एक मनुष्यानें बंदुकीचा तोडा हातांत घेऊन त्याचा उपयोग अकस्मात शिंगडा जो कमरेस दारूचा भरला होता त्यासतो तोडा लागून त्यांतील दारू पेटली त्या योगानें तो मनुष्य धांवावयास लागला तो धांवत असतां दारूचें मोठें भांडें नजिकच होतें त्यांत ठिणगी पडून त्या सर्व दारूनें पेट घेतली; जवळ कित्येक लहान मोठीं मनुष्यें होतीं तीं बरींच भाजलीं. कित्येकांचे आंगरखे पेटले परंतु ते लवकर निघतना, असें होत होत एकच कल्होळ होऊन गेला. वरातीचा थाट राहिला एकीकडे आणि हें असें विघ्नच पुढें आलें. असें ऐकतों कीं १७ इसमास फारच इजा झाली, पैकीं ३ इसम कालपर्यंत मरण पावले!!! वास्तविक पहातां हें कृत्य कोणी बुद्धि पुरःसर केलें असें तर नाहीं परंतु लग्न इत्यादि समारंभांत असे अनर्थ घडण्यास कारणें वर लिहिल्या प्रकारचीं असतात, याजकडे सर्वांनीं अवश्य लक्ष द्यावें.

कर्नल नेबार्ड साहेब या महिन्याचे अखेरीस विलायतेस जाणार ह्मणून त्यांस पानसुपारीचा समारंभ येथील प्रमुख मुसलमान लोकांकडून लवकरच व्हावयाचा आहे.

वऱ्हाडांत एप्रिलपासून जे फेरफार व्हावयाचे ह्मणून कांहीं गप्पा निघत आहेत त्यांबद्दल अद्याप कोठें खरी वदंता नाहीं. नवीन मुनसफ होणार, अकोल्याची मोठमोठीं हापिसें एथें आणणार, स्मालकाज कोर्टें मोडणार, हायस्कूल एकच ठेवणार, इत्यादि गोष्टी खरोखरच घडणार किंवा नाहीं हें समजत नाहीं व खरें असेल तर यांत मोठासा फायदा सरकारानें कोणता पाहिला आहे?

मि० हेन्री कान्डर साहेब ग्रे. इं. पे. रेलवेचे जनरल ट्राफिक म्यानेजर व दुसरे कित्येक रेलवेचे अधिकारी एथील स्टेशनचा बगीच्या पहाण्याकरितां काल आले होते. फार खुष झाले असें समजतें. स्टेशन मास्तर हे बगीच्याचे कामीं पुष्कळ श्रम घेतात तेव्हां त्यांस यंदाही बक्षिस मिळेल असें वाटतें.

## वर्तमानसार

मद्रास युनिव्हर्सिटीकडे सर टी माधवराव यांचीं दोन वार्षिक बक्षिसें आहेत असें समजतें.

माधवरावजी यांचे नावामागें टी लागते ती त्यांचे स्थलदर्शक आहे. ते तांजारचे रहाणारे ह्मणून त्यांस तांजोर माधवराव लिहावयाचें तें मद्रासी रीतीप्रमाणें टी माधवराव असें लिहितात.

मद्रास इलाख्यांतील शेतकीच्या शाळेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस त्याच शेतवाडींत रहाण्यास पुरेशी जागा नाहीं. सरकारानें १२ विद्यार्थी रहातील इतकी जागा बांधून दिली होती तींत १७ जण रहातात व कांहीं शेजारच्या गावीं रहातात त्यांची इच्छा त्या शेतवाडींतच रहावें अशी असल्यावरून नवीन ६ घरें बांधण्यास सांगशन होण्याविषयीं शाळेवरील सुपरइंटेंडेंट यांनीं सरकारास लिहिलें त्यांनीं ३००० रुपये त्याकरितां मंजूर केले असें समजतें.

सर रिचर्ड टेंपल साहेब मुंबईस गव्हर्नर होण्यापूर्वी महिनाभर विलायतेस जाऊन येणार आहेत असें वर्तमान आहे.

व्हाइसराय लार्ड लिटन साहेब यांनीं दिल्ली दरबारसंबंधानें नेटिवपत्रकर्त्यांनीं जीं मतें प्रदर्शित केलीं आहेत तीं सर्व पहावीं अशी इच्छा प्रदर्शित केल्यावरून तीं सर्व मिळवून त्यांचे तरजुमे करण्याची तजवीज चालू आहे.

कुवर गोपेंद्र कृष्ण बहादुर महाराज नरेंद्र कृष्ण बहादुर यांचे द्वितीय पुत्र यांस कलकत्त्यास दस्तैवजांचे रजिस्टर नेमिलें.

राव बहादूर शंभूप्रसाद लक्ष्मीलाल यांस रत्नागिरीस कलेक्टर नेमणार असें वर्तमान आहे.

मुंबईचे बैरामजी जीजीभाई इस्कायर सी. एस. आय. हे पार्शी लोकांच्या कांहीं धर्मसंबंधी उत्साहाकरितां नवसरीस गेले होते तेथें गाडींतून पडून त्यांस मोठा अपाय झाला. कांहीं वेळ तर शुद्धही नव्हती त्यांचे मुलासही थोडी इजा झाली आहे.

मारिशस बेटांत ३ माजिस्ट्रेटच्या जागा भरावयाच्या आहेत त्यांकरितां मनुष्यें पाठवावीं त्यांस ५ ९ हजार रु. सालीना पगार देऊ असें तिकडील सरकारानें हिंदुस्थान सरकारास विचारल्यावरून मद्रास सरकारानें ३ माजिस्ट्रेट पाठवावे असा हुकूम झाला आहे.

मारिशसकडे हजारों मजूर लोकांची नजर आहे पण मद्रासेकडे रोगराई सुरू असल्यामुळें व दुष्काळग्रस्ततेमुळें तशा स्थितींतले लोक तूर्त पाठवितां येत नाहींत असें ठरलें.

मद्रासमध्यें नुक्तेच युरोपियन नावाचें चमत्कारिक पत्र निघालें होतें, त्याचे कर्ते डाक्टर डे. आर ब्रैन यांणीं एका चोरलेल्या चेका(हुंडी)चे रुपये वापरल्याबद्दल त्यांस कलकत्त्यास एक महिन्याची साध्या कैदेची शिक्षा झाली. जज्जानीं या प्रसंगीं त्यास फारसें मद्यपान करूं नये असें सांगितलें.

कलकत्ता एथें सिविल प्रोसिजर कोड या कायद्याबद्दल सरकारास पाठविण्याचा अर्ज मान्य होऊन तो पाठविण्याचा ठराव झाला.

मुंबईस यंदाच्या डिस्ट्रिक्ट वकिलीच्या परिक्षेत ता. १० मार्च रोजीं २९ उमेदवार पसार झाले त्यांचीं नांवें:— केशव धोंडदेव कोतवाल; महादेव रघुनाथ नाडकरणी; कृष्णशंकर गिरिजाशंकर; रामचंद्र केशव लिमये; चिमणलाल; पांडुरंग नीलकंट भडकमकर; मोहनलाल हिरालाल; गणेश हरि वैशंपायन; रामचंद्र गोविंद वाळवेकर; त्र्यंबकाजी गोपाळ; विनायक विठ्ठल टिळक; हरिलाल मंच्छाराम; माधवराम हरिनारायण; बजाजी विठ्ठल विरकर; श्रीकृष्ण भाऊ वाडेकर; मोहनीराज गणेश सप्तर्षि; रामकृष्ण बाळकृष्ण चितळे; वामन बापूजी काणे; गोविंद गणेश गडबोले; हणमंत दाजी जोशी; लक्ष्मण धोंडदेव कातरे; बळवंतराव निरमाजी कुबेर; पेजनजी आदरजी; केशवराव गोपाळ आचार्य; नानाजी विठ्ठल अत्रे; रामचंद्र विश्वनाथ पटवर्धन; रणछोडदास परभूदास; व्रजवल्लभदास मूळचंद; सखाराम गणेश पाटणकर. इं. प्र.

## जुना इतिहास

[ वऱ्हाडाशी भोंसल्याचा संबंध. ]

नागपुरकर भोंसल्यांचा वऱ्हाड प्रांतावर स्वतंत्र ह्मणून बिलकूल अंमल नव्हता. भोंसले व निजाम या दोघांचा या प्रांतावर अंमल असे या करितांच या मुलखास "दोअमली राज्य" असें ह्मणत. एथें एकट्याचा ह्मणून अधिकार नव्हता. दोघेही एकमेकास वचकून असत. वऱ्हाड प्रांतांत भोंसल्यांचें मुख्य काम ह्मटलें ह्मणजे सरदेशमुखी, चौथ, फौजदारी वगैरे बाबी वसूल करून सातारा किंवा पुणें एथें त्यांची भरपाई करून द्यावयाची. तसेंच मुलखाचा बंदोबस्त राखणें हेंही काम त्यांकडेसच होतें, परंतु तें अंगभूत. जसें होळकर, शिंदे वगैरे मंडळीस पेशव्यांनीं निरनिराळ्या मुलखांची देखरेख करण्याकरितां नेमिलें होतें तसेंच वऱ्हाड प्रांतीं नागपुरकर भोंसल्यांचे पूर्वजास छत्रपतींनीं नेमिलें होतें. अखेरपर्यंत भोंसले हे छत्रपतींचे अंकित अशा नात्यानें वऱ्हाड प्रांतीं वागत होते. असें असतां इंग्लिश सरकार, कांहीं इतिहासकार वगैरे भोंसल्यांस "वऱ्हाडचे राजे" ह्मणून ह्मणत, याचें बीज कांहीं कळत नाहीं. बहुधा त्या वेळीं प्रस्तुत सारखी देशाची माहिती नसावी तेव्हां नागपुर काय आणि वऱ्हाड काय एकच, असें समजून प्रथमत: कोणी नाव दिलें असावें, व तेंच आतां अंधपरंपरेनें चाललें असावें असा आमचा तर्क धावतो. भोंसले यांनीं "वऱ्हाडचे राजे" असें स्वत:स कधींही ह्मणून घेतलें नाहीं व त्या नावाला साजेल अशी कधींही कृति केली नाहीं असें दिसतें. प्रथमत: देशाचाराप्रमाणें पहातां आपल्या हिकडे देशावरून नाव घेण्याची चाल नाहीं हें कोणीही कबूल करील. देशावरून किंवा देशभागावरून नाव घेण्याची चाल पाश्चिमात्य आहे. इकडे आडनावावर सर्व कारभार चालतो. होळकर, शिंदे, गायकवाड वगैरे आज आडनावावरच सर्व कामकाज चालवितात व त्यांस अमक्या देशचे राजे असें नाव घेण्याची जरूरी नाहीं हें कोणीही सांगेल. त्याप्रमाणेंच भोंसले यांची स्थिति होती. तेव्हां हें युरोपीय थाटाचें नाव स्वत: होऊन त्यांनीं घेतलें असावें असें मुळींच संभवत नाहीं. तशांत, न वऱ्हाडांत त्यांचा अधिकार अगदीं बच्चा होता हें ते पूर्णपणें जाणत असत असें त्यांच्या कृतीवरून स्पष्ट कळतें.

निजामाचा मोड सन १७६० त उदयगिरि एथें व १७९५ त खर्डा एथें झाला हें सर्व प्रसिद्ध आहे. त्या नंतर वऱ्हाडांतील कांहीं मुलूख निजामानीं पेशव्यास तोडून दिला त्यापैकीं त्यांनीं ब्राह्मणादि गुणिजनांस पुष्कळ इनामें देऊन टाकिलीं त्यांतील पुष्कळ अद्यापि चाललीं आहेत. तसेंच निजामाकडूनही वऱ्हाडांत पुष्कळांस इनामें मिळाल्याचें आढळतें. परंतु भोंसल्यांनीं अशा प्रकारचीं इनामें वऱ्हाडांत दिल्याचें आढळत नाहीं. जर कदाचित् दिलीं असतील तर तीं चालत नसावीं; कारण सन १८०३ त निजामास भोंसल्यांनीं वऱ्हाड प्रांत परत दिला तेव्हां इनामाविषयीं तहांत कोठेंही उल्लेख केलेला नाहीं. परंतु सन १८२२ त पेशव्यांकडून वऱ्हाडप्रांत निजामाकडे परत गेला तेव्हां पूर्वदत्त इनामें चालावीं ह्मणून करार केलेला आढळतो, व त्या कराराप्रमाणें आज दिवसपर्यंत तीं इनामें चालू आहेत. यावरून पहातां असें दिसतें कीं भोंसले हे वऱ्हाडचे संबंधानें आपण पेशव्यांचे अंकित आहों असें पूर्णपणें समजत असत. तसेंच मुधोजी भोंसले यानीं बुल्डाणा तालुक्यांत कांहीं गांव विकत घेतले ते अद्यापि नागपुरकरांकडे आहेत. जर मुधोजी हा वऱ्हाड प्रांताचा मी मालक आहे, असें मानीत असता तर गांव विकत घेण्याचें प्रयोजन नव्हतें. असो. याच मुधोजीस उद्देशून हेस्टिंग्स् व बर्क यांनीं 'वऱ्हाडचा राजा' असें ह्मटलें आहे. हें नांव केवळ भ्रांतिमूलक आहे. यामुळें हिंदुस्थानचा इतिहास वाचतेवेळीं गोंधळ होण्याचा संभव आहे, कारण 'वऱ्हाडचा राजा' असें ह्मटल्यानें सकृद्दर्शनीं 'निजाम' असा बोध होतो. आतां हा नांवाचा सावळागोंधळ इतिहासकार केव्हां दूर करतील तो करोत. वऱ्हाड प्रांतांत भोंसल्यांचा किताब "सेना साहेब सुभा" असा असे.

वऱ्हाड प्रान्तांत मराठ्यांचा अंमल केव्हापासून सुरू झाला याचा निश्चयात्मक कालनिर्णय होत नाहीं. मराठ्यांचा अंमल बसण्यापूर्वी मोंगल बादशहाचे हातीं वऱ्हाड प्रान्त होता, तो त्यांनीं मलिक अंबर हा १६२८ त मरण पावल्यानंतर लवकरच ह्मणजे १६३० चे सुमारास हस्तगत करून घेतला. तेव्हांपासून पुढें सुमार शंभर वर्षेपर्यंत तो मुलुख दिल्ली दरबारचे खास अखत्यारांत होता. वऱ्हाड प्रान्त मोंगलाचे हातीं लागल्यापासून त्याचा बंदोबस्त करण्याकरितां एक सुभेदार पाठवित असत. सन १६९० त दक्षिणचे सुभेदारीवर अवरंगजेब यांस पाठविलें. त्या नंतर मराठ्यांची दृष्टि वऱ्हाडाकडे वळली. त्यांनीं या प्रान्तावर किती वेळा स्वाऱ्या केल्या, किती वेळा देश उद्ध्वस्त करून सोडला याची तपशीलवार हकीकत कळत नाहीं. इतकें मात्र खास कळतें कीं, मराठ्यांच्या स्वाऱ्यामुळें अवरंगजेबाचे वसुलास फार धक्का बसला, व आसपासचे राजास दहशत पडली. देवगडचा राजा बख्त बुलंद यास असें वाटलें की, धर्मांतर केल्यास अवरंगजेबास रुचून तो आपल्यास मराठ्यांच्या तडाक्यांतून सोडवील, ह्मणून त्यानें पूर्वी हिंदु असतां मुसलमान धर्म स्वीकारला, इतका मराठ्यांचे नावाचा त्या काळीं प्रभाव होता. नंतर बख्त बुलंद याणें कांहीं काळानें अवरंगजेबावरच शस्त्र उचललें. सन १६७१ त शिवाजीचे सरदार प्रतापराव याणें उमरावतीजवळ कारंजें ह्मणून गांव आहे तेथपर्यंत पल्ला आणून पोंचविला. त्याच खेपेस गावचे पाटील कुळकर्णी यांजकडून चौथ देण्याचे कबूल करविलें. त्या वेळेपासून वऱ्हाड प्रान्तीं मराठ्यांचा प्रभाव वृद्धिंगत होत चालला व अर्थांतच मोंगलांचा पक्ष क्षीण होत चालला. सन १७०७ त अहमदनगर एथें अवरंगजेब मरण पावला. ते वेळेस वऱ्हाडांत व दक्षिणेंत मोंगलांची सत्ता बहुतेक नष्ट झाली. पुढें दिल्ली दरबारांत सर्वत्र अंदाधुंदी झाली, त्यामुळें मराठ्यांचें पाऊल पुढें सरकत चाललें. दक्षिणेंतील सहा सुभ्यांत सरदेशमुखी, चौथ वगैरे बाबी मराठ्यांनीं वसूल कराव्या ह्मणून फिरूकशियर बादशहाचे दिवाण जे दोघे सय्यद होते त्यांनीं सन १७१८ त सनद करून दिली. यामुळें मराठ्यांची सत्ता फार बळावली. कांहीं काळानें सर्व वऱ्हाड प्रांत त्यांचे हातीं लागला असता परंतु मध्यंतरी एक बलवत्तर विघ्न येऊन उभें राहिलें तें असें:—

सन १७२० चे सुमारास दक्षिणचा सुभेदार निजाम उलमुलुख चीन कुलीच खान यानें दिल्ली दरबाराशीं जो संबंध होता तो तोडण्याविषयीं यत्न आरंभिला. तो पुढें ४ वर्षांनीं ह्मणजे १७२४ त सिद्धीस गेला. तितक्यांत सय्यद पक्षीया बराबर त्यास ३ लढाया देणें लागल्या. त्यांत तिसरीनें सर्व निकाल केला. ती बुल्डाणें जिल्ह्यांत फत्तेखेलडा ह्मणून गाव आहे तेथें १७२४त झाली. तेव्हांपासून वऱ्हाडप्रांतावर निजाम व मराठे या दोघांची सत्ता चालू झाली. दोघेही प्रबल असल्यामुळें व तशांतून दोघांचा दम ताजा असल्यानें कोणाचेंही विशेष वर्चस्व झालें नाहीं. दोघांची सत्ता कांहीं कांहीं प्रांतावर होती या करितांच वऱ्हाडास "दोअमली राज्य" असें ह्मणत.

[ पुढें चालू ] वि. वि.

## विक्रीस तयार,

**स्कन्दपुराणांतर्गत सह्याद्रि खंड.**

हा ग्रंथ मराठी टीकेसह प्रसिद्ध करण्याबद्दल चार वर्षांपूर्वी मुंबईतील मराठी वर्तमानपत्रांत जाहिराती प्रसिद्ध होत होत्या; इतकेंच नाहीं, पण त्या जाहिराती देणाऱ्यानें दर प्रतीस १० रुपये प्रमाणें अगाऊ पैसाही घेतला आहे. असें असून अद्याप त्यांच्याकडून पुस्तक प्रसिद्ध झालें नाहीं. हल्लीं या ग्रंथाच्या मूळ प्रति डाक्तर जे. जर्सनदा कुन्हा यांणीं निर्णयसागर छापखान्यांत छपून काढल्या आहेत. हें काम त्यांनीं काशी, कोचीन, कर्नाटक व इतर ठिकाणच्या चौदा प्रती मिळवून दुसऱ्या शास्त्र्यांच्या मदतीनें ताडून पाठांतर आढळलें तें टीपेंत दाखविलें आहे; आणि रेणुकामाहात्म्य, चंद्रचूडामहात्म्य, नागाव्हयमाहात्म्य, वरुणापुरमाहात्म्य, कामाक्षीमाहात्म्य, व मार्गीशमाहात्म्य इतके भाग जोडले आहेत, पुस्तकास कागद उत्तम घातले असून छपणावळ फारच सुरेख आहे; आणि इतकेंहि असून किंमत फार थोडी ह्मणजे १ रुपये ठेविली आहे.

पुस्तकें मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर देवसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत खालीं सही करणार यांजकडे मिळतील. बाहेर गावच्या लोकांस टपालखर्च आठ आणे जास्त पडतील.

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी
म्यानेजर, विविधज्ञान विस्तार.

हें पत्र अकोले एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERED NO. 6,1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला रविवार ता० २५ माहे मार्च सन १८७७ इ० | अंक १२

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| „ अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| „ अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र शुरू केले जाईल.

---

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| „ दुसरे खेपेस | ०२ |

---

## नोटिस.

रामसा वल्लद बचूलाल कलाल रहाणार अकोले यांस खालीं सही करणार याजकडून अशी नोटिस देण्यांत येतें कीं, तुमचेकडे संवत १९३२ सालचे गुळाचे सरकती बाबद बाकी घेणें, रुपये १९६०–॥. येणें असून तुह्मांस मागतां आजवर दिले नाहींत याजकरितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, सदर्हू रुपये व्याजासुद्धां नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत द्यावे. या मुदतींत रुपये दिले नाहीं तर तुह्मावर फिर्याद करून या नोटिशीचे व कोर्टाचे खर्चा सहीत रुपये भरून घेण्यांत येतील. तारीख १७ माहे मार्च सन १८७७ इसवी.

[ सही ] रामापा दगडापा वाणी वस्ती अकोले दस्तुर खुद.

---

### नोटिस.

रामापा वल्लद दगडापा वाणी रहाणार अकोला यांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं, तुमची नोटिस तारीख १७ मार्च सन १८७७ इसवीची आली तिचे उत्तर देतो कीं तुमचे आमचे कोणतेही रोजगारांत कधींच शराकत झाली नसून तुह्मास वळखतही नाहीं सबब नोटिसींत रुपये लिहिलेले ओंह्मांस देणें नाहीं. जबाब दिल्याचे नोटिसीचे खर्चाबद्दल रुपये पाठऊन द्यावे नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज होईल. तारीख १२ माहे मार्च सन १८७७ इसवी.

( सही ) रामसा बचूलाल कलाल दस्तुर खुद

---

### नोटिस.

नोटिस—महमद आरब वल्लद वली महमद मुसलमान रहाणार बिठोड हल्ली मुक्काम वाशिम यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे वाशिम एथील गढीचे आंत जमीनींत आमच्या विटा आहेत त्या तुह्मी विकल्या असून हल्लीही विकण्याचें काम सुरूं आहे. त्याजवर तुमचा हक्क नाहीं. सदर्हू गढी व गढीचे आंतील विटा वगैरे सर्व आमच्या मालकीच्या आहेत. यास्तव तुह्मास नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी सदर्हू विटा विकूं नये. जर विकाल तर नुकसानीचे रुपये या नोटिशीचे खर्चासुध्धां तुह्मावर फिर्याद करून घेतले जातील. कळावें. तारीख १४ माहे मार्च सन १८७७ इसवी.

[ सही ] सयदशाहा अमीरुल्ला काघी वल्लद सयदगुलाम गौष काजी प्र. वाशिम याची फार्शी.

---

### नोटिस.

सिताराम वल्लद शामजी चांणे रहाणार कुटासें तालुके अकोलें यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून मजला सात वर्षे झालीं तुह्मी नांदवित नाहीं. खाण्या पिण्याची व अन्नवस्त्राची खबर घेत नाहीं. मजला पंचांनीं तुमचे घरीं एक दोन वेळा आणून घातलें यांत माझा कोणताही अन्याय नसून बहाणा करून आई बापाचे घरीं आणून घालता. पण माझ्या बापाचें ह्मातारपण आहे तेव्हां मी त्याचे एथें राहून किती दिवस निर्वाह करावा ? करितां आतां माझे अन्नावस्त्राचे खर्चाबद्दल दरसाल ६० अक्षरी साठ रुपये प्रमाणें सात वर्षांचे ४२० चारशें वीस रुपये मजला द्यावे व मला घेऊन जाण्याची सोय करावी. मी नांदण्यास हजर आहे. सदर्हू लिहिलेले रुपये आठ दिवसांत तुह्माकडूल न आल्यास मी आपला रस्ता पाहीन व अन्नवस्त्राबद्दल योग्य कोडतांत दावा करीन व दुसरा नवरा करण्यास रस्ता पाहीन. करितां दिलेल्या मुदतींत माझी नांदविण्याची सोय करावी. अगर तुह्मास काय जबाब देणें असेल तो द्यावा. यांतून एकही न केल्यास मी रीतीप्रमाणें तजवीज करीन हें खूप समजावें. कळावें तारीख २० माहे मार्च सन १८७७ इ०

( सही ) सिताई मर्द सिताराम चांणें निशाणी बांगडी.

---

### नोटिस.

राजश्री सुकलालचंद मारवाडी साहूदुकान वाडी अदमपुर तालुके अकोट यास पुरणाजी पाटील मौजे वाडी अदमपुर तालुके अकोट याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे दुकानची खातेबाकी देणें आहे ती गेल्या महिन्यांत आह्मी रोख तुमचे दुकानीं घेऊन आलों असतां तुह्मी घेतले नाहींत व आह्मास पावती दिली नाहीं. या गोष्टीला चार असामी भले गृहस्थ साक्षीदार आहेत. सदर्हू रुपये तुह्मी न घेतल्यामुळें आह्मी घरीं आणून तिन्हाइती रकम ठेविली आहे. सदर्हू मिती पासून तुमचे रकमेचें व्याज बंद होऊन आमचे राखून ठेवलेल्या रकमेचें व्याज तुह्मावर सुरूं आहे असें समजावें. आणि तुह्मी कोर्टांत फिर्याद वगैरे केली असतां तुह्मास कोडताचा खर्च मिळणार नाहीं. व या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. तारीख २० माहे मार्च सन १८७७ इसवी.

[सही] पुरणाजी वल्लद गोपाळजी पाटील दस्तुर नामदेव पुरणाजी पाटील.

---

### भरतखंडवासी सुजनांस प्रार्थना.

श्रीमंत महाराज, राजेसाहेब, थोर सरदार, जाहगिरदार, इनामदार, नामांकित सावकार, वतनदार. कुलभूषण, देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील कुळकर्णी, आदिकरून कुलवान गृहस्थ, मोठमोठे कामगार, स्वदेशाभिमानी व दौलतमदार नबाब साहेब, बहादुर हजरत काजी नायब काजी साहेब, खानसाहेब, प्रांतांनी व जिल्ह्यांनिहाय इलाखा मुंबई मद्रास आणि कलकत्ता यांचे सेवेशी व हुजूरास—

तालुक्यानिहाय जिल्हा पुणें व सोलापुर यांतील रयतेचे आज्ञेवरून प्रार्थना व अर्ज करण्यांत येतो ऐसाजे—या भरतखंडांत शास्त्र व कुराणाचे अधारें आर्यबंधु व महमदी धर्माचे सुजन वर्ततात. शास्त्रसिद्धांत व कुराणांतील शर्त अशी आहे कीं संकटसमयीं बंधूचें नात्यानें परस्पर मदत करून अनाथास रक्षावें तें असें—विद्वानानें विद्यारूपानें, शरीर संपतीवाले आहेत त्यांनीं मेहनतीनें, धनाढ्य आहेत त्यांनीं द्रव्यरूपानें, वैद्यानें रोगग्रस्थांस औषधी देऊन रोगमुक्त करावें, कोणी अगींत जळत पडून अघात मृत्यूनें मरत आहे त्यास शरीर संपतीवाल्यांनीं धाव मारून जाऊन काढावें, धनाढ्य लक्ष्मीपति यानें संकटसमयीं अनाथास अन्नवस्त्र देऊन रक्षावें, दुष्टशत्रु तस्करानीं गौब्राह्मणास पीडा केल्यास रणशूरानीं जाऊन चोराचा पराभव करून गौब्राह्मणइत्यादिकांस रक्षावे. असी ईश्वराची व सिद्धांताची आज्ञा व खुदाचा हुकूम आहे. पाप पुण्य समान झाल्याविना नरतनु प्राप्त होत नाहीं. नरतनूचें कर्तव्य काय? परोपकाराचीं, स्वदेश कल्याणाचीं सार्वजनिक कामें प्रत्येक व्यक्ति मात्रानें आपापले शक्तिप्रमाणें मनःपूर्वक करून जगांत बंधूचा अशीर्वाद घेऊन मागील पापाचा नाश करावा ह्मणजे तो प्राणी या जगांत शतमान आनंदानें राहून परलोकीं जाऊन धन्य होऊन हयातीमागें लक्षानुलक्ष वर्षे सुकीर्तीस पात्र होतो. पहा प्रतापसिंव्ह, शिवाजी महाराज, बाजीराव बल्लाळ, पेशव्याचे स्वदेश प्रीतीकडे धाराशूर राणोजी शिंदा, मल्हारराव होळकर, दमाजी गाईकवाड, रघोजी भोंसला यांचे पराक्रमाकडे पहा कीं ज्यांनीं शौर्यानें गोब्राह्मण रक्षिले. दानशूर दामाजीपंत बेदर सरकारचा कारभारी, राजा चंदुलाल, गोकुळ कौंडे (हैदराबाद) सरकारचा कारभारी गोपाळराव मैराळ बडोदेकर, या जगविख्यात पुण्यपुरुषांनीं अनाथाचे सरकार बनून अनाथांच्या दादी घेऊन वेळोवेळीं संकटसमयीं रक्षिलें. याप्रमाणे पाहिलें असतां गेल्या पांचशें वर्षांत ही भरत भूमी वीरमाता नऊ धुरंधर पुत्र प्रसवली तद्वत् वीरकन्या ही प्रसवली त्यांचे कर्तव्याकडे सुजनहो डोळे उघडून पहा.—शके १३१८मध्यें बारा वर्षे दुष्काळ पडला होता त्यावेळेस वीरकन्या दुर्गा नावाची लमाणीन होती तिनें धैर्य न सोडितां ९।१० लक्ष बैल जमवून सुकाळाचे प्रांत चीन, नेपाळ, ब्रह्मदेश एथून धान्य आणून दक्षिण व उत्तर प्रांतास पुरविलें. जे दरिद्री होते त्यांस धर्मार्थ धान्य देऊन रक्षिलें. जेव्हां परजन्यवृष्टी झाली तेव्हां प्रत्येक गावास एक एक बैल व एक गाव जनावरांचे उत्पतीसाठीं देऊन पेरण्याकरितां एक एक गोणी धान्य दिलें हे अलौकिक कर्तव्य दिल्लीचे पातशानें विलोकून बडा दरबार भरवून त्यांत दुर्गादेवी जगाची माता हे पद देऊन मोठा जयजयकार केला. गेल्या शतकांत अहिल्यामाता होळकरीण जगविख्यात झाली. या मातेनें काशी रामेश्वरापर्यंत रस्तोरस्ती यात्रेकरू लोकांकरितां विहिरी खणून उदकाची तयारी ठेविली. जागो जागीं तीर्थांचें ठिकाणीं श्रीरामचंद्राचीं मंदिरें बांधून त्यांतून अन्नसत्रें सदैव ठेविलीं. प्रसंगोपात पाठीसीं बाणाचें भातें बांधून हत्तीच्या हौद्यांत बसून ठाण मांडून शत्रूवर बाणाचा वर्षाव करीत असे ह्मणून अहिल्या मातेचा शत्रूस मोठा दरारा असे. यामुळें भरतखंडवाशी सुजनांस ज्या ज्या प्रसंगीं वरील परोपकारी आर्य जननीचे सुपुत्राच स्मरण होतें त्या त्या वेळेस मानाव डोलवून त्यांस अशिर्वाद देतात. आमचे श्रीमंत महाराज व सरदार, जहागिरदार, नामांकित सावकार, जमेदार, मोठमोठे कामदार बांधवहो सदर्हू उदाहरणाकडे पूर्ण लक्ष पुरवून त्या जीवनमुक्त पुरुषाचें कर्तव्य ध्यानांत आणून परोपकाराचे कामीं दक्ष राहून त्यांचे ओळींस आपलें नाव इतिहासांतून विद्युलते सारखें सदैव चमकण्यासाठीं या घोर दुष्काळ समयीं आपापले शक्तीप्रमाणें मदती करा. गेले आश्विन मासीं दुष्काळ रूपी राक्षसाचा जन्म झाला. तो जसजसा वाढू लागला तसतसा जाभाडें पसरून एतद्देशीय अनाथ स्त्रिया पुरुष व बालकें दाढे खालीं रगडून फन्ना करूं लागला. त्याचे मुख फोडून अनाथ रक्षावे ह्मणून आपले सरकारांकडे हजारोंचे हजारों सह्यानिसीं अर्जावर अर्ज केल्यावरून लहान मोठीं

कामें सुरूं करून इंदापुर तालुक्यांतील जी धीर धरून —३/४ पर्यंत प्रजा राहिली त्या पैकीं १/३ प्रजेचा तीन महिनेपर्यंत साधारण रीतीनें गुजारा झाला बाकीच्यांत जे अन्नदार ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य, शूद्र होते त्यांस खडक, मुरूम, माती, वाहण्याची मजूरी करणें मरणप्राय असतांही जिवाचे बचावासाठीं काम करण्यास हजर झाले असतां कामावर लाविले नाहींत ह्मणून ते अन्नें आपले घरांत राहून उदकपान करून मरूं लागले हें विलोकून ठिकठिकाणचे धुरंधर महाराजाकडे पत्रें लिहिल्यावरून परम दीनाचे दयाळू श्रीमंत महाराज तुकोजीराव बाबा साहेब होळकर याजकडून रकम रुपये १०६४ व बडोद्यात प्रख्यात सावकार श्रीमंत राजश्री गंगाधरराव यशवंत उर्फ बाबा साहेब व माधवराव रामचंद्र उर्फ दादा साहेब फडणीस निसबत समशेर बहादूर सरकार याधिमंत पुरुषांनीं ११२९ रुपये मदत व गावांतील सावकार लोकांकडून जी मदत आली त्या सर्व मदतीचा उपयोग तालुके इंदापुर एथील सार्वजनिक सभेचे अध्यक्ष परोपकारी श्रीमंत राजश्री माधवराव वामन उर्फ नाना साहेब जहागिरदार व तिसरे प्रतीचे सरदार यांणीं सभासदांचे साह्यानें अनर्थाकडे उपयोग केला. त्या रकमा संपत आल्या आणि सरकारांनीं मजुरास दर गेल्या दोन महिन्यासून अतिशय कमी केला. तो बिगारी यास दोन आणे पैकी सवा आणा; औरतीस दीड आणा पैकी एक आणा व मुलास दीड आणा सवा आण्यापैकी नऊ पै प्रमाणें देण्याचा ठराव केला. त्या पशानें एक वेळसुद्धां पोटभर अन्न मिळेना. मजूरलोकांस तीन वेळ खाना भाजी भाकरी पाहिजे त्यापैकीं दोन सांजीं भुके रहाणें भाग पडून सक्त मजुरीचें काम करावें लागतें. पोटांतील आग शमनार्थ हवें इतकें पाणी पिऊन रात्रौ थंडींत, वाऱ्यांत पडून; थंडीनें पोट फुगून जुलाब, उलट्या होऊन शकडों अनाथ मजूर लोक कुत्र्याचे मोतीनें मेले व मरतही आहेत. इतक्यांत गेल्या आठवड्यापासून कितीएक कारखान्याचे पैसे शिलक असतां अपुरीं कामें बंद केल्यानें तालुक्यांत काम नाहीं काम नाहीं ह्मणून लोकांस धान्य देणें, अन्न घालणें बंद करणें भाग पडल्यामुळें पुन्हा पूर्ववत् हायहाय उडाली. ह्मणून भरतखंडवासी थोर, कुलवान, श्रीमंत महाराज, सरदार सावकार, जमीदार यांस व मोठमोठे कामगार यांस जगतकल्याणासाठीं माझ्या नम्रतेनें व सप्रेम अंतःकरणानें प्रार्थना आहे कीं आपापले शक्तीप्रमाणें द्रव्यरूपी मदत आमचे नावें वा ढविणें ती मुंबई इलाख्यांत, पुणे जिल्ह्यांत तालुके इंदापूर येथें देणें ह्मणून पत्ता लिहून रकमा पाठवाव्या. अगर इंदापुर सार्वजनिक सभेचे अध्यक्षाचे नावे व सभेचे खजीनदार रा. रा. रंगो सखाराम दुनाखे प्रसिद्ध सावकार यांचे नावें रकमा पाठविल्यास त्याच्या पावत्या मिळून खर्चाचे हिशेबही सही सिक्यानिसी श्रीमंत महाराज होळकर सरकारकडे रवाना झाले तद्वत आपलेकडेस रवाना होतील. आमच्या नावें जरी रकमा पाठविल्या तरी त्या आह्मी सार्वजनिक सभेकडे पावत्या करीत आहों. त्याचा यथान्याय व्यय सभा करित आहे, अमुक रकम पाठविल्याबद्दल जबाब मात्र आमचे नावें मुक्ररर यावा. या महत संकट समयीं मदत करणें खरें कुलवान धुरंधर पुरुषाचें कर्तव्य आहे. कळावे लोभ व मेहरबानी असावी ही विज्ञापना. मिती चैत्र शुद्ध १ शके १७९९.

रयतेचे आज्ञेवरून.
गोपाळ नरसिंव्ह देशपांडे
इंदापुर वगैरे तालुक्यानिहाय
रयतेचा एजंट व कुलमुखत्यार.

---

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. देऊळगावराजा एथें फार दिवसानीं दैवयोगानें श्रीव्यंकटेश लायब्ररी स्थापण झाली आहे. ती आपले वाचकांस माहीत असेलच. तिची वर्गणी सुमार सत्तर पंच्याहात्तर रुपये आली आहे. आठ वर्तमानपत्र येत असतात. वर्गणीदार बहुतकरून संस्थानेंच लोक, सरकारी मास्तर, डाक्टर व चीफ हेच आहेत. गावचे लोकांस याची अभिरुची नसल्यावरून ते कांहीं मदत देत नाहींत.

एथील मुलीच्या शाळेस कमिटीकडून एक असिस्टंट मिळावा अशा विषयीं दि. क. साहेबांचे म्युनिसिप्यालिटीस लिहून आलें आहे परंतु आमचे मेंबर काय समजुतीची राय देतील सांगवत नाहीं.

इंग्लिश मराठी स्कुलचे मास्तर फार चांगले असून यांची मुलास सांगण्याची शैली बरी आहे तेणेंकरून त्या स्कुलाची व्यवस्था उत्तम दिसते.

एथील चीफ रजेवर आहेत कारण त्यांचे बंधू मांदे असल्याची खबर ऐकल्यावरून त्यांनीं रजा मागविली.

एथील पोष्ट व दवाखाना यांचीं कामें उत्तम प्रकारें चालू आहेत. कारण हल्लीं नेमलेले लोक स्वभावानें चांगले असून सरकारी कामांत दक्ष आहेत व लोकप्रिय आहेत. या बारीची आमचे गावीं एकंदर सरकारी लोकांची थोप फारच उत्तम आहे.

मागें आपले एका अंकांत मोगलाई इलाख्यातील परभणीचे तहशिलदार हरी रामचंद्र मोढे यांचेवर मुकद्दमा झाल्याचें लिहिलें होतें. त्याचा सर्व निकाल होऊन त्यास नोकरी मिळाली. व ते एथें श्रीजीचे दर्शनास आले होते. निकाल झाल्यावर त्यांनीं सांगितलें मग खरें खोटें काय असेल ते असो.

रा. रा. गोपिनाथ हरी खामगावकर म्याट्रिक्युलेशन पास झालेले एथील राहाणार हे ४ महिने अ. नोकरीवर खामगावीं मास्तर होते ते एथें आले आहेत. त्यांना आमचे लोकप्रीय डायरेक्टर साहेब नोकरी देतील अशी उमेद आहे कळावें ही विनती.

एक देउळगावकर

---

## वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र शुद्ध ११ शके १७९९

## ईश्वरप्रार्थना.

ईश्वरा मी तुझा दास, आहे अज्ञान केवळ
द्याया विवेक सद्बुध्धी माझ्याकडे सदा वळ
॥१॥
अनावर क्रोध रोग येणें गांजू नये मला
कदाकाळीं असा द्यावा दासाला वर चांगला
॥ २ ॥
प्रार्थनेच्या सर्व वेळीं असावें नच सुस्त कीं
अशासाठीं तुझा देवा मागतों हस्त मस्तकीं
॥ ३ ॥
दुर्वासना मनीं येती अनेका त्यास आवरी
शुध्धचित्त स्वस्थवृत्ती द्याया दासीं कृपा करी
॥ ४ ॥
लोभ हेवा अहंकार दंभ मत्सर चाहडी
व्यभिचार तशी चोरी यांसि मर्द्दैर तूं जडी
॥ ५ ॥
सदा प्रीति तुझ्या स्तोत्रीं, सदा वीट जनस्तवीं
सदा सख्य भल्या लोकीं असो वीटहि येरवीं
॥ ६ ॥
पीडितातें साह्य द्यावें स्वयें कोणा पिडूं नये
लोकां सन्मार्ग दावावें स्वयें त्यातें त्यजूं नये
॥ ७ ॥
उपतिष्ठो हेंच गुह्य मानसीं पूर्ण यास्तव
अष्टकें या करी देवा दास हर्षें तुझा स्तव
॥ ८ ॥

---

## मातीच्या भांड्यांचा नवा कारखाना.

भरजरीचीं वस्त्रें बारीक विणणारे, शालजोड्या, हिरे वगैरे रत्नें सोन्या रुप्याचे व जडावाचे डागिने यांहीं करून हजारों वर्षांपासून आमचा देश नामांकित आहे, परंतु मातीच्या भांड्याविषयीं यांत कधीं कोणत्या काळीं सुधारणा होती असें दिसून येत नाहीं, गरीब लोक वापरतात तीं मडकीं डेरे व घराचे कामीं आपण लावतो त्या विटा, कौल या भिकार व आवढ धोबड पदार्थीं शिवाय मातीचे सुबक व कारागिरीचे पदार्थ आपले देशांत होत नाहींत. तरी याबद्दल पूर्व कालचे लोकांस दोष देतां येत नाहीं. कारण त्या काळीं देश धन कनक संपन्न होता त्यामुळें या दरिद्री वस्तूंकडे लोक कशाला लक्ष्य देतील ? सोन्याचे किंवा चांदीचे ताट जेवावयास असलें तर मातीचा परळ त्या ऐवजी असावा असें कोणी इच्छिणार नाहीं. रुप्याच्या वाट्या कोणाच्या जेवणांस मांडल्या तर चीनी पेले कां नाहींत ह्मणून कोणी

यांचे येथे चारुसणार नाहीं. तसेंच सुंदर धातुची तांब्याआपल्या सौ पंचपात्री कोणास पाणी प्यावयास दिली वऱ्हाडभर तर त्या ऐवजी मडकें व बेळके किंवा ग्लास यावे व स असावें अशी कोणी हौस धरणार नाहींक त्यांच्या अशी आजच्या काळास आमची स्थित एक दोन आहे मग चालत्या व संपत्तीच्या काळांविलें होतें. ती किती शिखरास गेलेली असेल याची. त्यांच्या सहज कल्पना. हे ते ह्मणून मातीचीं भांडींकडे इतकें करण्याचे विशेष भूषणास्पद कारखाने " अजात मचे देशांत झाले नाहींत. आमचे देशांनां फारच या कारखानेवाल्यांची एक स्वतंत्र जात आहे त्यास कुंभार ह्मणतात. त्या प्रत्येकाचे या कामाचें साधन एक गाढव, गावांतील उकिंडा आणि नदीचा गाळ असला ह्मणजे झालें. शिवाय भांडवलाची कांहीं जरूरी नाहीं. सारांश देशांत विपूल संपत्ती असल्यामुळें उत्तम व मध्यम प्रतीच्या लोकांस मातीचीं भांडीं वापरणें ह्मणजे दरिद्राचें व गैरअब्रूचें लक्षण वाटत असे. असो.

सदरहू प्रकारचा काळ आतां बदलला आहे. ह्मणजे वरच्या प्रतीचे लोकही आतां पहिल्याप्रमाणें सुखी व संपन्न नाहींत. व इंग्रज सरकारच्या साहचर्यानें कुंजे, बरण्या, बशा, चिनी पेले वगैरे जिन्नस दृष्टी पुढें पुष्कळ येऊं लागल्यामुळें त्याविषयीं आवड उत्पन्न होऊं लागली व धातूच्या पदार्थांपेक्षां त्यांनां किंमत कमी पडून सफाई व सुबकपणा त्यांत जास्ती असल्यामुळें लोकांचा कल त्या जिनसांच्या खरेदीकडे बराच जाऊं लागला व त्यामुळें लाखो रुपयांचे असे जिन्नस इंग्लंड व चीन वगैरे देशांतून प्रतिवर्षीं इकडे येऊं लागले हें पाहून तसे सुरेख जिन्नस इकडेच बनवावे अशाविषयीं लोक प्रयत्न करूं लागले. व त्यांत मुंबईचे पार्शी गृहस्थ मेसर्स पेरोजशा आणि कंपनी यांनीं दोन वर्षें त्या कामाकडे सतत लक्ष्य पुरवून विलायती धरतीवर एक मोठा कारखाना दादरच्या स्टेशनाजवळ नायगाव एथें मांडला आहे. व या महिन्याचे तिसरे तारखेस त्यांनीं मुंबईहून पुष्कळ थोर थोर गृहस्थांस पाचारण करून कारखान्याच्या सुरुवातीचा रीतीप्रमाणें आनंददायक समारंभ केला.

या कारखान्याचे मालक ३ पार्शी गृहस्थ आहेत त्यांपैकीं दोघेजण विलायतेस जाऊन तिकडे बरेच दिवस राहून कलाकौशल्याचे कामाची माहिती करून घेऊन आले आहेत. मि. पेरोजशा हे तर विलायतेहून पुढें अमेरिकेसही गेले होते. व त्यांनीं त्या देशांतील उपज व त्याचा इतिहास यावर एक ग्रंथही लिहिला आहे असें समजतें. असो.

ज्या दिवशीं हा कारखाना उघडण्याचा समारंभ झाला त्या दिवशीं त्या कारखान्यांत दोन दिवसपर्यंत खटपट करून जीं सुरेख कामें तयार केलीं होतीं तीं व्यवस्थाशीर मांडून ठेविलीं होतीं. तीं पाहून लोक चकीत होऊन गेले. त्यांनीं स्पष्ट ह्मणून दाखविलें कीं, या कारखान्यांत आह्मी उभे आहों ह्मणून हे पदार्थ एथचे आहेत असें आह्मी ह्मणतो नाहीं तर हे विलायतचे किंवा चीनचे नव्हत असें ह्मणण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. नंतर मि. पीरोजशा यांस बाकीच्या भागिदारांनीं एक उंची शालजोडी नजर दिली.

मच्या देशाच्या मागील समजुतीप्र कुंभारकाम हलकें असें मनांत न तां या उद्योगी पार्शी गृहस्थांनीं दृढ रानें हें काम हातीं धरून तडीस नेलें बद्दल त्याची तारीफ केली पाहिजे. गेल्या आठवड्यांत नामदार गवरनर साहेब वे हा कारखाना पहाण्यास मालकाच्या निमंत्रणावरून गेले होते व पाहून फार संतोष पावले. लोकांकडून तुह्माला चांगला आश्रय मिळो अशी आमची इच्छा आहे असें गवरनर सा. ह्मणाले.

## ब्रिटिश सरकारची थोरवी

सरकार असें ह्मटलें ह्मणजे प्रजेचे संरक्षणार्थ त्यांपैकीच निवडलेली एक मंडळी होय. तरी आपणांतून प्रत्येक व्यक्तीस जो अधिकार आहे त्यापेक्षां कांहीं पटीनें सरकारचे अंगीं अधिक आहे यांत संशय नाहीं. आतां प्रजेपैकीं कोणी ह्मणतील कीं, आह्मी आपल्या संरक्षणार्थ योजिलेल्या व्यक्तीहून आह्मास अधिकार कमी आहे काय? ह्मणजे आमच्यापेक्षां आमच्या नोकरास सत्ता अधिक दिली आहे काय? व आमच्यावर ती वर्चस्व ठेविल काय? यावर आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, तुह्मी एकेक व्यक्तीनें ठेविलेल्या स्वतंत्र नोकरावर जशी तुमची सत्ता आणि अधिकारहीं चालतील तद्वत् एका राष्ट्रानें ठेविलेल्या नोकरावर त्याच राष्ट्रा पैकीं एकजण अधिकार चालवूं ह्मणेल तर त्या एकट्याचा चालणार नाहीं. तेव्हां अर्थांत धन्यांपक्षां नोकरास अधिक शक्ति आली. मग ज्याला आपण श्रेष्ठ पदवी 'सरकार' अशी देऊन आपण गरीबीचें 'प्रजा' हें नाव स्वीकारिलें व तेंही आपण प्रत्यक्ष नव्हें, तर वाडवडलांपासून त्याचें वैभव, त्याची शक्ति व त्याचा अधिकार हीं गाजत आलीं. त्यावर आपण "कहां राजा भोज और कहां गंगना धोबी" याप्रमाणें आपण एक व्यक्तीच्या शक्तीचा दाब घालण्याची इच्छा धरूं तर सहसा होणें नाहीं. आतां हें खरें आहे कीं, प्रजा समुदाय जें करील तें होऊं शकेल कारण सरकारास जेवढे ह्मणून हक्क प्राप्त झालेले तेवढे प्रजेकडूनच आहेत. ह्मणून ती ते अधिकार कमी करण्यास अगर जास्त करण्यासही समर्थ असलीच पाहिजे. तरी बराचकाळ 'बळी तो कान पिळी' किंवा 'ज्याचे हातीं ससा तो पारधी' याप्रमाणें अवस्था होऊन योजिलेले संरक्षक [राजे] होऊन आम्ही प्रजाजन चांगली गुलामपणाची स्थिति अनुभवित आहों. पण लिहावयास संतोष वाटतो कीं, ब्रिटिश सरकारचे राज्य रीतीची रुचि समजू लागल्यापासून आमचें बरेंच अज्ञान नाहींसें होऊन आम्हास विद्या, कला, कौशल्य यांत्रिकशक्ति यांजविषयीं समजूं लागून, राजा व प्रजा यांचे परस्पर हक्क, अर्थशास्त्र, स्वदेशप्रीति इत्यादि उत्तमोत्तम विषय किंचित् उमजूंही लागले आहेत. व अशी उत्तरोत्तर वृध्दी होत गेली तर कालांतरानें आमचें अज्ञान समूळ नाहींसे होण्याचा संभव आहे आपले पूर्वज जे आर्य ते प्राचीनकाळीं मोठ्या सुधारणेच्या कळसास जाऊन पोचले होते पण त्यांजवर जीं अनेक तुफानें (यवनांच्या स्वाऱ्या) गुजरून ती धुळधानी झाली होती तिचें निवारण करून पूर्व स्थितीकडे वळविलें ही सर्व थोरवी ब्रिटिश राज्य रीतीची होय.

सरकारची सर्व थोरवी प्रजेचे सुखावरच अवलंबून आहे ह्मणून प्रजा सुखी राखणें हें राजाचें पहिलें कर्तव्यकर्म होय. पण जे राजे हें कर्तव्यकर्म विसरून अधिकाराच्या तोऱ्यांत रहातात त्यांची सत्ता निश्चयेकरून नष्ट होते. अशीं उदाहरणें आपणास शतावधि सापडतील. आतां अधिकार प्राप्त झाला ह्मणजे त्याचा मद चढणें हेंहीं साहजिक आहे. कारण अधिकार नसतांही कांहीं मनुष्याचे मनांत जो अहंभाव वास करितो त्या योगानें सर्व ब्रह्मांड देखील तो आपले पादाक्रांत समजतो मग तीत्याची समज ताजवी असो किंवा गैरवाजवी असो. आतां याचप्रमाणें जर राजाची अवस्था धरली तर त्यापासून किती भयंकर परिणाम घडतील याची कल्पना आह्मी आपले वाचकांवरच सोंपवितों. ही दशा राजास प्राप्त झाली तर ती त्याचे थनिष्टदर्शक समजावयाची. पण जे थोर ह्मणवितात त्यांस ही गोष्ट मुळींच लागू नाहीं. त्यांचें वर्तन याहून अगदी भिन्न असतें. ते दुसऱ्याच्या नाशास सहसा प्रवृत्त होत नाहींत, ते अपराध्यास शिक्षा करण्यास भीत नाहींत, ते मनाचे थोर असल्या कारणानें त्यांचे मताविरुद्ध जरी कोणी क्षुल्लक मनुष्यानीं प्रतिपादन केलें तरी त्याचा पूर्ण विचार करून ग्राह्य असेल त्याचा अंगिकार करितात पण रोष धरितनाहींत व आपल्या कर्तव्यकर्मांस कधींच विसरत नाहींत. ह्मणून त्यांच्या थोरपणाचा पाया अधिक सुदृढ होऊन ते सन्मानास योग्य असे होतात. आतां अशा पैकींच इंग्रज सरकार हें एक होय असें आह्मास वाटतें. तेव्हां अशा उत्तम प्रकारची राज्य व्यवस्था कोणास आवडणार नाहीं असें नाहींच.

## वऱ्हाड

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं, मे. एदलजी साहेब अस्त्याची यांस रेसिडेन्ट साहेबांकडून शंभर रुपये पर्यंत दिवाणी दावे पहाण्याचा व थर्ड क्लास माजिस्ट्रेटचा अधिकार दिला.

मे. हेर साहेब असिस्टंट कमिशनर यांची अकोला जिल्ह्यांत नेमणूक झाली. मे. दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब यांचें काम त्यांच्याकडे देणार असें समजतें.

मे. बेल साहेब जुडिशियल कमिशनर २९ वे तारखेस विलायतेहून जी आगबोट येईल तिच्यांतून येणार असें समजतें.

कर्नल नेभार्ड साहेब यांस उमरावतीचे लोक मोठा थाटाचा पान सुपारीचा समारंभ करणार आहेत. अकोल्याचे स्टेशनावर ही ते जातील त्या दिवशीं त्यांस पान सुपारी करण्याचा विचार आहे. पहिले तारखेस ते इकडून जातील असें ऐकतों.

मि. म्याकिंटाश साहेब यांणीं आह्मांवर अब्रू घेतल्याबद्दल फौजदारींत फिर्याद केली आहे. ती क्या. निकोलेट साहेब फर्स्ट क्लास माजिस्ट्रेट यां पुढें चालू आहे. गेल्या बुधवारीं कापशी मुक्कामीं या मुकद्दम्याचें काम चाललें होतें. थोड्या जबान्या होऊन तारीख ९ एप्रिलवर मुकदमा तकूब आहे.

गेल्या आठवड्यांत मलकापुरास रा. रा. केशव विष्णु वकील यांच्या एथें चोरी झाली. चोर तीन होते ते भिंतीला भोंक पाडून आंत शिरले. त्यांचा इरादा माल चोरून नेण्यापेक्षां मारहाण करावी असा फार होता. व त्याप्रमाणें त्यांस जे कोणी त्यांच्या तावडींत बायका मुलें आलीं त्यांस त्यां चोरट्यांनीं ठोक दिला. एका खोलींत बाळंतीन होती तिच्या गळ्यांतील मंगळसुत्रास हिसाडा दिला, मुलास रस्त्यांत फेकून दिलें असा धूमधडाका चालू असतां एका बाईनें वाड्याबाहेर जाऊन बोभाट केला तों चोर निघून गेले. सुमारे बीसेक रुपयांचा विषय गेला. तपास सुरू आहे अजून पत्ता लागला नाहीं. असें समजतें.

मलकापुर ता. १८ मार्च

गेल्या पंध्रवड्यामध्यें या गावांत बरीच गर्दी झाली होती मे. डिपुटी कमिशनर साहेबांची स्वारी होळीचे सुमारास एथें येऊन सुमारे सहा मुक्काम करून पुनः बुलढाण्याकडे चालती झाली. अशा मोठ्या हुद्देदारांच्या स्वाऱ्या आल्या ह्मणजे सगळा गांव गजबजत असतो हें सहाजिकच आहे. साहेब बहादूर नवीन तयार झालेल्या ट्रॅव्हलर्स बंगलींत उतरले असून शिवाय आम पास त्यांचे डेरे, राहुट्या वगैरे ही दिल्या होत्या. स्वभावचे संबंधानें मे. बुष बी साहेबांची उत्तम सरदारांत गणना आहे हें जगविख्यातच आहे. साहेब दोन तीन वेळ शहर पहाण्याकरितां गावांतून फिरले शहरामध्यें फिरते समयीं ते दवाखाना, हिं. शाळा म. शाळा वगैरे ठिकाणें पहाण्याकरितां गेले होते. साहेबांचें विद्येकडे बरेंच लक्ष आहे यांत संशय नाहीं. सदरीं सांगितलेल्या दोन्ही शाळांत जाऊन तेथें सुमारे एकेक तासभर राहून निरनिराळ्या विषयांमध्यें मुलांची परीक्षा घेतली. आपला इतका काळ शाळाकडे घालविणारे साहेब फार क्वचित् असावे. एथील इंग्लिश मराठी शाळा पाहून तर साहेब फार खुष झाले, व अशी शाळा संपूर्ण वऱ्हाडांत पाहिल्याचें आह्मांस स्मरत नाहीं. तसेंच या शाळेचे हेड मास्तर हे अमर्याद स्तुतीस पात्र आहेत इत्यादि स्तुतिपर लेख शाळेच्या "लॉगबुकांत" साहेबांनीं लिहून ठेविला आहे असें ह्मणतात. अस्तु. साहेबांबरोबर त्यांचें क्षा. आ. धि कोर्ट मे. एदलजी भाई हे होते.

ह्या साहेबांचें प्रयाण होत आहे इतक्यांत मे. ए. इ. यांची स्वारी एथें आली. रावसाहेब श्रीराम भिकाजी यांचे येथें चार मुकाम झाले. रावसाहेब हे आपल्या सौजन्येंकरून व विद्वत्तेंकरून सर्व वऱ्हाडभर प्रख्यात आहेत. त्यांच्या परीच यांचे व त्यांस चाहणारे एथील बरेच लोक त्यांच्या भेटीस गेले होते. राव साहेबांस एक दोन ठिकाणीं पान सुपारीस बोलाविलें होतें. व मेहेरबानी करून ते गेले होते. त्यांच्या स्वभावाचें वर्णन जिकडे तिकडे इतकें उत्तम होत असतें कीं, त्यांस "अजात शत्रु" असें नांव दिलें असतां फारच शोभेल.

एथें एक वेरूळकर हरिदास बोवा आले आहेत. त्यांना कित्येक मंडळाचा आश्रय असल्यामुळें त्यांचीं एथें बरींच कीर्तनें झालीं. बोवा जरी व्युत्पन्न वगैरे नाहींत तरी कीर्तन बरेंच चांगलें करितात. उपदेश करणारा मनुष्य जितका वयोवृद्ध वगैरे असेल तितका त्याचा उपदेश अधिक ग्राह्य होतो निदान त्याच्या गोष्टी लोक लक्षपूर्वक ऐकितात. वयोवृद्धत्व हा उपदेशकाचे अंगीं एक गुण आहे यांत संशय नाहीं. तशी या बोवाची स्थिति आहे. संसारतुच्छतेविषयीं जीं भाषणें हे करितात तीं यांच्या ठिकाणीं शोभतात; व तेणेंकरून कीर्तनास रंग येतो. मोठमोठ्या आख्यांनांपेक्षां लहान लहान चुटक्यांच्या भक्तांच्या कथांनीं बोवांच्या कीर्तनांत रसोत्पत्ति विशेष होते हे आल्यापासून प्रतिदिवशीं लोकांचा सुमारें एक प्रहर काळ हरिभजनांत अथवा आत्मरंजनांत सुखेंकरून जातो. साहेब लोकांच्या देवळांतील प्रार्थकांपेक्षां आमचे हे कीर्तनकार भक्तिपरायण व सुवक्ते असल्यास लोकांच्या अंतःकरणांवर ईश्वर भक्तीचा दृढतर ठसा उमटावितील यांत शंका नाहीं.

रामनवमी प्रीत्यर्थ एथें नेमिवंतांचे राममंदिरांत प्रतिपदेपासून उत्साह सुरू आहे. प्रतिदिवशीं सांगितलेल्या बोवांचें कीर्तन होत असतें. एथील ए. अ. क. रा. रा. श्रीकृष्ण नरहर हे यांच्या सुस्वभानें व विशेषेंकरून मनमोकळेपणानें बोलणें, कोणींही बोलाविलें असतां त्याच्या एथें जाणे येणें इत्यादि गोष्टींनीं लोकांस बरेच प्रिय होत चालले आहेत. निदान उपमेयोपमान भावें करून हे गुण लोकांस अर्थांतच विशेष वाटावे. हे कामांतही फार हुशार व त्वरित आहेत अशी त्या त्या लोकांत यांची प्रशंसा आहे.

सालमजकुरीं हवेमध्यें जितके फेर फार व चार होतील तितके थोडेच. सुमारे ८ दिवसांपूर्वीं वैशाख ज्येष्ठाप्रमाणें उष्णता होत होती. आतां पुनः हेमंताप्रमाणें पहाटेस थंडी वाजत असते. सृष्टीची या सालीं बरीच स्थिति विपरित झाली आहे. तथापि ती तिच्या नियमास अनुसरून असेलच. सर्व दुःख काय तें सुख दुःखानुभवी प्राण्यास आहे.

## वर्तमानसार

सर जंगबहादुराच्या मरणामुळें नेपाळाच्या हद्दींतील सर्व स्त्रियांस एक वर्ष पर्यंत हजामत करावी लागेल असें ह्मणतात.

विलायतेच्या ता. ६ फे. च्या टाइम्स पत्रावरून समजतें कीं रशिया व टर्की हीं दोन्ही राज्यें अमेरिकेंतून लढाईचें सामान, दारू गोळा, हत्यारें, वगैरे मोठ्या झपाट्यानें आणीत आहेत. त्या देशांतील लढाईचें सामान तयार करणारे कारखाने रात्रंदिवस सामान तयार करीत आहेत. रशिया दारूगोळा फार आणीत असून टर्की हत्यारें फार आणीत आहे. टर्की, रशिया, व आस्त्रिया यांच्याशी करार केल्याप्रमाणें सामान पुरविण्यासाठीं ते कारखाने मोठ्या झपाट्यानें काम करीत आहेत. त्यांचा नफा होण्यास ही संधीच आहे. एक विंचेस्टर कंपनी दररोज ५००००० काडतुसें तयार करीत आहे व १०००००००० काडतुसें टर्की सरकारास मागेंच दिलीं आहेत. एक कंपनी रशियाकरितां बागनेटें तयार करीत आहे व दुसऱ्या कंपन्या दुसऱ्या प्रकारच्या लढाईच्या वस्तु तयार करीत आहेत. डान्युब एथें ६०००० फौज होती ही वाढवून ७५००० केली व याच मानानें दुसऱ्या कित्येक ठिकाणची फौजही जास्त होत आहे. अ. द.

बांबूपासून तांदळासारखे काहीं धान्य(बीं) उत्पन्न होत असतें, परंतु या धान्याचें पीक शंभर वर्षांत दोनदा तीनदांच येतें. यंदा मद्रास इलाख्यांत आमच्या इकडील प्रमाणें दुष्काळ कडाक्याचा आहे. त्यामुळें गरीब लोकांचे किती हाल होत आहेत हें सांगतां येत नाहीं. अशा संकटसमयीं मलबारांत गडालूर नामक रानांत बांबूस अतीशय कणसें आलीं आहेत ह्मणून कळतें. या कणसांपासून जें बीं उत्पन्न होईल त्यांपासून गोरगरिबांचा बराच निर्वाह होईल असें ह्मणतात. ज्ञा. च.

सरहद्दीपर्यंत रेलवे— बां. ग्या. मधील अलहाबादच्या ता. १६ च्या तारेवरून समजतें कीं, झेलम व रावलपिंडी यांजमध्यें आगगाडीचा रस्ता तावडतोब करण्याकरितां साडेसोळा लक्ष रु० खर्चण्याचा ठराव झाला व काम एकदम सुरू होईल. इं. दु.

---

## जुना इतिहास

( वऱ्हाडाशी भोसल्याचा संबंध. )

( मागील अंकावरून पुढें चालू. )

भोंसले हे छत्रपतीचे पदरीं शिलेदार असत. यांनीं आपल्या बहादरीनें राजकृपा संपादिली. त्यामुळें त्यांचे घराण्यांतील परसोजी भोसले यांस वऱ्हाडचे सुभ्यावर पाठविलें. तेथें सर्व बंदोबस्त राखणें व चौथ वसूल करणें हीं त्यांकडे कामें होतीं. तो कामावर असतांच सन १७०९ त्या वर्षीं मरण पावला. तेव्हां त्याचा मुलगा कान्होजी हा काम पाहूं लागला व त्याच प्रांतीं आपलें घर करून राहिला पुढें १७३४चे सुमारास त्याजवरील छत्रपतीची मर्जी उतरल्या कारणानें त्यास कामावरून दूर केलें व त्याचा पुतण्या रघोजी याजला काम पहाण्यास सांगितलें नंतर तीन वर्षांनीं वऱ्हाड व गोंडवन एथील जमाबंदी विषयीं त्यास सनद मिळाली. पुढें नागपुर प्रांत मिळविला त्याविषयीं पूर्वीं वृत्तांत दिलाच आहे. सन १७४५ सालीं वणी परगणा पूर्वीं चंद्रपुरकर गोंड राजाचे ताब्यांत होता तो काढून घेऊन नागपुर प्रांतास जोडला. पुढें सन १७५१ त गाविलगड किल्ला सर करून घेतला. त्याच वर्षीं रघोजीनें गोदावरीतटाकापर्यंत आपला मुलूख वाढविला व तेथपर्यंत आपल्या सर्व बाबी वसूल करून घेतल्या. परंतु पुढें चार वर्षांनंतर पेशवे यांस वऱ्हाडचे पश्चिमेचा मुलूख दिला तेव्हां रघोजीनें गोदातटाकींचे प्रांत सोडून पैनगंगेपर्यंतच आपला मुलूख ठरविला. पुढें सन १७५७त निझाम अली हा निझामाकडून वऱ्हाडचा सुभेदार होता तेव्हां बाळाजी बाजीरावाचे सैन्यानें सिंदखेड एथें रामचंद्रराव जाधव यास घेरलें तेव्हां त्या संकटांतून त्यास निजाम अलीनें सोडविलें. परंतु याच सुमारास नानासाहेबांची पत्नी गोपिकाबाई इला चोळीकरितां ह्मणून उमरखेड परगणा द्यावा लागला असें दिसतें. पुढें दोन वर्षांनीं निजाम अलीनें वाशिमचे रस्त्यानें येऊन अकोल्यावर घाला घातला व तें लुटून फस्त केलें. परंतु जानोजी भोंसल्यानें त्यास बऱ्हाणपुरीं पळवून लाविलें. याप्रमाणें मराठेशाई व निजामशाई सुभेदारांमध्यें प्रांतांत वर्चस्व मिळावें ह्मणून सतत झगडे चालले असत.

इतके तंटे बखेडे चालले होते तथापि सन १७६० पर्यंत पैनगंगेचे दक्षिणतीरीं मराठ्यांची सत्ता नव्हती असें दिसतें. परंतु त्या वर्षीं उदयगिरि एथें लढाईंत निजामाचा मोड झाला तेव्हां दक्षिणेकडील मेहेकर वगैरे परगणें पेशव्यांना देणें निजामास भाग झालें. असें झालें तरी निजाम स्वस्थ बसला नाहीं. पुढें १७६३ त गोदावरीतीरीं राक्षसभुवन अथवा तेंडूळजें एथें निजामानें पेशव्याशीं लढाई दिली. तींत जानोजीच्या विश्वासघातामुळें निजामाचा मोड झाला. तथापि निजामास जानोजीचा कांहीं परगणे देऊन भर करावी लागली. पुढें निजाम व पेशवे यांनीं जानोजीची विश्वासघाताबद्दल खोडकी जिरविली. सन १७७२त जानोजी मरण पावला. तेव्हां त्याचे भाऊ साबाजी व मुधोजी यांमध्यें गादीकरितां तंटा पडला. शेवटीं गोष्ट निकरास येऊन पोंचली. भावाभावांची लढाई अकोल्याजवळ कुंभारी ह्मणून गाव आहे तेथें झाली. तींत मुधोजीचे पक्षाचा मोड झाला. तरी पुनः नागपुराजवळ लढाई होऊन साबाजी मरण पावला. तथापि निजामानें साबाजीस सहाय्य केलें ह्मणून त्यास गाविलगड व नरनाळा देणें मुधोजीला अगत्य पडलें. पुढें कांहीं काळानें मुधोजीस हे किल्ले निजामानें परत केले. परंतु एक शर्त करून दिले. ती अशी कीं, सातपुडे बारींतील भिल्ल वगैरे लोकांना मुधोजीनें दाबांत ठेवावे व त्यांपासून उपद्रव होऊं देऊं नये.

पुढें कांहीं काळपर्यंत सर्व स्वस्थ होतें. विशेष ह्मणण्या सारखें कांहीं घडून आलें नाहीं. परंतु पुढें एथें नारायणरावाचे अकालिक अपमृत्यूनें सवाईमाधवरावाचे लहानपणामुळें व दादा साहेबाच्या कारस्थानामुळें थोडीशी धांदल उडाली होती, ती संधि साधून निजामानें आपलें प्राबल्य स्थापण्यास उपाय योजिले परंतु त्यांपासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. वार्षिक खंडणी व घासदाण्याबद्दलचा पैसा वेळचे वेळीं देणें सोडून दिलें त्यामुळें १७९५ त खर्डांची लढाई झाली तींत निजामाचा पराभव झाला व पूर्वीचें जेवढें देणें तुंबलें होतें तेवढें सर्व द्यावें लागून उमरखेड अमरापूर व आग्नेयी दिशेकडील परगणे पेशव्यास द्यावे लागले. तसेंच गोदावरीतीरीं मन्निकालेश्वर ह्मणून क्षेत्र आहे तें निजामाचे मुलखांत होतें तेव्हां यात्रेकरी लोकांस मुसलमानांकडून बहुत त्रास पोंचे. तो दूर व्हावा ह्मणून मन्निकालेश्वर व मराठ्यांच्या ताब्यांतील मुलूख यांमधील प्रदेश निजामाकडून पेशव्यांनीं घेतला व कालेश्वराची नीट संस्थाही करून दिली. त्या योगानें यात्रेकरी लोकांस फार सुख झालें.

या नंतर लवकरच सवाई माधवराव निवर्तले. त्यांचे मागें पेशवे कोणी व्हावें या विषयीं बहुत भवति न भवति होऊन बाजीराव रघुनाथ यास पेशवाईचे गादीवर बसविलें. पुढें त्यानें अविचारानें वसईचा तह केला. तो पुष्कळ राजे लोकांस पसंत पडला नाहीं. त्यामुळें नागपुरकर भोंसले व शिंदे यांनीं इंग्लिशांविरुद्ध कट केला. त्याचा शेवट दोघांचाही मोड झाला. भोंसल्यास देवगाव एथें तह करावा लागला. त्या तहाच्या शर्तीप्रमाणें वऱ्हाडचा बहुतेक भाग निजामाकडे परत करावा लागला. याच वेळेस भोंसल्यांचा वऱ्हाडाशीं संबंध तुटला ह्मणावयाचा. परंतु गाविलगड, नरनाळा वगैरे भोंसल्यांचे हातीं राहिले होते. पुढें सर जार्ज बार्लो हा निजामाकडून कांहीं भाग भोंसल्यास परत देत होता परंतु रघोजीनें मानखंडना होईल या भीतीस्तव घेतला नाहीं. पुढें आपासाहेबानें इंग्लिशांशीं लढाई केली तींत त्याचा मोड झाला. आपासाहेबाचे मदतीस बाजीराव पेशवा आला, परंतु पैनगंगा व वर्धा या नद्यांच्या चिमट्यावर पांढरकौडा गाव आहे तेथें त्याचा पराभव होऊन तो सातपुड्याकडे चालता झाला, व अशीरगडाजवळ धोलकोट ह्मणून गाव आहे तेथें कंपनी सरकारास शरण गेला. ते वेळेस जे करार केले त्यांअन्वयें वऱ्हाडची मालकी निजामाकडे व कंपनी सरकाराकडे गेली. तेणेंकरून भोंसल्यांचा वऱ्हाडप्रांतावरील अधिकार सर्वस्वीं नाहींसा झाला. भोंसल्यांचीं वऱ्हाडांत कांहीं गावें आहेत. परंतु इतर रयतेप्रमाणेंच त्यांचा अधिकार आहे. राजकीय सत्ता नष्ट झाली.

“सेना साहेब सुभा” हा किताब सन १८१८ पासून निरर्थक झाला. त्यापूर्वीं वसूल करण्याचा प्रकार पाहिला तर सरळ धोपट मार्गाचा असे. ज्या जमीनीवर निजामाचा हक्क असे त्या जमीनीबाबत शेकडा उत्पन्नांतून ५० रुपये घेत असत. इतर सर्व जमीनीवर शेकडा ६० रुपये घेत त्याचा तपशील पहातां चौथ १५ रुपये, सरदेशमुखी १० रुपये व फौजदारी १० रुपये असत. याप्रमाणें वसुलाची रीत असे.

सरासरी सवाशें वर्षें भोंसल्याचा अंमल वऱ्हाड प्रांतावर चालला.

याप्रमाणें वऱ्हाड प्रांताशीं भोंसल्यांच्या संबंधाविषयीं संक्षिप्त हकीकत आहे.

वि. नि

---

## विक्रीस तयार,

**स्कन्दपुराणांतर्गत सह्याद्रि खंड.**

हा ग्रंथ मराठी टीकेसह प्रसिद्ध करण्याबद्दल चार वर्षांपूर्वीं मुंबईंतील म[illegible] वर्तमानपत्रांत जाहिराती प्रसिद्ध होत होत्या; इतकेंच नाहीं, पण त्या जाहिराती देणाऱ्यानें दर प्रतीस १० रुपये प्रमाणें अगाऊ पैसाही घेतला आहे. असें असून अद्याप त्यांच्याकडून पुस्तक प्रसिद्ध झालें नाहीं. हल्लीं या ग्रंथाच्या मूळ प्रति डाक्तर जे. जर्सनदा कुन्हा यांणीं निर्णयसागर छापखान्यांत छापून काढल्या आहेत. हें काम त्यांनीं काशी, कोचीन, कर्नाटक व इतर ठिकाणच्या चौदा प्रती मिळवून दुसऱ्या शास्त्र्यांच्या मदतीनें ताडून पाठांतर आढळलें तें टीपेंत दाखविलें आहे; आणि रेणुकामाहात्म्य, चंद्रचूडामहात्म्य, नागाव्हयमाहात्म्य, वरुणापुरमाहात्म्य, कामाक्षीमाहात्म्य, व मांगीशमाहात्म्य इतके भाग जोडले आहेत, पुस्तकास कागद उत्तम घातले असून छापणावळ फारच सुरेख आहे; आणि इतकेंहि असून किंमत फार थोडी ह्मणजे ४ रुपये ठेविली आहे.

पुस्तकें मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत खालीं सही करणार यांजकडे मिळतील. बाहेर गांवच्या लोकांस टपालखर्च आठ आणे जास्त पडतील.

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी

म्यानेजर, विविधज्ञान विस्तार.

---

## जाहिरात.

विक्रीस तयार.

## जमाखर्चाची पद्धती.

( कीर्द खतावणीसहित प्रश्नोत्तर रूपानें. )

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति गेल्या आगष्ट महिन्यांत काढिली ती सर्व खपल्यामुळें हल्लीं तिसरी आवृत्ति छापिली आहे. या आवृत्तींत कांहीं जास्त प्रश्न घालून पूर्वीच्या प्रश्नांत बरीच सुधारणा केली आहे; त्याचप्रमाणें पुस्तकाचे शेवटीं जो कीर्द खतावणीचा नमुना आहे त्यांतही विशेष सुधारणा केली आहे. पुस्तक उत्तम टाइपांनीं जाड कागदांवर सुरेख छापिलें आहे. मेहेरबान डायरेक्टर साहेब यांणीं हें पुस्तक पाहून पसंत केलें आहे व त्यास आपला उदार आश्रयही दिला आहे. या पुस्तकापासून सहावे यत्तेची परीक्षा देणार उमेदवारांस व इतर हिशेबी लोकांस फारच उपयोग होणार आहे. या पुस्तकाची, तारीख १५ माहे मे सन १८७७चे आंत घेणारांस, किंमत टपाल खर्चाशिवाय साडेसहा आणे व पुढें घेणारांस, आठ आणे पडेल. टपालांतून नेणारांस दरप्रतीस एक आणा जास्त पडेल. किंमतीबद्दल तिकिटें पाठविणें झाल्यास अर्ध आणा दराचीं वर्तळ्यासह खालीं सही करणाराचे नांवें पाठवावीं.

तारीख १६ माहे मार्च सन १८७७.

वासुदेव बाळकृष्ण लोटलीकर.

रत्नागिरी.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.खा. प.